REGISTERED NO. 6,1877.

# वऱ्हाडसमाचार

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| „ अखेर | |

...ल्यात होतो. हीं जीं नवीन वर्षी चर्के येतात त्यांतील, कोकडून आगाऊ वर्गणी घावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| „ दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा

विठ्ठलसिंग रजपूत वस्ती ताजनापेठ अकोला यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस दण्यांत येतें कीं तुह्मी भाड्यानें माझे घरांत रहात असतां या दोन तीन महिन्याचें भाडें तुह्मी दिलें नाहीं तुह्मास भाडें मागितलें तर तुह्मी इनकार केला व घर खालीं करून देत नाहीं. आणखी असें कळतें कीं तुह्मी माझे घर मोडून नवीन बांधणार यास्तव तुह्मास कळविण्यांत येतें कीं तुह्मी कोणाचें नाहीं लागून आहा. ही इमारत मोडून नवीन केली असतां तुमचा खर्च बुडून माझी इमारत मोडल्याबद्दल मी तुह्मापासून नुकसान भरून घेईन. तुह्मी राहिलेल्या महिन्यांचें भाडें देऊन घर खाली करून द्यावें ह्मणून तुह्मास आठ दिवसांची मुदत दिली आहे ह्या मुदतींत भाडें व ह्या नोटिसीचा खर्च देऊन घर खाली करून द्यावे व नवीन काम करूं नये कळावें तारीख २८ एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) किसन वल्लद काशीबा सुतार वस्ती ताजनापेठ

### नोटिस.

कडताजी वल्लद शामजी हडे वस्ती तळेगाव प्रगणे पातुर्डे तालुके अकोट. यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तूं माझा गंधर्वाचा नवरा होऊन ३ वर्षें झालीं तूं मला घरीं नेलें नाहीं व माझे अन्न वस्त्राची फिकीर ठेविली नाहीं. माझे अंगावरील नग वज वगैरे घेऊन गेला हें एथील पंचांस माहित आहे. माझा बाप दोन तीन वेळ तुझ्या घरीं मला तूं न्यावें ह्मणून सांगावयास आला होता पण तूं मला मुळींच नेलें नाहींस. माझा बाप वृद्ध आहे यास्तव त्यानें मला पोसवत नाहीं ह्मणून दरसाल ५० रुपयेप्रमाणें ३ वर्षांत एथें मला १५० रुपये कर्ज झालें आहे तें देऊन टाकून ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत मला घेऊन जावें मी येण्यास सिद्ध आहे अगर नेणें नसल्यास फारकती द्यावी या दोहींतू... किंवा अक्रा... न केलें तर कोर्टांत फिर्याद करून मजवरील नवरेपणाचा हक्क रद्द ...ला झालेलें १५० रुपये कर्ज व या नोटिसीचें खर्चासुद्धां भरून घेईल व गंधर्वाचा दुसरा नवरा करीन हें खूप समजावें. कळावें तारीख ३० माहे एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) जानी मर्द कडताजी रहाणार मौजे खंडाळें निशाणी खुद्द हातची बांगडी

### नोटिस.

मोहनचंद खेमचंद साहू दुकान जळगाव जामोद यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं ता. १८ रोजीं संध्याकाळचे चार वाजतां बाजारांत ५० खंडी आळशीचा सवदा दर ९० रुपये खंडीप्रमाणें जळगाव पायलीचा नांदुरें एथें पावती करून नंतर रुपये घ्यावें असा दोन दलाल रामजी सिताराम बेणी व गणपतलाल नेमीचंद यांचे मार्फत धोंडोपंत निजबत जयसिंगदास साहू. विठ्ठलदास व रावजी महादेव निजबत तुकाराम मुनाजी यांचे समक्ष सराफी रीतीप्रमाणें केला परंतु अद्यापपावेतों आळशी आमचे ताब्यांत मोजून दिली नाहीं व रुपये नेलें नाहींत करितां तुह्मास या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटिस पावल्यापासून ४ दिवसांचे आंत आळसी मोजून द्यावी व चुकते रुपये घेऊन जावें जर तसें न कराल तर शिरस्याप्रमाणें बाजारभावाची किंमत लाऊन चढीत भाव जो होईल तो व या नोटिसीचे खर्चासुद्धां कोर्टांत फिर्याद करून रुपये घेतले जातील कळावे तारीख २८ एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) टकार गोकुळदास माधवजी आणि कंपनी दस्तुर दामजी उकर्डा

### नोटिस

नारायण वल्लद एकोजी रहाणार मस्तानखेड प्रगणे बाळापुर तालुके खामगाव जिल्हा अकोला यांस खालीं सही करणार याजकडून नोटिसीचें उत्तर देण्यांत येतें कीं तुह्मी मौजे हातें तालुके बाळापुर एथील शेतांतील मालाबद्दल आठ दिवसांत नोटिसीचा निकाल करावा ह्मणून दिली. तर या शेताबद्दल तुमचा आमचा अर्था अर्थी कांहीं संबंध नाहीं. कारण पूर्वीपासून भागीनदार रुंजाजी वल्लद नवलाजी हे असून हल्लीं सन १२८३ सालीं तो मयत झाला व त्याची वारस मुलगी दरयान मर्द चंद्रभान ही सन १२८३ इसवीपासून माल नेत आली आहे व यंदाही हंगामाचे वेळेसही तिनेंच माल नेला आहे तर या शेताबद्दल तुमचा व आमचा कांहीं संबंध नाहीं. तुह्मांस कांहीं विच्यारणें असल्यास सदर्हू बाईस विच्यारावें भागिणी बुकांत तुमचें नाव शरीक नाहीं व आह्मी तुह्मास ओळखत नाहीं कळावे तारीख २६ एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) बापूजी पाटील वस्ती मौजे तळेगाव तालुके अकोट

### नोटिस

सोनाबाई मर्द रामभजन व मुलगा रावतमल रामजन साहु दुकान अटाळी तालुके खामगाव जिल्हा अकोले इजला सदासुक वल्लद हेमराज मारवाडी हल्लीं रहाणार मौजे पिंपरी तालुके चिखली जिल्हा बुलढाणें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, माझा बाप मयत झाल्यावर घरजिनगी, चीजवस्त वगैरे सावकाराच्या धाकामुळें लांबवा लांबव करावी ह्मणोन माझ्या आईनें व मी असे उभयतांनीं मिळून एकंदर चीजवस्त, इतर गैरभरवशाच्या मनुष्याजवळ ठेवूं नये कारण त्याचा आपल्यास भरवसा नसून ठेवल्या जिनसा परत हातीं येणार नाहींत या कारणानें तुह्मी खुद्द माझी सासू असून माझ्या हिताअनहिताची तुह्मास काळजी अशा खात्रीनें साक्षीनिशी तुमचे स्वाधीन जिनसा केल्या त्यांचा तपशील—

३९० सोन्याचे डागिने वजन व सु. किंमत
  १७० हसळ्या २ वजन तोळे १९
  ४५ कानांतल्या तोड्या १ जोड २॥ तोळे.
  १९ रामनामी एक वजन सु. १। तो.
  १८ मुरक्या नग ४ तोळा १.
  १०० नथ मोत्यांसह किंमत.
  ४९ कानांतल्या बगण्या ४ व मुरक्या ३ वजन तोळे २॥
  ———
  ३९७
३६४ चांदीचे डागिने
  ४० करदोडा एक तोळे ४०
  ३९ बाजुबंद जोड १ तोळे ३९.
  १८ विचोव्यापायांतील २ व. तो. १८
  १०९ कडे पायांतील नग २
  १९ गजरा हातांतील वजन १९.
  २९ पायांतिल साख्याचा जोड १ वजन तोळे २९
  ६२ किरकोळ चांदी तोळे ६२.
  २० तोड्याची जोडी १ तोळे २०
  ३० तोडा १ वजन ३०
  १० काकणी १ वजन तोळे १०
  ———
  ३६४
२९२ रोखपैकी ९१ चांदवडी २०१ समसेरी
  ५० ह्मैस १ तिची किंमत.
  १९ गाडीची छत्री लोखंडी १
———
११९८ एकूण अक्रा शें अठरा रुपयांचा माल तुह्मापाशीं ठेविला असून हल्लीं माझा मी उमेदवार होऊन कांहीं तरी पोटाची सोय पहावी ह्मणून सदर्हू रकम तुह्मास मागत असतां देत नाहीं. करितां या नोटिशीनें सुचवितों कीं,. ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत माझे मजला सर्व चीजवस्त माझे स्वाधीन करालं तर उत्तम आहे नाहींपेक्षां कोर्ट खुलें झाल्याबरोबर तुह्मावर फिर्याद करून सदर्हू डागिने तपशीलवार तुह्मापासून घेतले जातील हें खूप समजावें कळावें तारीख २६ माहे एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) सदाशिव हेमराज मारवाडी साहू दुकान पिंपरी तालुके चिखली दस्तुर खुद्द.

### नोटिस.

राघो भिंगारी रहाणार मौजे तांदळी खुर्द तालुके बाळापुर जिल्हा अकोला याजला नोटिस देणार सिवराम वल्लद बुदमल मारवाडी रहाणार मौजे मजकूर तालुके मजकूर जिल्हा अकोले याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुमचेकडे वही खात्यावरून गुदस्त साली हिशेब करून घेणें निघाले तें असें:—

१२८ रोख रुपये सुर्ती एकशें अठ्ठावीस तसेंच ०१६ ज्वारी मण सोळा व ०२॥ गहू अडीच मण

येणें प्रमाणें तुमचे खातीं बाकी असून गुदस्त सालीं फक्त रुजू करून गेला परंतु अद्यापपावेतों निकाल कांहींच केला नाहीं तुह्मास मागतां मागतां नाइलाज होऊन गेलों आतां मागण्याची शिमा झाली व तूर्त कोर्ट बंद झाल्या कारणानें प्रथम ही तुह्मास नोटिस देण्यांत आली आहे तरी ही पावल्यापासून एक महिन्याचे आंत तुह्मी आपले खातेबाकीचा निकाल रुपये ज्वारी व गहू असें सर्व फडशा करून द्यावा विनाकारण रक्कम राहून गल्लाही राहत गेला तेव्हां रक्कम व्याजानें वाढून गल्ला वाढीनें वाढत चालला तेव्हां हे देणें विनाकारण फुगवून आह्मास खर्चांत घालावे हें बरोबर नाहीं आतां ही नोटिस पावताच देण्याचा उलगडा करावा तसें न केल्यास कोर्ट खुलें झाल्या बरोबर कांहीं अवकाश न करतां एकदम फिर्याद करून रुपये व गल्ला घेण्याविषयीं तजवीज करीन हें खचित समजावें. कळावें तारीख २८ माहे एप्रिल सन १८७७ इसवी.

( सही ) शिवराम वल्लद बुदमल मारवाडी दस्तुर खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख वद्य ९ शके १७९९

## इंदापुरकरांचा सदुद्योग.

इंदापुर हें पुणें जिल्ह्यांत एक लहानसें गाव आहे पण "मूरतसे कीरत वडी" या प्रमाणें लोकांच्या सदुद्योगानें त्याचा लहानपणा जाऊन तें शेकडों कोशांवर सर्वत्र विख्यात झालें आहे. हें तेथील ग्रामस्थांस मोठें भूषण होय व त्याबद्दल आह्मी त्यांची तारिफ करितो.

साऱ्या हिंदुस्थानांत लवाद कोर्टें जीं स्थापन झालीं त्यांचे मूळ बनि इं पु म निघालें. सार्वजनिक सभा इंदापुरास झालीं व या दोहोंचींही कामें सुरळीत चालतात हें पाहून कोणा देशहितेच्छूस संतोष होणार नाहीं असें नाहीं. या यांच्या वरील दोन कामाप्रमाणेंच यांनीं दुष्काळग्रस्त लोकांस मदत करण्याचे कामीं कंबर बांधली व यांचे प्रयत्नास आजपर्यंत यशच येत गेलें ही दुसरी संतोषाची गोष्ट आहे.

गेले महिन्याचे पहिले तारखेचे वऱ्हाड समाचारांत इंदापुरचें प्रार्थनापत्र छापलेलें आमचे वाचकांचें पहाण्यांत आलेंच असेल, त्यावर तेथील मंडळीनीं 'दुष्काळ समयीं भगीरथ प्रयत्न" या नावाचें एक स्वतंत्र पुस्तकही छापून ठिकठिकाणीं रवाना केलें आहे आणि त्यावरून त्यांस चोहोंकडून मदतही बरीच मिळूं लागली आहे.

प्रथमतः तेथील ग्रामस्थांनीं आपसांत ठराव करून दररोज ८ पायली जोंधळ्यांच्या भाकरी करून सवाशें मनुष्यांचा उदर निर्वाह करावा अशी योजना केली व त्या प्रमाणें सवाशें लोकांत ब्राह्मण व इतर कोणतेही जातीचे अन्नार्थी लोक यांचा समावेश करित असत. पण बाकी हजारो लोक अन्नावाचून उपाशीं मरतात असें पाहून देशावर चोहोंकडे विनंतीपत्रें पाठविण्याची त्यांनीं योजना केली. त्यावरून श्रीमंत होळकर सरकारांनीं ११६९ रुपये पाठविले, बडोद्याहून कै० गोपाळराव मैराळ यांचे पटीवरून ११२९ रुपये आले. श्री० पंत सचीव यांणीं १०० रुपये पाठविले. आमचे अकोल्याचे रिलीफफंड कमिटीनें १०० रुपये पाठविले. रा. बहादूर गोपाळराव हरी देशमुख यांनीं ३० रुपये पाठविले. पुण्य हून रा. रा. भाऊ मनसाराम यांणीं ५० रुपये व अदालतीकडील शिरस्तेदार आणि नाजर यांणीं ६० रुपये दिल्यांचे समजतें. या धर्मकृत्यास आणखी कोणाकडून मदत मिळाली असेल ती समजली तर आह्मी प्रसिद्ध करूं.

या वरील गोष्टीवरून सर्वांची खात्री होईल कीं प्रयत्न करणारास सिद्धी प्राप्त होते. कोठें इंदापुरचे ग्रामस्थ आणि कोठें बडोदें, इंदूर व वऱ्हाड वगैरे ठिकाणचें औदार्य? पण सदुद्योगी मनुष्यांनीं आपल्या प्रयत्नांनीं महदंतरावरील लोकांचे औदार्याचा ओघ आणून स्वग्रामस्थांच्या मुखांत ओतला ही मोठी पुण्याईची गोष्ट ह्मणावयाची. याप्रमाणें सर्वत्र असे उद्योग हरप्रसंगीं होतील तर लोकांत एकी व सौख्य वाढेल आणि देशाची निकृष्टदशा त्वरित संपेल.

दुर्गादेविच्या दुष्काळ संबंधाची माहिती इंदापुरकराच्या लेखांत आह्मांस केवळ नवी आढळली व ती त्यांनीं शोध करून बहुधा खरीच लिहिली असेल. बहुधा ह्मणण्याचें कारण कोणत्या आधारावरून ती घेतली हें त्यांत स्पष्ट नाहीं व त्या गोष्टीच्या वर आणि खालीं इतर पुराणप्रसिद्ध व इतिहासप्रसिद्ध गोष्टी लिहिल्या आहेत तशी ही गोष्ट लोकांस माहित नाहीं ह्मणून ती आह्मीं आपले वाचकांस कळवितों.

शके १३१८ मध्यें मोठा भयंकर दुष्काळ बार वर्षें पडला. त्या वेळेस दुर्गा लमाणीन या मातेनें भरत खंडांत लक्षानुलक्ष वर्षें सुकीर्ति रहाण्यासाठीं ९–१० लक्ष बैल तयार करून सुकाळाचे प्रांत, चीन, नेपाळ, ब्रह्मदेश यांतून धान्य आणून दुष्काळपीडित प्रांतांस पुरविलें व जे अनाथ द्रव्यहीन होते त्यांस धर्मार्थ धान्य देऊन जगविलें. आणि जेव्हां पर्जन्यवृष्टी झाली तेव्हां प्रत्येक गांवास एक बैल व एक गाय उत्पत्तीसाठीं देऊन पेरण्या करितां धान्याची एक एक गोणी दिली. हें अलौकिक कृत्य दिल्लीचे बादशहानें विलोकून बडा दरबार भरवून त्या बाईस आणून "दुर्गादेवी जगाची माता" हें पद देऊन मोठा जयजयकार केला.

अहाहा! धन्य ती लमाणीन! हीनजाति व अबला स्त्री होत्साती कोट्यावधि जनावर १२ वर्षें उपकार करून त्यास जगविती झाली ती धन्य होय. ती हीनजाता असून ब्राह्मणाहूनही अत्यंत श्रेष्ठ, व हातांत कांकणें भरणारी बायको असून वीर कंकण धारण करणाऱ्या सहस्रावधि क्षत्रि यांहून अत्यंत पराक्रमी, ह्मटली पाहिजे यांत संशय नाहीं व अशीचेच पवाडे साऱ्या दुनियेनें गाइले पाहिजेत.

या गोष्टीवरूनही एक उत्तम बोध निघतो कीं आह्मी हीनजाति ह्मणून कोणी चांगल्या कामीं प्रयत्न करावयास मागें घेऊ नये, तसेंच आपण अविद्वान ह्मणून एकादें महत्कार्य आपल्या हातून कसें होईल ह्मणून त्या विषयीं प्रयत्न केल्यावाचून राहू नये. यःकश्चित लमाण जातींतील एक बायको आपले प्रयत्नानें साऱ्या महाराष्ट्र देशांतील लक्षावधि लोकांचे १२ वर्षें जीव वाचविण्यास पात्र झाली तर प्रांजल मनानें देशबंधूचा कळवळा धरून आमचे विद्वान तरूण मित्र सर्वकाळ सर्वकामीं झटतील तर परमेश्वर त्यांस यश देऊन त्यांच्या हातून आमच्या देशाचें ऊर्जित केल्यावाचून कधीं रहाणार नाहीं असा आह्मास भरवसा आहे.

## धोंडरेलवेकडील मजुरांची स्थिति.

धोंडच्या स्टेशनापासून अहमदनगरापावेतों रेलवेचें काम सुरू झालें, तसेंच त्यावर अशा दुष्काळाच्या प्रसंगीं सतरा अठरा हजार लोक अन्नास लागले व बेलारी आणि हुबळी रेलवे कडेही २०००० मनुष्य कामास लागलें या गोष्टी संतोषाच्या आहेत खऱ्या, पण अंतर्गत स्थिति पाहिली असतां समाधानकारक नाहीं हें पाहून फार वाईट वाटतें. नुकतेंच ऐकिलें कीं, धोंड रेलवेकडील मजूर लोकांत महामारीचा आजार उद्भवला आहे व बरेच लोक मरत आहेत. त्याकारितां इस्पितळ व त्यावर गोरा डाक्टर ठेवण्याची तजवीज झाली आहे. अनुभवीक लोक ह्मणतात कीं, हल्लींच्या तडाक्यांत मरून जे उरतील त्यांची हवाल पुढील महिन्यांत फारच कठीण होईल. कारण पर्जन्य सुरू झाला ह्मणजे त्यांना निवाऱ्याचें स्थळ नाहीं त्यामुळें वर पाऊस आणि खालीं ओल, व पोटभर अन्न मिळत नाहीं ह्मणून मूळचेच अशक्त, तेव्हां खरेंच तशा हजारों लोकांचा निभाव कसा लागेल याचीत्वारी [illegible] काळजी आहे.

नगराकडील असेंही वर्तमान वाचण्यांत आलें आहे कीं रेलवे कडील इंजिनियर मजुरास कामें नेमून देतात व तीं त्यांच्या दुबळेंपणामुळें तितकीं तंतोतंत झालीं नाहींत तर त्यांस चाबकानें मारतात व खाडे मांडतात आणि त्यामुळें सगळ्या आठवड्यांत त्यांस पांच किंवा चार आण्याचे पैसे मिळतात ह्मणून कित्येक लोक रेलवेवरच्या नोकऱ्या सोडून शहरांत जाऊन दुसरीं कामें पहात फिरतात व तीं न मिळाल्यास भिक्षा मागतात. अरेरे! ही गोष्ट खरी असल्यास मजुरांची अशी स्थिति होणें मोठें दुःखप्रद आहे. सरकारानें मजुरीचा दर मुळांत कमी केला आहे, त्यांत खाडे कापणें व वर चाबकानें मारणें हा किती उत्कृष्ट दयाळुपणा आहे! वाः! सरकारानें कृपाळुपणें फ्यामिन रिलीफ वर्क्स हीं कामें केवळ लोकांच्या पोषणार्थ काढिलेलीं आहेत. यांचें मुख्य धोरण कामाचे घडण्याकडे नसून लोकांच्या जगण्याकडे आहे हें आमच्या धोंडरेलवेकडील उदार, परोपकारी व विद्वान इंजिनियर यांस व त्यांच्या हस्तकास कळूं नये व त्यांनीं ममतेनें लोकांस वागवूं नये हें मोठें विचित्र आहे! तरी याचा बोल त्यांस लावण्या पेक्षां मजुराच्या दुर्दैवास लावावा हें बरें. बिच्यारे कमी अन्नानें मरताहेत, कांहीं महामारीनें मरताहेत व पुष्कळसे पुढें बरसातींत हलाखीनें मरणार आहेत अशीं दोन तीन बाजूनें त्यावर अरिष्टें आलेलीं आहेत तर मग त्यांच्या कामावरच्या देखरेखवाल्यांनीं तरी त्यांवर कां दया करावी? तिहींकडून तीन उभे राहिल्यावर त्यांनीं चवथा खादा दिलाच पाहिजे अस्तु. अशा थरावर गोष्ट न येऊं देणें व चांगल्या भूतदयेचे व विच्यारी मनुष्य अशा कामावर नेमणें सरकारास फार अवश्य आहे, याजकरितां सरकारानें कृपा करून अजून तरी या गोष्टीचा लवकर बंदोबस्त करावा.

हैदराबाद—एयील खबर सिकंदराबादचे डेकनटाइम्स नावाच्या इंग्रजी पत्रावरून समजतें ती येणेंप्रमाणें—

मुकद्दमजंग नावाचे आरबावरील अधिकारी मरण पावले, त्यांस औषध देणाऱ्या डाक्टरावर त्यांचे चिरंजीव हुसेनमिया यांनीं शस्त्र चालविलें होतें व त्याबद्दल त्यांवर मुकद्दमा झाला होता ही गोष्ट वाचकांस ठाऊक असेलच. त्या हुसेनमिया साहेबाकडे याच्या बापाच्या पदरचा एक कारभारी मि. जोगीनाथ हा गेल्या महिन्याचे १३ वे तारखेस भेटावयास गेला असतां त्याला त्यांनीं कैद केलें. एका मनुष्याबरोबर त्याचा मुलगा बालकिसन जो विकार उल उमराव साहेब यांजकडे होता त्याला निरोप पाठविला कीं तुमचे भेटीची जरूर आहे जलद येऊन भेटून जावें. त्याप्रमाणें तोही त्यांच्या घरीं आला व येण्या बरोबर त्यालाही बापाप्रमाणेंच धरून कैद केलें. व त्यांचे घरावर दोन तीन शे आरबा सहीत जाऊन त्यांनीं लबाडीनें मिळवलेली त्यांची सर्व जिनगी सुमारें दहा पंधा लाखाची ( रोकड, सोनें, ज[illegible] वगैरे) पकडून आ[illegible] प्रिन्स चार्लस यास जो खलीता [illegible] रांत गुज[illegible] टांत कैद आहेत. हा जोगीनाथ एकदम वाढला व त्याची नेक चांगली नव्हती ह्मणून त्याजबद्दल कोणासही कांहीं हळहळ वाटत नाहीं. हुसेन मिया यांनीं त्यास खर्चाकरितां कांहीं रकम मागितली होती ती त्यानें दिली नाहीं व सर्व चीजवस्त विकून रोकड व हुंड्या घेऊन स्पेशल ट्रेन मधून काशीस पळून जावें असा त्यानें बेत चालविला होता ही खबर ठेवून त्यास पकडलें. मुकदम जंग यांची त्यावर मोठी मेहेरबानी होती ह्मणून त्यावर कित्येक खटले आले व त्यास फौजदारी कोर्टानें शिक्षा सांगितल्या तरी त्यांचा अंमल त्यावर झाला नाहीं. एक प्रकरणांत तर त्यास तीन वर्षें कैद व अडीच लक्ष रुपये दंड अशी शिक्षा झालेली तकूब आहे ती आतां अमलांत येईल असें वाटतें. एक व्यंकू नावाचा मनुष्य यानें अटकेंत ठेविला होता तो हल्लीं सुटला आहे त्याची याजवर अशी फिर्याद आहे कीं, ७ वर्षांपूर्वीं जोगीनाथानें माझा भाऊ ठार मारला व त्याबद्दल मी फिर्याद करीन ह्मणून तेव्हांपासून मला अटकेंत ठेविलें होतें. ही फिर्याद रेसिडेन्सींत झाली आहे व तिकडून दिवाण साहेबांकडे चौकशीस गेली आहे. निकाल काय होतो तो पहावा.

चे नियमांत आली … या संबं-

हैदराबादे सारख्या मुख्य राजधानी शहरांत असे भयंकर गुन्हे व ते करणारे गुन्हेगार सर सालरजंग साहेबांसारख्या दिवाणाच्या राज्यकारकीर्दींत असे दीर्घकालमर्यादा कसे छपून राहिले याजबद्दल आश्चर्य वाटतें. जर ही गोष्ट खरी असेल व ज्याजला तीन वर्षांची सजा बऱ्याच काला पूर्वीं सुनाविली त्याजवर तिचा आज पावेतों अंमल झाला नाहीं हेंही खरें असेल तर मोठाच चमत्कार समजला पाहिजे!

### या वर्षीं पावसाचा रंग

गत वर्षीं आपल्या देशांत पाऊस कमी पडून दुष्काळ पडला आहे तेव्हां या वर्षीं पावसाचा रंग कसा काय दिसत आहे हें जाणण्याकडे सर्वांचीं मनें सहजच लागलीं गेलेलीं असतील, आणि हें जाणणें अगत्याचें आहे ह्मणून या विषयांत वाकब अशा गृहस्थांनीं याविषयीं जें अनुमान काढिलें आहे तें जरी उमेद आणणारें असें नाहीं तरी तें आह्मी आमच्या वाचकांस सादर करितों. तें अनुमानें जर एकदा

साधारण ठरलें तर यापुढें तरी लोक सावध रहातील आणि नियमित काळीं येणाऱ्या दुष्काळाचें संकट कांहीं अंशी तरी त्यांस निवारतां येईल.

कलकत्त्याचे डा० हण्टर व मद्रासचे सरकारी ज्योतिषी मि० पॉगसन यांणीं असें अनुमान काढिलें आहे कीं, या वर्षी व पुढील वर्षींही पर्जन्य चांगला पडणार नाहीं. त्यांच्या लेखावरून असें दिसतें कीं, सूर्यावर कांहीं डाग आहेत ते अक्रा अक्रा वर्षांनीं क्षयवृद्धि पावतात व त्याप्रमाणें पाऊस कमी जास्ती पडतो. हा प्रकार विशेषेंकरून दक्षिणहिंदुस्थानांत किंवा मद्रास इलाख्यांत होतो. हीं जीं अक्रा नवीन वर्षीं चक्रें येतात त्यांतील प्रत्येक क[illegible]टल्या ह्मणजे अक्राव्या वर्षी पाऊस अगदीच उणा पडतो, आणि त्याच्या पुढल्या दोन ह्मणजे नवीन चक्राच्या पहिल्या व दुसऱ्या वर्षी त्यापेक्षां जरासा अधिक परंतु एकंदर कमीच पाऊस पडतो, आणि नंतर दरवर्षी वाढत जातां जातां पांचव्या व सहाव्या वर्षी सर्वांत अधिक पडून पुनः कमी कमी होत जातो तो अक्राव्या वर्षी फारच कमी होतो. सन १८०६ चें साल हें अशा एका कालचक्राचें शेवटचें ह्मणजे अक्रावें वर्ष होतें आणि सांप्रतचें व पुढील वर्ष हीं नव्या चक्राचीं पहिलें व दुसरें अशीं वर्षे होत. तेव्हां वर सांगितलेल्या नियमाप्रमाणें या दोन वर्षांतही पर्जन्य फारसा पडण्याचा संभव दिसत नाहीं. ज्ञा. द.

## वऱ्हाड

दुष्काळरिलीफफंडाची जी एथें रकम जमली आहे तींतून या आठवड्यांत रुपये पाठविले ते:—

२०० सोलापुरास
१०० अहमदनगरास
१०० पंढरपुरास
१०० इंदापुरास
——
५००

गेल्या महिन्यात मुंबईस लिटलगोची परीक्षा झाली तींत वऱ्हाडांतील ३ विद्यार्थी पास झाले. त्यांचीं नावें:—

१ बळवंत आबाजी दिवेकर.
[illegible] आगरकर
[illegible]यण देशपांडे.

१ रामचंद्र नार[illegible]र हे रा. रा. आबाजी [illegible] यांतील दिवेक[illegible] चिरंजीव, आगरकर हे [illegible]शिवराव भागवत यांचे भाचे, व तिसरे बाळापुरकर रा. रा. अच्युतराव देशपांडे यांचे भाचे आहेत. हे तिघेही पास झाल्याबद्दल आह्मांस संतोष वाटतो.

उमरावतीस तिसर तारखेस क्या. बुलक साहेब यांचे कोर्टांत मि. म्याकिंटाश साहेब यांच्या प्रमोदसिंधूवरील फिर्यादीची चौकशी झाली. साहेबाकडून रा. रा. लक्ष्मीपति नायडू व पत्रकर्त्याकडून रा. रा. बळवंतराव मंगेश वागळे हे ब्यारिस्टर होते. अखेरीस न्यायाधिशानीं पत्रकर्त्यावर अब्रू घेतल्याचा गुन्हा शाबीद आहे असें ठरवून २५० रुपये दंड केला असें समजतें. यावर अपील होणार आहे. या मुकदम्याचें कागदपत्र पहाण्यांत आल्यावर अवश्य वाटल्यास आह्मी याबद्दल विशेष लिहूं.

अरुणोदय पत्राकडील तोडजोडी करितां मि० म्याकिंटाश साहेब ठाण्यास गेले होते. त्याचें काय झालें तें बरोबर समजलें नाहीं. पण २०५० रुपये देऊन पत्रकर्त्यानीं आपसांत खटला मिटविला असें ठाण्याकडून आलेल्या मंडळीच्या सांगण्या वरून कळतें पण ठाण्याहून आह्मांस जें पत्र आलें होतें त्यांत साहेब १५०० रुपये मलेगाव असें लिहिलें होतें आणि आ[illegible]६ साला[illegible]हून अधिक ही रक्कम आम[illegible] वधूनीं कशी [illegible] तें समजत नाहीं. कदाचित नागपुरी सणगाच्या अंकाप्रमाणें यांत कांहीं वाढी असेल काय?

मि. म्याकिंटाश साहेब यांनीं रजा कबूल केली होती तें प्रकरण रेसिडेंट साहेबाकडे जाऊन तिकडून तावडतोब तारेतून निकाल आला कीं त्यांस रजा द्यावी. व तो हुकूम कमि० साहेबांनीं परभारेंच म्याकिंटाश साहेबांस कळविला. यावरून या महिन्यापासूनच त्यांच्या रजेचा अंमल सुरू झाला, व सुटीचा सगळा उपभोग त्यांस मिळाला नाहीं असें दिसतें.

उर्दूअखबारावरील मि० म्याकिंटाश साहेब यांची फिर्याद उदईक मि. निकोलेट साहेब फर्स्ट क्लास माजिस्ट्रेट यांसमोर चालणार आहे. व त्याकरितां साहेब आजचे गाडींतून संध्याकाळीं एथें येतील. शुक्रवारीं रा. रा. बळवंतराव मंगेश वागळे उमरावतीहून येऊन मुंबईस परत जात असतां उर्दू अखबाराचे मालकांनीं सलामसलतीसाठीं त्यांस एक दिवस त्यांची १५० रुपये फी देऊन ठेवून घेतलें होतें व काल शनिवारीं ते परत गेले.

वाशिमचे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. कृष्णाजी गोविंद काळे यांस यवतमाळास ८० रुपयांवर डिपुटी क्लार्क आफ धि कोर्ट यांचे जागेवर नेमिलें अशी आह्मास कोणी खबर कळविली होती. व गावांतही अशी आवई पसरली होती पण शोध करितां ती गोष्ट खोटी आहे असें समजून आलें. रा. रा. कृष्णाजीपंत अजून वाशमासच आहेत. व यवतमाळाहून रा. रा. परशराम गणेश तेथें आल्यावर हे यवतमाळास जातील.

वाशिमच्या नाजरकचेरींतील कारकून व एक पटवारी यांस खोटा दस्तैवज केल्यावरून तीन महिने कैदेची शिक्षा झाली व ते अपिलासाठीं इकडे आले आहेत.

रा. रा. भास्कर महेश्वर लेले अकोल्याचे तहशिलदार रजेवर गेले होते ते परत येऊन आपले कामावर रुजू झाले. व मे. बाकरअली तहशिलदार उमरावतीस परत गेले. त्यांस पोंचविण्याकरितां पुष्कळ मंडळी स्टेशनावर गेली होती.

वाशीमचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. वामनराव बाळाजी ओक्षरकर एथें आले आहेत. पुढील आठवड्यांत परत जातील.

## वर्तमानसार

पुणें— गेले रविवारीं तिसरे प्रहरी पेठ सदाशिव एथें रा. रा. नाना साहेब फडतर यांच्या वाड्यांत पुणें सार्वजनिक सभेची जनरल सभा भरली होती. शहरांतील व लष्करांतील बहुतेक नामांकित व बडेबडे लोक सुमारें ३०० सभेस आले होते. अध्यक्षस्थानीं श्रीमंत पंत प्रतिनिधी साहेब संस्थान औंध यांची स्वारी बसली होती. सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचे नियमांत आलीकडे बरेच फेरफार झाले आहेत त्या संबंधानें, परीक्षेस जाणाऱ्या उमेदवारांच्या वयाची यत्ता वाढविण्याविषयीं व उमेदवारांस हितावह अशा दुसऱ्या कित्येक गोष्टीविषयीं स्टेट सेक्रटरी साहेबांकडे अर्ज करण्याचा ठराव सभेंत होउन त्या ठरावा अन्वयें अर्ज तयार करण्या करितां व तो स्टेट सेक्रेटरी मार्फत पार्लमेन्ट सभेकडे रवाना करण्याकरितां कांहीं गृहस्थांची एक सब कमेटी नेमण्यांत आली. ज्ञा. प्र.

रशिया—— रशियाच्या बादशहानें किसनेफ एथें ता० २३ रोजीं फौजेची पाहणी करून सर्वांस शौर्यानें लढण्याविषयीं उत्तेजन दिलें.—— नंतर त्यानें लढाईचा जाहिरनामा प्रसिद्ध केला त्याचा सारांश हा कीं, "बासनिया, बल्गेरिया व हर्जेगोविना या प्रांतांतील ख्रिस्ती लोकांवर तुर्क सरकारचा जो जुलूम आहे तो दूर होऊन त्यांची स्थिति सुधरावी ह्मणून आह्मी बहुत वर्षांपासून प्रयत्न करीत आहों. तुर्क सरकारानें राज्यकारभाराची सुधारणा करावी ह्मणून इतर राजांच्या मदतीनें आह्मी आज दोन वर्षें बोलणें चालविलें होतें तें सर्व निष्फळ झालें. सर्व सामोपचार व्यर्थ झाले ह्मणून आह्मास युद्धाची तयारी करणें भाग झालें. या सर्वांचें कारण तुर्क सरकारचा हट्ट आह्मास एकट्यास तुर्कींशीं संग्राम करावा लागेल असें जें भाकीत आह्मी मास्को एथें आपल्या भाषणांत केलें होतें ती वेळ आतां आली. ह्मणून आपचा पक्ष यथान्याय आहे अशा खातरीनें आह्मी ईश्वराचें सहाय मागून आपल्या सैन्यास तुर्कींची सीमा उल्लंघून जाण्याची आज्ञा करितों."—— नंतर त्याचे मुख्य प्रधान प्रिन्स गार्चेकाफ यांनीं युरोपांतील इतर सरकारांस पत्रें पाठविलीं त्यांत असें लिहिलें कीं, सर्व युरोप जो न्याय सामोपचारानें मागत होते पण मिळाला नाहीं, तो जबरीनें मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत रशियाचा पक्ष योग्य आहे.—— रशियन फौजेनें आलेक्झांड्रापोल एथें तुर्कींची सीमा उल्लंघिली.—— रोमेनिया प्रांतांत रशियन फौजेचा एकसारखा प्रवाह येत आहे; तेथील सरकारानें आपली फौज मध्यप्रदेशीं नेली.

तुर्कस्थान—— इंग्लिशांचा नवा वकील मि० लेअर्ड हा कास्तांतिनोपल एथें पोंहचला. नंतर त्याची व सुलतानाच्या मुख्य वजिराची भेट झाली तेव्हां त्यानें सांगितलें कीं, तुर्क सरकारानें रशियाच्या खलीत्यांतील ह्मणणें अमान्य केलें यावरून आत इंग्लिश सरकारचें सहाय मिळण्याचा कांहीं संभव राहिला नाहीं.— ता० २१ एप्रिल रोजीं रात्रीं रशियाचा वकील तुर्क सरकारचा सर्व संबंध तोडून कन्स्तांतिनोपल सोडून गेला.—— तुर्क सरकारानें रोमेनियाचा राजा प्रिन्स चार्लस यास विनंती केली आहे कीं, आमच्या फौजेस मदत करून डान्युबनदी उतरण्याविषयीं रशियन लोकांस प्रतिबंध करावा. सुलतान स्वतः आपल्या सैन्याच्या बरोबर लढाईस जाणार आहे तुर्क सरकारानें मुद्दाम एक वकील काबुलास पाठविला आहे. तुर्की फौजेस मदत करण्याविषयीं तुर्क सरकारानें प्रिन्स चार्लस यास जो खलीता पाठविला तो रोमेनियाच्या पार्लमेंट सभेपुढें ठेवला जाईल त्याचा निकाल होईपर्यंत रोमेनियाची फौज माघारी जाणार. तुर्क सरकारचा परराज्यसंबंधी प्रधान सफवेत पाशा यानें रशियाच्या जाहिरनाम्यावरून युरोपांतील सरकारास असें लिहिलें आहे कीं "रशियानें विनाकारण तुर्कांवर शस्त्र धरलें आहे सन १८५६ च्या तहनाम्यांत तुह्मी करार केल्याप्रमाणें आतां या प्रकरणांत मदत केली पाहिजे." सुलतानानें आपल्या फौजेस असा जाहिरनामा केला कीं हल्लींच्या लढाईत रशियन लोकांनीं आगळीक केली यास्तव इजविषयींची सर्व जबाबदारी त्यांच्याच माथ्यावर आहे. आपल्या राज्याचें संरक्षण व्हावें ह्मणुन मी करवतील तितके प्रयत्न करीन व पाहिजे तर पवित्र झेंडा आपल्या हातीं धरून स्वतः सैन्याच्या अग्रभागीं चालेन" ज्ञा. द.

लढाई— रशियाची १७,००० फौज रोमेनिया प्रांतांत आली. त्याचप्रमाणें आलेक्संड्रोपोल एथें रशियन फौजेनें तुर्कींच्या सीमेचें उल्लंघन केलें. अर्दा, हान व गुमरू एथें रशियन लोकांनीं लढाईस आरंभ केला. बातूम शहराजवळ चरुकसोन ह्मणून गाव आहे तेथें दोहों सैन्यांचीं लढाई झाली तीविषयीं तुर्की सेनापतीनें आपल्या सरकारास असें लिहिलें कीं दुसऱ्या दिवशीं बृहस्पतवारीं सकाळीं ही लढाई सुरू झाली, आणि आह्मी रशियनांचा हल्ला हटवून त्यांचे ८०० लोक मारले. त्याच लढाईविषयीं रशियन सेनापतीनें आपल्या सरकारास असें लिहिलें कीं बातूम एथें जी लढाई झाली ती विशेष नव्हती व आपलें नुकसान फार थोडें झालें. तुर्क लोकांनीं कालाफात शहर घेतलें अशी बातमी होती पण ती खोटी आहे. ते मुळीं डान्यूब नदी उतरून पलीकडे गेलेच नाहींत. काळ्या समुद्राच्या कांठीं पोटी ह्मणून बंदर आहे त्यावर तुर्कलोकांनीं गोळ्यांचा भडिमार चालू केला. रशियन लोकांनीं तुर्क लोकांचीं कित्येक गावें घेतलीं. तुर्क लोकांनीं गालाल्स एथें आपलीं लढाऊ लोखंडी गलबतें आणून ठेवलीं आहेत. रशियन सेनापतीनें असा जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे कीं तुर्कांचा मुलूख जिंकावा असा ही लढाई करण्यांत आमचा हेतु नाहीं तर तुर्कस्थानांतील गांजलेल्या ख्रिस्ती लोकांचें संरक्षण करावें इतकेंच आमच्या मनांत आहे.

यंदा [illegible] ए. च्या परीक्षेकरितां उमेदवार १५० आले होते त्यां पैकीं ६० असामी पास झाले.

"एतद्देशीय वर्तमानपत्रें" या विषयावर डा० वर्डवूड साहेबांनीं विलायतेंत सोसायटी आफ आर्टस या सभेपुढें दिलेल्या व्याख्यानाच्या प्रति हिंदुस्थान सरकार पुस्तकरूपानें छापून सर्व हिंदुस्थान भर त्यांचा फैलाव करणार आहे.

इंदूर— महाराज होळकर यांच्या गिरणींत गेल्या वर्षी ५६,०३९ मांजरपाटाचे तागे व १३.२१४ धोतरजोडे इतकें उत्पन्न झाले. यावर्षी एकंदर ४७५।४८ रत्तल कापड व ४,२६,८०३ रत्तल सूत विकलें गेलें असें इंडियन मिररवरून कळतें. इतकें कापड निघालें तथापि अधिकाची आवश्यकता होती असें ह्मणतात.

टर्कीचे सुलतान आपण स्वत: रशियाबरोबर युद्ध करण्यास टर्कीच्या सैन्याचें आधिपत्य घेतील. इं. प्रॅ.

निजामच्या दरबारांत हल्लीं बरींच महत्वाचीं कामें चाललेलीं आहित. हुसेनामिया याचा खटला आज बरेच दिवस चालू असून प्रधानसाहेबांच्या जवळच्याच एका नातलगावर एक बराच महत्वाचा आरोप आहे. तो हल्लीं गोवळकोंडच्या किल्ल्यांत अटकेंत आहे आरब लोकांस [illegible] देत आहेत. पिडक जिल्ह्यांत एका जमिदाराचा गांव त्यांनीं अडकवून ठेवला आहे व त्याच्या पारपत्याकरितां एक फौजेची टोळीही रवाना झाली आहे. असें डे. टा. पत्रकर्ता लिहितो. अ द.

चमत्कारिक प्राणी.— हुबळी एथें एका मनुष्यानें कोलंबो (सिंहलद्वीप) एथून एक चमत्कारिक मूल आणिलें आहे. यास चार हात चार पाय असून डोकें एकच आहे. गळ्याचे खालील भागापासून याचें शरीर दुभागलेलें असून एक भाग पुरुषा सारखा व दुसरा स्त्री सारखा आहे. या मुलास त्यानें कुजूं नये ह्मणून दारूंत घालून ठेविलें आहे व तो ही मौज हजारों लोकांस दाखवून पुष्कळ पैसे जमा ककरीत आहे.

काश्मीरचे महाराज जम्मू एथें कांहीं घाट बंधाऱ्याचीं वगैरे कामें सुरू करणार असून काश्मीर पासून दोन मैलांवरून लोटयांनीं नदीचें पाणी शहरांत नेणार ह्मणून समजतें.

एक युरोपियन नागपुरच्या रस्त्यानें सहल करीत असतां एका कुणब्यास कांहीं कारणावरून धरिलें आणि रामदयाळ नांवाचा म्युनिसिपालिटी कडील शिपाई तेथें नजीकच होता त्यास त्या कुणब्याचें डोकें उडविण्यास सांगितलें. रामदयाळ साहेबांचे बोलणें ऐकून चकित झाला. साहेब त्या कुणब्यास शिपायाचे स्वाधीन करून चालते झाले व शिपायानें कुणब्यास सोडून दिलें असें पाहून परतले व रागानें त्यास कां सोडून दिलें असें ह्मणून खिशांतून चाकू काढून रामदयाळ यास भोसकला; त्या योगेंच त्या बिचाऱ्या ब्राह्मणाचा शेवट झाला. साक्षीदारांच्या सांगण्यांत साहेब हे दारूच्या अमलांत होते असें आलें, परंतु साहेब ह्मणाले कीं, मी वेडा होतों. डाक्टरानें सांगितलें कीं, हा वेडा मुळींच नव्हता. एकंदरीत ज्युरीनें तो शुद्धीवर नव्हता ह्या सबबीवरून गोऱ्यास सोडून दिलें.

सिलोन बेटाच्या काठीं किनाऱ्यावर एके ठिकाणीं, ज्या माशा पासून मोतें पैदा होवात त्या माशाची उत्पत्ति आहे. यां ठिकाणचे सन १८७७ सालचे मोतीं काढण्याचें काम तारीख १४ एप्रिल रोजीं संपलें. या सालीं सदर्हू कारखान्याचें उत्पन्न १,८९,००० रुपये झालें.

येत्या जुलई अखेर मुलतानपासून सक्कर पर्यंत रेलवेचा रस्ता पुरा होऊन त्यावरून गाड्या जाऊं येऊं लागतील. या रेलवेचा हल्लीं ११३ मैल रस्ता तयार असून या महिना अखेर १४० मैल तयार होईल. सक्करच्या पुढेंही गाडीचा रस्ता करण्याचा सरकारचा इरादा आहे.

होळकर सरकारचे रेलवे रस्त्यावरील चोरल नावाच्या घाटाचें काम चाललें आहे तें येत्या अक्टोबर महिन्याच्या अखेरीस पुरें होईल व खंडवापासून इंदूर पर्यंत आगगाडी जाण्या येण्याची सुरवात थोड्याच दिवसांत होईल असा अजमास आहे. ने. ओ.

## विवाहविज्ञान.

या विषयावर गेल्या बुधवारीं डा० सखाराम अर्जुन यांनीं मुंबईत मराठी ज्ञान प्रसारक सभेपुढें सुरस व्याख्यान केलें. हा विषय मोठ्या अगत्याचा आहे आणि व्याख्यानकार हे वैद्यशास्त्राचे चांगले माहितगार व अनुभवी असल्या कारणानें त्यांनीं सांगितलेले अभिप्राय सर्वांनीं विच्यार करण्यासारखे आहित

विवाह ह्मणजे काय हें कोणास सांगायास नको, तसेंच विवाह हा मनुष्याच्या संसारसुखाचें स्थान व पुढील संततीचें मूळ हेंही सर्वांस माहित आहे. तथापि याच्या संबंधानें हितावह अशा नियमांचा अव्हेर करून आह्मी अनहितकारक अशा किती समजुती व चाली यांस धरून चालत आहों बरें ? इतर कित्येक प्रकार प्रमाणें या प्रकरणीं देखील आमची हल्लींची स्थिति पूर्वींच्यापेक्षां निकृष्ठ आहे. ह्मणून हा विषय व्याख्यानकारानीं हातीं घेतला असें दर्शविलें.

आतां विवाहाच्या संबधानें मुख्य गोष्टी व्याख्यानांत सांगितल्या त्याचा थोडक्यांत सारांश असा:—

विवाहास योग्य वय पुरुषास २५–३० पर्यंत व स्त्रियांस १५।२५ पर्यंत असावें व वधु आणि वर याच्या वयांत दहा वर्षांचें अंतर असावें. स्त्रियांची वाढ लवकर होते सबब हें अंतर असणें अवश्य आहे. योग्य वयांत विवाह झाला तर पुरुषांच्या शरीरास उत्तेजन प्राप्त होतें, रुधिराचें अभिसरण जोरानें चालतें, शरीरांत आवेश व उष्ण मानाची वृद्धि होते, स्नायू बळकट होतात आणि चालणें जोराचें, बोलणें गंभीर अशीं प्रौढ पुरुषत्वाचीं सर्व लक्षणें आविर्भूत होतात. तेव्हां अशा पुरुषाची संतति सुदृढ व शक्तिमान असते यांत नवल नाहीं परंतु हल्लीं समवयी वधुवरांचीं बाळपणीं लग्नें होतात तेणेंकरून संतति क्षीण व रोगी होऊन पुरुष बलहीन होतो आणि त्यांस वृद्धपणा लवकर प्राप्त होतो.

वधुवरें कशीं असावीं या संबंधी अभिप्राय दिले ते येणें प्रमाणें:—

आरोग्य— प्रत्येक पुढें होणाऱ्या पतीनें (आमच्या देशांत सासुसासऱ्यांनें) जी मुलगी लक्ष्यांत आणली असेल ती निरोगी असल्याचीं चिन्हें अवश्य पहावी.

१. वेड अथवा क्षय हे विकार ज्या कुळास जडले असतील त्या कुळांतील मुलगी वर्ज करावी, कारण ती आपल्या पतीस दु:ख देण्यास कारणभूत होईल इतकेंच नाहीं तर संततीस ह्या दुर्धर विकारांत घालण्याचा संभव आहे. [illegible]

२. बाळपणी फार दिवस [illegible] वेळ आ[illegible] असलेली मुलगी कधीही सुखदायक [illegible] होणार नाहीं हें खास समजावें.

३. पांढरी फटफटीत मुखचर्या आणि मेणाच्या पुतळ्या सारखें अंग असणाऱ्या स्त्रिया जरी सशक्त असल्या तरी त्यांची संतति निरोगी होत नाहीं.

४. साधल्यास शहरांतल्या रहिवाशांनां देशांत खेड्यांत जन्मलेल्या व तेथें वाढलेल्या स्त्रिया पसंत केल्या तर त्यांच्या संसारसुखाची वृद्धि आणि संततीचें आरोग्य हा त्यांस मोठा लाभ होणार आहे. शहरांतल्या रहिवाशांचीं मुलें वाढण्यास फार संकटें पडतात हें आपणास सर्वांस माहित आहे, आणि तीन पिढ्या झाल्यावर त्यांचा कुळक्षय झाल्याचीं अगणित उदाहरणें सांपडतात.

५. गौरवर्णाच्या पुरुषानें किंचित सांवळ्या वर्णाची स्त्री करावी, हें संततीच्या संबधानें मोठें फायद्याचें कलम आहे. आई बापे गौरवर्णाचीं असल्यास मुलें हटकून पिंडरोगी निपजतात. (पिंडरोगी मुलें कोणतीं? ) हीं रोगी प्रकृति फार वाईट आहे ! आणि तरुण वयांत कफक्षय त्यांस गांठल्याविना रहात नाहीं. त्यांत या रोगाचा लेश पूर्वजांत असला तर मग बोलण्याची सोय नाहीं.

६. वाईट स्वभावाची व कज्जेखोर सासू असल्यास मुलाविषयीं विच्यार मोठाच आहे त्यांत तिची एकुलती एक मुलगी असली तर जावयाच्या पापाचें शिखरच समजावें तथापि पुष्कळ मुलीं पैकीं जर ती एक आहे तर ती सदृढ व सुस्वभावाची निघेल अशी आशा बाळगतां येईल.

७. बुद्धि, कौशल्य, आणि साधेपणा, या केवळ दैवयोगाच्या गोष्टी समजल्या पाहिजेत. त्या सर्वांस प्राप्त होतात असें नाहीं.

८. बायकोकडून धनप्राप्तीची आशा पुरुषानें बाळगून विवाहसंबंधांत पडणें हें कधींही सुखावह होणार नाहीं. बायकोचा सांभाळ करण्याचें सामर्थ्य असल्याशिवाय विवाह करूं नये हा नियमच ठेवला तर बायकोकडून धनप्राप्तीचा विच्यार नको. स्त्रियांनीं आणलेला पैका त्या स्वत:च उधळतात, आणि बायकोच्या द्रव्यावर उपजीवन करणाऱ्या नवऱ्याचें सुख फारच कमी असतें, याविषयीं फारशी चर्चा नको तो पुरुष स्त्रीविख्यात होतो, व "स्त्री विख्यातो धमोधम:" असें वचन तर आहेच.

९. नवऱ्याची इज्जत, कूळशीळ व अब्रू जशी असेल तशी बायकोची असावी. अशी न जमली, व कांहीं अंतर असलें तर बायकोचें कूळ नवऱ्याच्या कुळापेक्षां उंच असावें हें बरें.

मनुस्मृतींत दहा कुळें वर्ज करण्यास सांगितलीं आहित त्यांतही भावार्थ वर सांगितल्याप्रमाणेंच आहित. १ पुरुष उत्पन्न होत नसणारीं कुळें. २ स्त्रीपुरुषाच्या शरीरावर दीर्घ केश उत्पन्न होतात तीं कुळें. ३ अर्श (मूळव्याध) रोग असणारीं कुळें क्षयरोगयुक्त कुळें. ५ अग्निमांद्य रोगयुक्त कु[illegible] [illegible] अपस्मार रोगयुक्त कुळें. ७ कु[illegible] कुळें. ९ ज्या कुळांत जातकर्मादि संस्कार करीत नाहींत. १० ज्या कुळांत वेदाचें अध्ययन व अध्यापन [illegible]

कन्या संबंधीं निषेध सांगितल्याप्रमाणें अर्ज करतो असा:— १ कपिलकेशा (करावी [illegible]शयुक्त) २ आधिक अवयवयुक्त. ३ नित्य रोगिष्ट ४ लाभ रहित ५ अति लोभयुक्त ६ अवाच्य ७ अति कर्कश भाषण करणारी ८ पिंगट नेत्रयुक्त. अशी कंन्या करूं नये. सु. प.

[पुढें चालू.]

## जाहिरात.

## विविधज्ञानविस्तार.

### मासिकपुस्तक.

[कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.]

शास्त्रीयविषय, आरोग्यविषय, भाषा सुधारणा, मनोरंजन, पुस्तकपरीक्षा, सुंदर ग्रंथांचीं भाषांतरें, इतिहास, विख्यात पुरुषांचीं चरित्रें, कविता इत्यादि विषयांचा समावेश करणारें या प्रकारचें, सर्व महाराष्ट्र देशामध्यें हें एकच पुस्तक आहे.

किंमत.

| | रु. आ. |
|---|---|
| वर्षाची आगाऊ .......... | ३—० |
| मागाहून. ....... | ४—८ |
| सहामाही आगाऊ. | २—० |
| किरकोळ अंकास | ०—६ |
| टपाहांशील वर्षाचे. | ०—६ |

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं मुंबईंत काळकादेवीच्या रस्त्यावर देवीसमोरील विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत व्यवस्थापक यांच्या नांवें वर्षाची अगाऊ वर्गणी (रु. ३ आ. ६) सुद्धां पत्र पाठविल्यास पुस्तक चालू होईल

व्यवस्थापक, विविधज्ञानविस्तार.

मराठ्यांच्या इतिहास[illegible] काढल्या [illegible] अशा आमचे लोकांनीं [illegible] नाहीं. अशा पां[illegible] व मुसलमान यांच्या रा[illegible] मकाळीं ध[illegible] बखरी छापून प्रसिद्ध क[illegible] त कोणी यत्न केला नव्हता, त्या आमचे पुस्तकांतून प्रसिद्ध व्हावयास आरंभ झाला आहे; तसेंच नागपुरकर भोसले यांचा निराळा इतिहास अद्याप कोणी लिहिला नाहीं तोही या पुस्तकांत येत आहे. हें पाहून राजेरजवाडे विशेषत: संस्थानिक व वऱ्हाडप्रांतस्थ लोक याकडे लक्ष देतील अशी उमेद आहे.

हे पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र

REGISTERED NO. 6,1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ | अकोला, रविवार ता. १३ माह मे सन १८७७ इ० | अंक १९

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| टांकहाशील | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा.

सोनाजी वलद एकुजी रहाणार सुपखेड तालुके व जिल्हे वाशीम यास खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं आह्मी व तुह्मी भाऊबंद आहोत. आपल्या मालकीची झाडें आंब्याचीं सुमारें ३०० आहेत यांतील झाडावरील फळें एकंदर उतरल्यावर एकत्र मिळून आपापले हिशाप्रमाणें घेत असतां हल्लीं या साळचा वार अजून न देतां तुह्मी घेऊन जात आहा तर वडिलोपार्जित प्रमाणें फळें आह्मांस यावीं न दाल तर तुह्मावर नुकसानीबद्दल दावा वगैरेकरितां सरकारांत जावे लागेल. या नोटिसीचे उत्तर १५ दिवसांचे आंत यावें नाहीं तर नोटिसीचे खर्चासुद्धां दावा केला जाईल कळावें ता. २ मे सन १८७७ इसवी.

( सही ) पमाजी वलद भवानजी ठाकरे वस्ती सुपखेड दस्तुर खुद

---

नोटिस.

नोटिस येसाजी तुकाराम वलद भिकाजी व सदू वलद अर्जुनी काळबांडे वस्ती मौजे आलेगाव परगणे पातुर तालुके बाळापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी तारीख ९ माहे एप्रिल सन १८७७ इसवीची नोटिस दिली त्याचा जबाब खालीं लिहिल्याप्रमाणें.

तुह्मी लिहिता कीं, बारा तेरा वर्षें झालीं शेतांत तुमची वांटणी नाहीं असें नसून दोन वर्षे सन १२८५।८६ फसली सालीं तुह्मास मौजे गाळेगांव एथील शेतांत विहीर खोदण्याची आहे त्यास हिशाप्रमाणें पैसा द्यावयास मजजवळ पैसा नसून त्याच्या ऐवजी मी तुह्मास मौजे गाव एथील शेतें ६ व मौजे आलेगाव थील ५ शेतें येकूण ११ असें दोन वर्षांचे उत्पन्न करून विहिरीचे खर्चास लावावें असा ठराव होऊन त्याप्रमाणें उत्पन्न खर्चास लावावें आणि तीन नंबरांत आल पेरली त्याजबद्दल मी तुह्मास आलीचे बी पांच मण आलेगाव मापाचे दिलें तें सन १२८६ सालास भरले त्याचा माल विहिरीच्या खर्चास दिला नाहीं त्यापैकीं तीन मण पेरलीं बाकी दोन मण तुपच्या ताब्यांतून नारायणसा लाड जप्त करून घेऊं लागला.

तुह्मी लिहिता कीं, तुमच्या आमच्या वाटण्या झाल्या पण तसें नसून वाटण्या होणें आहेत जसे ढोर, जवारीचीं पेवें ६ व भांडीं वगैरे सर्व जिनगी वांटून यावी याजबद्दल पावत्या फारकती झाल्या पाहिजेत.

शत साल्या बद्दल तुह्मी आपले हिशाचे रुपये ३१०६ नोटिस पावल्या तारखेपासून आठ दिवसांत द्यावे ह्मणता त्याचे कारण असें कीं एकादा गृहस्थ आपले कुटुंबास लुगडे घेतो आणि शेजाऱ्यास ह्मणतो कीं, तुह्मी आभार समजावे त्याप्रमाणें तुमचें भाषण आहे हें बरोबर नाहीं मी तुमचे हिशाचा पैसा कशाकरितां देऊं.

मौजे गाळेगाव एथील शेतें ३ यांत सन १२८६ फसली सालीं आल पेरण्याची होती आणि तुह्मी मजला असें कळविलें होतें कां २ वर्षें भरलीं ह्मणजे शेतें परत घ्याल याजकरितां आतां बी द्यावें त्याप्रमाणें सदरील बीं दिलें.

तुह्मी लिहिता कीं शेताच्या वाटण्या पाटील कुळकर्णी यांचे हातानीं झाल्या हें मिथ्या आहे कारण तहशिलदार साहेबाकडे लोक कशाकरितां फिर्याद जाते. गावांत निकाल होते तर लोक फिर्याद जातेच ना.

तुह्मी लिहिता कीं मजजवळून शेताचा राजिनामा घ्यावा व तुह्मी द्यावा तर माझी शेतें माझे हिशापैकीं कोणास राजिनाम्यानें देत नाहीं व घेत नाहीं माझे हिस्से बक्षिस करून देईन अगर विक्री करण्यास मी मालक आहे त्याजबद्दल तुमचा हिशावर हक्क नाहीं.

येणेंप्रमाणें नोटिस पावल्या तारखेपासून आठ दिवसाचे आंत सर्व जिनगी घरांतील वडिलोपार्जित आहे त्याच्या वाटण्या गावांतील संभावित लोकांचे हातानीं करून त्याजबद्दल पावत्या व फारकत्या झाल्या पाहिजेत जर तसें न होईल तर दिवाणींत दावा करून नोटिसीचे खर्चासुद्धां भरून घेतले जाईल. कळावें, तारीख १ मे सन १८७७ इसवी.

( सही ) लक्ष्मणजी वलद सिंगराजी दस्तुर खुद

---

नोटिस.

ति. रा. श्रीधर सखाराम कुळकर्णी रहाणार मौजे साकळी बुजरुख तालुके चिखली जिल्हे बुलढाणें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुमचा आमचा शराकतीचा दस्तैवज गहाणखत रुपये १८० चा अंबादास बाळकृष्ण भट साकळीकर याचा आहे. त्या दस्तैवजाचे रकमेचें मागणें तुह्मी आह्मी मिळून करण्यास अथवा दिवाणींत तजवीज करण्याविषयीं बहुत वेळ आपणास कळविलें शेवटीं गणेश सिताराम वकील कोर्ट बुलढाणें यांचे मार्फत आपला निरोप व त्या बरोबर दस्तैवज आला कीं आह्मी त्या कुळावर फिर्याद करण्यास इच्छित नाहीं व तुह्मी आपले हिशाचे रुपये वाटतील त्या रीतीनें वसूल करावे असें वकीलमार्फत कळविल्यावरून आह्मी आमचे निमे हिश्याबद्दल रुपयांचा निकाल आपसांत करण्याचा विच्यार चालू आहे त्यांत आह्मास कांहीं त्यांनीं वसूलही दिला आहे तुह्मी आपले निमे हिशाचे रकमेची व्यवस्था करण्यास तुह्माकडे दस्तैवज व निरोप पुष्कळ वेळां पाठविला असून तुह्मी दस्तैवज घेतला नाहीं ह्मणून ही नोटिस मला देणें प्राप्त झालें. तर या नोटिसीनें इतकेंच कळविणें आहे कीं सदर्हू दस्तैवजाची मुदत ता. २८ मे सन १८७७ इसवी रोजीं पुरी होत आहे. करितां आपले मर्जीनुरूप दस्तैवज मागून घेऊन आपले निमे रकमेबद्दल पाहिजे ती तजवीज करावी. त्या दस्तैवजाचे संबंधानें तुमचें नुकसान झाल्यास मजकडे कोणत्याही प्रकारें जबाबदारी नाहीं. तुह्मी दस्तैवज वगैरे न घेतल्या कारणानीं मला ही नोटिस देणें भाग पडलें सबब नोटिसीचा खर्च आपण देण्याची तजवीज करालच न दिल्यास रीतीप्रमाणें तजवीज करून घेतां येईल. कळावें, तारीख ९ माहे मे सन १८७७ इसवी.

( सही ) ज्यानकीराम वामन कुळकर्णी वस्ती साकळी बुजरुख दस्तुर खुद

---

नोटिस.

सदू बाळमुकुंद आगरवाले याजकडून नोटिस देणार चिमाबाई भ्रतार बाळमुकुंद रहाणार बाळापुर इजला खालीं सही करणार याजकडून अशी नोटिस देण्यांत येते कीं, मयत बाळमुकुंद शंकरदास यांणीं ५००१ पांच हजार एक रुपये आमचे पाशीं अशा शर्तीवर ठेविले कीं, त्याचे ठेविलेले बायकोचा ( तुमचा ) मुलगा सदू हा अज्ञान आहे सबब सदर्हू रुपयांचे पुंजीवर दुकान चालून नफा नुकसान होईल. त्यांत निमे निमे तकसीम ठेवावी आणि सदर्हू मुलगा सदू हा वयांत आल्यावर त्याचे स्वाधीन सदर्हू दुकानांतील पुंजी हिशेबानें जी निघेल ती त्याचे स्वाधीन करावी. त्या शर्तीप्रमाणें मी आज पर्यंत व्यापार चालविला आणि सदर्हू सदू वयांत आल्यावर रुपये व दुकान सदर्हू शर्तीप्रमाणें देण्यास राजी आहे परंतु त्याचे वयांत येण्याचे पूर्वी तुमचे ( चिमणाईचे ) स्वाधीन करीत नाहीं. कारण हल्लीं जर स्वाधीन केले तर अज्ञान वयांत आल्यावर त्याचे रकमेचा मी जबाबदार ठरलों कारण मैतानें तुमचे स्वाधीन न करितां माझे इतबारावर य करितां ठेविले आहेत कीं, सदर्हू सदू सज्ञान होई पर्यंत ती रकम कोणास देऊं नये परंतु तुह्मी सरकारी अधिकाऱ्याकडे अर्ज करून रकम तुमचे स्वाधीन करावी असा हुकूम सरकारचा कोणी योग्य अधिकारी यांणीं दिला असतां वर लिहिल्याप्रमाणें मी रकम देण्यास राजी आहे. तुह्मी असें न करितां दिवाणींत फिर्याद करून विनकारण खर्च वाढवाल तर त्या खर्चाचा कोणतेही प्रकारें मी जबाबदार होणार नाहीं. कळावें तारीख ९ माहे मे सन १८७७ इसवी.

( सही ) शिवलाल मिठुलाल दुकान बाळापुर दस्तुर खुद.

---

## पत्रव्यवहार

**या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.**

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

सोलापुराहून वि. वि. आपले एथील रिलिफ फंड कमिटीकडून इकडील दुष्काळानें व्यापलेल्या लोकांस मदत करण्याकरितां २०० रुपये आले त्याबद्दल एथील कमिटीनें अकोल्याचे लोकांचे आभार मानिले. पत्रकर्ते महाराज, हल्लीं सोलापुर शहर दुष्काळपीडित लोकांचें मुख्य स्थान असून अशा भयंकर व कठीण प्रसंगीं चोहीकडून चांगली मदत आल्याशिवाय लोकांचा बचाव होणें फार कठीण आहे. त्याबद्दल आपणास थोडीशी हकीकत कळवितों ती खालीं लिहिल्याप्रमाणें:—

या कमिटीकडून मुले, अंधळे, पांगळे लुले, बाळंतिणी व दुसरे अशक्त लोक ज्यांत सरकारानें काढलेल्या कामावर जाण्याची शक्त नाहीं. अशा पांच हजारांवर लोकांस दररोज सकाळीं धान्य व शिजलेलें अन्न देण्यांत येत आहे. हल्लीं कमिटीपाशीं असलेली शिल्लक चालू खर्चाचे मानानें सुमार एक महिना पुरेल असा अदमास असून दुष्काळसंबंधानें धर्मादयाचें काम अद्याप तीन महिने चालणार आहे तर ही वरील हकीकत आपले वऱ्हाडचे दयाळू, परोपकारी व उदार लोक यांचे पुढें योग्य विचारासाठीं ठेवून इकडील दुष्काळपीडित लोकांचे प्राणसंरक्षण करण्यासाठीं जितकी जास्त मदत देववेल तितकी देण्यांत यावी अशी या कमिटीचे तर्फेनें व हजारों लोक जे अन्नासाठीं फिर

स आहेत त्यांचे तर्फेनें आपणासर्वांस विनयपूर्वक प्रार्थना आहे कळावें तारीख ३ माहे मे सन १८७७ इसवी.

एक सोलापुरकर.

## एक सोपी कविता

**काळ्या व गोऱ्या स्त्रीचें भांडण.**

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. काळी गोरीचें भांडण म्हणून एक सोपीशी कविता आपणाकडे पाठविली आहे ती मर्जीनुरूप छपून प्रसिद्ध करण्याची मेहेरबानी व्हावी.

गौरा कृष्णा दोघि भांडती लक्ष द्या पंडित कृष्णेला जिंकाया पाहत ॥ ध्रुवपद ॥

अग कृष्णे तूं खरी सभाग्या परि संततिच्या गुणें । असुनि सर्वही दिसतें उणें ॥ ममआत्मज पहा कसे गुंतले खर्चुनि आपुलीं मनें । मिळविती युक्ति प्रयुक्ती धनें ॥ तुझे आळशी अणि दुर्व्यसनी सदा सर्वदा रत। कृष्णेला जिंकाया पाहत ॥ १ ॥

गौरा बाई सान वपू धन वैभवहि तुज नसे । मिळुनि ह्मणशी पण ही रीत नव्हे॥ दुर्व्यसनी आळशी तुझ्यान कैशापरि स्थापवे । त म्हणुन चहूकडिल ओणवे ॥ दाब कराया बैरि किती तरि टपले अखंडित । कृष्णेला जिंकाया पाहत ॥ २ ॥

तुला गर्व पूर्विचा धेरडे आलें माझे मना । नुघडसी नेत्र ह्मणुनि उमजना ॥ मम बालका वर्णितां शीण ये वाचस्पतिच्या मना । तिथ इतरा कैची कल्पना ॥ स्वकौशल्यें जग व्यापिलें साधुनि आपुलें हित । कृष्णेला जिंकाया पाहत ॥ ३ ॥

मी धेरडी ग मुलि अंगीं तुझे तारुण्याचा ठसा । घेतला अनुभव मी फारसा ॥ धन यौवन डोंगरचें पाणि यांचा काय भरवसा । क्षणामधें बसद्दनि पडतो फसा ॥ सर्वां भूति नय नीति वागवी । थोर जना विदित कृष्णेला जिंकाया पाहत ॥ ४ ॥

वडिलपणाचें नातें मिरवुनी न्याय नीति सांगसी । परि अन्याय कुठे लक्षिसी॥ मम पद्धति वानति सर्वही कां न मनीं आणसी । महमुद स्वारि विसरली कशी ॥ तुझतां देवुनि हस्त पाळिली योग्य तुझी संतत कृष्णला जिंकाया पाहत ॥ ५ ॥

शौर्यें धैर्यें मनें धनेशीं मंडित माझे सुत । त्यागुनि ऐहिक चित्सुखीं रत ॥ तुच्छ मानुनि भोग दिगंबर निराहारि विचरत । कोण तिथें अजापाळ किंचित॥ अशी संधि साधुनी निशाचरसुखें मला लूटित कृष्णेला जिंकाया पाहत ॥ ६ ॥

लावुनि अंगीं राख हिंडती वनां भणंगापरि । वानिसि तया किती कुसरी ॥ आत्मज माझे राज्य भोगिती साऱ्या पृथ्वीवरी । तिष्टति दारीं शक्ति परोपरी ॥ खरी कृतघ्न मला भाससी शिक्षण दिधलें मित कृष्णेला जिंकाया पाहत ॥ ७ ॥

गरिब गौरा बाइ तुला हें ऐश्वर्य आलें कोठुन । वंचिसी मज माझें घेऊन ॥ तान्हि बालकें माझीं दुग्धाविण आक्रंदती निशिदिन । वर्णी मम अर्भक पीतिन ॥ रामात्मज या सांगे दोघिला सोडा वर्ण भेद अनुचित कृष्णेला जिंकाया पाहत ॥ ८॥

आपला दास

"रामात्मज"

वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख वद्य ९ शके १७९९

## टर्की व रशियन यांची लढाई

या आठवड्यांत लढाईचे संबंधानें ज्या खबरा आहेत त्या अशाः—

तिकडे पर्जन्य पडत आहे यामुळें रूस लोकांच्या फौजा डान्युबनदी उतरून तुर्कस्थानांत जाण्यास व घनचक्कर लढाई सुरू होण्यास अजून महिनाभर पाहिजे असें ह्मणतात. तुर्कस्थानच्या सुलतानानें युरोपांतील सर्व राजास लिहिलें होतें कीं आह्माशी रशियानें विनाकारण लढाई मांडली आहे ह्मणून सन १८५६ व १८७१ सालचे तहनाम्याप्रमाणें आपण सर्वांनीं मध्यस्थी करून कलह मिटवावा. परंतु कोणीही ही गोष्ट कबूल केली नाहीं. इटालियन सरकारानें आह्मी दोहो पक्षांसही मिळणार नाहीं असें प्रसिद्ध केलें. ग्रीस देशाचे शिपाई व सरदार तुर्कस्थानावर जाण्यास फार उत्सुक आहेत व ते उचल करिताहेत पण वरिष्ठ आफिसर त्यांस मना करीत आहेत.

फ्रान्स सरकारानें आपण लढाईंत पडणार नाहीं असें जाहीर केलें. इजिप्त देशानें रशियास मिळावें अशी फ्रान्सची इच्छा होती पण तसें घडून आलें नाहीं. घडतें तर इंग्लिश सरकारास त्यांत पडावें लागतें. इजिप्तच्या खेडवीनें लढाईचे खर्चाकरितां ४८ लक्ष रुपये कर बसविला व तुर्कस्थानास मदत करण्याकरितां फौज रवाना केली, व आणखीही लागली तर पाठवू पण पैशाची मदत आपल्याकडून होणार नाहीं असें कळविलें. लढाईचे संबंधानें सुएजचे कालव्याकडे कांहीं गडबड होऊ नये ह्मणून इजिप्त देशानें १२००० फौज नवीन ठेविली. इंग्रज सरकार ही कांहीं फौज ठेवणार आहे. युरोपांतील सर्व राष्ट्रांनीं व्यापारास कांहीं घोटाळा न व्हावा या इरादाने अशी तजवीज चालविली आहे कीं कोणत्याही पक्षानें त्या कालव्यास उपद्रव करू नये असें ठरवावें— रशिया देशांतील सर्व फौज पाहिजे तेव्हां रणभूमीवर यावयास निघेल अशी सज्ज झाली आहे— तुर्कस्थानांतील रशियाचा वकील निघून गेल्यावर जर्मनीनें तेथल्या रशियन प्रजेस आह्मी संरक्षण करूं असें ह्मटलें होतें तें तुर्कस्थानानें मान्य केलें नाहीं व सर्व रशियन प्रजा आपले राज्यांतून हाकून द्यावी असाही बेत केला होता पण तो सोडून दिला— इंग्लिश सरकारानें दोहोंतून कोणत्याच पक्षास आपण मिळणार नाहीं असें प्रसिद्ध केलें आहे तथापि त्यांच्या राष्ट्रांत युद्ध साहित्याची कडेकोट तयारी चालली आहे. व त्यांनीं रोष्टर या गावीं सुमार ७१ पलटणी अशा तयार ठेविल्या आहेत कीं पाहिजे त्या वेळीं त्या परदेशांत पाठविता येतील असें लंडन टाइम्स मध्यें छापलें होतें पण तें खरें नाहीं असें आता वर्तमान आलें आहे— आस्त्रिया सरकारानें लढाई पासून आह्मी अलग आहो असें जाहीर केलें आहे पण आपले स्वतःचे हिता अनहिताचा संबंध आल्यास प्रसंगानुसार आपलें हित साधावें असा त्यांचा बेत आहे. इब्राहिल्या गावावर तुर्क लोकांनीं तोफांचा मारा चालविल्यामुळें तेथील रशियन फौज निघून गेली असें वर्तमान आहे— वाईट हवेमुळें रशियन फौज महिना पंध्रा दिवस डान्युबनदी ओलांडीत नाहीं व तों पर्यंत तुर्क लोक त्या बाजूचा आपला बंदोबस्त अधिक मजबूद करीत आहेत— रूस देशांत व रोमानिया देशांत पाठवावयाच्या तारेच्या बातम्या तुर्कस्थानाकडून पाठविण्याची बंदी झाली आहे — आर्मीनियाकडे रशियाची फौज गेली आहे ती ६०००० पायदळ ४००० घोडेस्वार ५००० तोफांचे लोक व ४२८ तोफा— तुर्कस्थानची त्याच्या सामन्या करितां राखलेली ३००००, फौज ३०९०० इरम्युलर फौज आणि १८० तोफा आहेत— रशियाची एकंदर फौज २७५००० पायदळ २००००, घोडेस्वार आणि ९०० तोफा इतकी आहे. त्यांतील ७ वी आणि १२ वी पलटण मिळून ६०००० पायदळ ४००० घोडेस्वार व २८८ तोफा उडिसा आणि सिवास्तोपल येथें आहेत. ८वी. ९वी, १०वी आणि ११वी या पलटणी मिळून १२०००० पायदळ, ८००० घोडेस्वार व ४३२ तोफा हीं किशनीफ एथें किंवा त्याच्या सभोवार आहेत. व काकेशसकडील फौज ६५ हजार पायदळ, ८००० घोडेस्वार व १८० तोफा इतकी आहे.

तुर्कस्थानची फौज बलगेरिया एथें ११५००० पायदळ, ३००० तोफखान्याचे लोक व २१६ तोफा इतकी आहे. त्याशिवाय मर्ना, शमला वगैरे किल्ल्यांतून पांच पांच हजार गनर्स आहेत. तुर्कस्थानचे सुलतानानें डिफेंडर आफ धि फेथ ह्मणजे धर्मसंरक्षक अशी आपणास पदवी घेतली आहे. एशिया मैनरमधील कार्स एथील लढाईंत रूस लोकांचा पराभव झाला व तुर्कीं फौजेनें त्यांस मागें हटविलें व रशियाचें नुकसानही बरेंच झालें असें प्रथम वर्तमान होतें पण तें खरें नाहीं असें मागून वर्तमान आलें आहे.

वीडिन एथील टर्की फौज कालाफाट वर तोफांचा हल्ला करीत आहे व रोमानियन फौज त्याचा प्रतिकार करीत आहे. रशियन फौज गुरगेवोकडे चालली आहे— रशियाचा बादशहा हार ८ वे तारखेस सेंटपिटर्सबुर्ग एथें येऊन दाखल झाला— रोम्यानियाचा प्रिन्स यांनें दरबारांत भाषण केलें कीं टर्की फौजेनें डान्युब किनाऱ्यावरील आमच्या बंदरावर हल्ले केलें त्यामुळें त्यावर शस्त्र उचलणें निरुपायानें आह्मांस भाग झालें आहे व आह्मी रशियास मदत करणार— इंग्लंडच्या पार्लमेंट सभेंत भाषण झालें कीं युरोपियन कान्सर्ट मधील स्वस्थतेकारितां रशिया जबाबदार आहे. आणि जर रशिया कान्स्टांटिनोपलवर हल्ला करणार नाहीं तर इंग्लिशास लढाईंत शिरण्याचें कांहीं कारण पडणार नाहीं— कासचें लढाईविषयीं वेगळे वेगळे रिपोर्ट आले आहेत. कोणी ह्मणतात रशियाचा पराभव झाला कोणी ह्मणतात तुर्कस्थानाचा झाला. टर्कीश डान्युबवरील रशियाच्या ठिकाणावर तोफांचा मारा चालवीत आहेत

डान्यूब नदीवर वेगवेगळ्या ठिकाणाहून हल्ले चालू आहेत. आणि रशियन लोक लवकरच नदींत घुसून रस्ता काढतील असा अजमास आहे. कन्स्तांतिनोपलची तार तारीख ९ मे

एशियामायनरकडील खबर आहे कीं, रशियन आर्मेनियाकडे चालले आहेत.

सेंटपिटर्सबुर्गची ९वे तारखेची तार आहे कीं, रशिया देशांत तिरक प्रांतांत लोक बेदिल झाले आहेत व त्यांचे परिपत्यासहुतरीकडून फौज रवाना झाली आहे.

---

**मि० म्याकिंटाश** साहेब उमरावती हाय स्कुलाचे माजी हेड मास्तर या आठवड्यांत ४ । ५ दिवस एथें होते ते शुक्रवारीं सायंकाळीं एथून मुंबईकडे गेले. त्यांस टाइम्स आफ इंडियानें तुर्कस्थानाकडील लढाईवर बातमीदार नेमलें असें वर्तमान आहे व तें बहुधा खरें असावें. कारण, तसें नसतें तर उर्दू अखबारावरील फिर्यादीची तोडजोड ते आपण होऊन करण्याचे खटपटींत न पडते. व केवळ "शाकाय लवणायच" यावर संतुष्ट न होते. कां तर पहिला कोर्ट लक्षण होता ह्मणजे ७वे तारखेस सोमवारीं मि० निकोलेटस साहेब यांणीं म्याकिंटाश साहेबाचा मुकदमा त्यांचे गैरहजिरीवरून डिस्मिस केला व ती गैरहजिरी सारी तास अर्ध्या तासाचीच होती. असें झाल्यावर दुसरे दिवशीं साहेबांनीं कोर्टांत जाऊन उर्दू अखबाराचे मालक पहिले दोन गृहस्थ व तिसरे एडिटर रा. रा. धोंडो बाळकृष्ण यांजवर नवी फिर्याद केली. व ती कोर्टानें फैलावर घेऊन चौकशीकरितां अर्कोटास १६ वी तारीख नेमिली होती. असें असतां ११ वे तारखेस गडबडीनें ३०० रुपयावरच तोड करून साहेब त्याच दिवशींचे गाडांतून मुंबईकडे गेले यावरून ते लढाईवर जाणार असें दिसतें खरें. एथेंही त्यांनीं युद्ध संग्राम चांगला मांडविला होता व त्यांची चांगली फत्ते झाली व पुढेंही होण्याचा रंग होता असें असतां नवें विकट साहसाचें काम पतकरून इकडील सुलभ सूत्रें एकदम अखडण्याचे त्यांस कां गों. हा अनुभव तर्कानें अस्तु ते लिहिणार ... आहेत व लोकांचे ज्या गोष्टीकडे प्रस्तुत विशेष लक्ष्य तिकडील वर्तमान त्यांच्या हातून टाइम्स सारख्या लोकप्रिय पत्रांतुन येणार आहे तेव्हां त्याचे परंपरेनें दर्शन आह्मास आतां नियमशः होईल असें दिसतें आणि तें कदाचित न झालें तरी त्यांचें ... अलीक च्यातऱ्हा गोष्टीवरून दीर्घकालपर्यंत लोकांचे हृदयांतुन जाणार नाहीं हें खचित आहे

विद्या खात्याकडील त्यांची कारकीर्द आतां अगदी संपली व ते इकडून गेले

तेव्हां सभ्य सांप्रदायिक नियमाप्रमाणें न से उभयतां माजी कमिशनर साहेबाविषयीं यांचे कारकीर्दीचें अखेर अलिशान रेसिडेंट साहेबांनीं आपले उत्तम मत रेसिडेन्सी आर्डरमध्यें छापून प्रसिद्ध केलें आहे तसें रावबहादूर डायरेक्टर साहेब मि० म्याकिटाश साहेब यां विषयीं आपलें मत म यांस विद्या खात्यांतून काढून टाकण्याचें कारण, त्यांच्या खात्याचें मासिकपुस्तक शाळा पत्रक यांत, छापून प्रसिद्ध करितील तर पुष्कळ लोकांस व साऱ्या हिंदुस्थानास तें माहित होणार आहे कारण हायकुलचे हेड मास्तर या नात्यानें ते फार मोठे हुद्देदार गृहस्थ विद्याखात्यांत होते.

---

### जमखंडीकरांचा राजकीय रिपोर्ट.

पुण्याच्या डेकन हेरल्ड नावाच्या वर्तमानपत्रांत आह्मी असें वाचलें कीं, जमखंडी सरकारचा गुदस्त सालचा राज्य कारभाराचा रिपोर्ट छापून प्रसिद्ध झाला आहे व त्यांतील सर्व प्रकारचीं कामें चांगल्या स्थितींत आहेत असें सांगून सदर्हू पत्रकर्त्यानें त्यांची स्तुति केली आहे. हें ऐकून आह्मांस संतोष वाटतो. दक्षिण महाराष्ट्र देशांत जमखंडीचें संस्थान मोठें टुमदार आहे व त्यावरील मुख्य श्री० रा० आपा साहेब पटवर्धन हे मोठे हुशार, बुद्धिमान व सुधारणेच्या कामीं दक्ष असे आहेत तेव्हा त्यांच्या राज्य कारभाराचा रिपोर्टही चांगलाच असावयाचा यांत भ्रांति नाहीं.

या महाराष्ट्र संस्थानानें जर रिपोर्ट प्रसिद्ध केला तर त्याच्या प्रति महाराष्ट्र वर्तमानपत्रकर्त्यांस देणें अवश्य होत्या. व यांच्या प्रमाणेंच मोठ मोठाल्या राष्ट्रांचे ह्मणजे शिंदे, होळकर, गायकवाड, निजाम यांचे राज्य कारभाराचे वार्षिक रिपोर्ट तयार होत असतीलच व ते किंवा त्यांतून कांहीं कदाचित छापतही असतील. त्याविषयींही त्या त्या राज्याच्या दिवाण साहेबांस आमची अशी शिफारस आहे कीं त्यांनीं असे रिपोर्ट वर्षास छापून त्याच्या वर्तमानपत्रकर्त्यांस प्रति अवश्य देत जाव्या. त्याच्या योगें सर्वत्र माहिती होऊन त्यांतील गुणांची चहा होते. सबब ते या गोष्टीकडे लक्ष्य देतील असें आह्मी इच्छितों व या कामीं इंग्लिश सरकारचे त्या त्या दरबारचे पोलिटिकल आफिसरही पैरवी ठेवून या प्रकारच्या रिपोर्टांचा फैलावा करितील तर फार चांगलें होईल.

---

### राजकुमार कालेज.

माळव्यात इंदुर येथें राजकोटा प्रमाणें राजकुमार कालेज स्थापन केलें आहे हें वाचकांस माहित झालेंच असेल. त्यांत राजपुत्र व मोठमोठाल्या सरदारांचे पुत्र मिळून हल्लीं २२ विद्यार्थी आहेत. त्यांतील १०।१९ ची माहिती मिळाली आहे ती येणेंप्रमाणें:—

होळकर सरकारचे पुत्र दोन, देवासचे राजे, रतलामचे राजे, जोवतचे राजे, मायवारचा राणा, बातळीचे ठाकूर साहेब, बक्तगरचे ठाकूर साहेब, आमनीयाचे भोमे, काळी बासडीचे भोमे, तरल्याचे भोमे, भुपाळचे नबाब यासिन महारखान बांड्याचे नबाब बहादुर इत्यादि राजपुत्र इंदुरास विद्याभ्यास करीत आहेत ही मोठी संतोषाची गोष्ट आहे. आतां त्याना उन्हाळ्याची एक महिन्याची सुटी मिळेल. मि० म्यालो हे सदर्हू कालेजावर प्रिन्सिपाल आहेत.

---

### सिंकोना अथवा कुइनेन.

इंग्लिश लोकांची कुइनेन या नांवाची ज्वरहारक औषधी अलीकडे सर्वत्र प्रसिद्ध आहे. ती सिंकोना नांवाच्या झाडापासून तयार करितात व त्या झाडांची लागवड सरकार या देशांत दिवसानुदिवस अधिकाधिक करीत आहे व त्याविषयींचे त्यांचे प्रयत्न सफळही होत आहेत हें ऐकून संतोष होतो.

मद्रास इलाख्यांत निळगिरीवर या झाडांची लागवड आहे त्यांतील जानेवारी अखेर वृक्षसंख्या २६०७२७३ होती. गेल्या सहामाहींत वैनाद जिल्ह्यांत ९२ हजार झाडें व २८ औंस बीं शेतकरी लोकांस वाटून दिलें. व मुंबईसरकारास ९५२ रत्तल साली पाठविल्या. व विलायतेस ८८३८० रत्तल साली जहाजांतून पाठविल्या. व १३००० रत्तल शिल्लकेंत आहेत. मिळून १०२३३२ रत्तल ही औषधी गेल्या सालीं फक्त निळगिरीस तयार झाली. मागील पैकीं मोठालीं झाडें साल मजकुरीं चांगल्या स्थितींत आहेत परंतु नवे रोपे पर्जन्याचे आवर्षणामुळें चांगले धजावत नाहींत व त्यांची वाढ कमी झाली आहे असें समजतें.

---

**दुष्काळग्रस्त मनुष्यें** सरकारानें कामावर लाविलीं आहेत त्यांची संख्या गेले आठवड्यांत २३७१६६ होती. त्यांची जिल्हेवार वाटणी अशी:— खानदेश ११२६, नाशिक १७८१४, नगर २४०४०, पुणें ३२४८७, सोलापुर ३७१४१, सातारा ३२४४, कलादगी ३९३२७, बेळगाव २८०७६, व धारवाड २८९१० याप्रमाणें आहे. एका कामावर दहा हजाराहून अधिक मनुष्यें काम करीत आहेत तीं कामें येणें प्रमाणें:— नगर जिल्ह्यांत धोंड मनमाड रेल्वेवर १७९३६. पुणें जिल्ह्यांत मुठा नदीचे कालव्यावर ११४४८, सोलापुर जिल्ह्यांत अष्टी तलावावर, १३१३२, कलादगी जिल्ह्यांत सोलापुर हुबळी रस्त्यावर ११२५४, व बेळगाव जिल्ह्यांत पाचिगाव रस्त्यावर १४२१९, मनुष्यें काम करीत आहेत. या शिवाय निरा नदीच्या कालव्यावर ७१६८ मनुष्यें आहेत, ह्मसवडच्या तलावावर ९८५७ मनुष्यें आहेत व आणखी ही कांहीं तलाव व रस्ते यांजवर पांच हजाराहून अधिक अशीं मनुष्यें काम करीत आहेत.

---

**शिंदेसरकार** चंबला नदीचा कालवा बांधुन ग्वालेरीस आणणार. याची लांबी ३६ मैल आहे. व वाटेंतील प्रदेशात पावसाची खात्री असते तेव्हां पीक चांगलेसें येत नसते त्या भागासही पाटाचे पाण्याचा फायदा करून द्यावा असा सरकारचा विच्यार आहे. व या कालव्याचे रस्त्याची मोजणी सुरू केली आहे ती ही इतक्यांत संपेल व काम सुरू होईल. अशीं कामें मराठी शाईत सुरू होणें हें देशाच्या भाग्याचें लक्षण होय. आह्मी इच्छितों कीं, शिंदे सरकारचा हा निश्चय शेवट पर्यंत टिको.

---

## वऱ्हाड

मि० जोन्स साहेब कमिशनर येत्या आठवड्यांत एथें येणार असें वर्तमान आहे. टाइम्समध्यें एकानें लिहिलें आहे कीं. हे १० वाजल्यापासून ५ वाजतपर्यंत आफिसांत येऊन एकसारखी मेहेनत करितात. घरीं बसून अळमटळम करित नाहींत हें फार चांगलें आहे. व यामुळें सर्व डिपुटी कमिशनर व खालचे आफिसर यांसही हें आतां वळण लागेल. दुसरी त्याच पत्रांत एक गप लिहिली आहे कीं, वऱ्हाड परत द्यावें किंवा इंग्लिश राज्यास जोडावें हा विचार त्यांचे मनांत घोळत आहे व तें परत देण्याच्या मताकडे त्यांचा डोल आहे. ही गोष्ट एथें केवळ निरर्थक दिसते. जोन्स साहेबांना येऊन पंध्रा दिवस झाले नाहींत तोंच वऱ्हाड परत द्यावें किंवा नाहीं हा विच्यार त्यांनीं काढण्याचें कांहीं कारण नाहीं. व हा विषय त्यांचा नव्हे. त्याकरितां हिंदुस्थान सरकार, निजाम सरकारचे दिवाण, स्टेट सेक्रेटरी, पार्लमेंट सभा इत्यादि बहुत स्वतंत्रपणें विच्यार करणारे आहेत. असें आह्मास वाटतें.

---

मागें एका आठवड्यांत उभयतां माजी कमिशनर यांचे जाण्यानें वर्गावर्गी झाल्यांत मेजर फिटझरलड साहेब हे कायमचे डेपुटि कमिशनर झाले व मेजर फ्यारर साहेब कायमचे फर्स्ट असिस्टंट कमिशनर झाले असें छापलें आहे. त्याच्या पुढें आणखी दोन वर्गावर्ग्या झाल्या आहेत त्या येणें प्रमाणें:—

मि० ताजुदीन साहेब थर्ड क्लास व आफिशिएटिंग सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर होते ते मेजर फ्यारर साहेब यांचे बढतीनें कायमचे सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर झाले व खान बहादूर महमद शाबुदीन साहेब सिनियर अख्याची डे मि० तानुदीन साहेबाचे बढतीनें थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर झाले.

---

अकोले शहरा नजीक उगवे गावा पैकीं एका कुळाची दोन एकर जमीन हमेशा लश्कर येते जातें त्याच्या तळा करितां सन १८७० चे १० वे आक्टाप्रमाणें घेण्यांत आली असें या महिन्यांतल्या पाहिले तारखेच्या रेसिडेन्सी आर्डर मध्यें छापून प्रसिद्ध झालें आहे.

---

छापखाने व वर्तमानपत्रें यांच्या व्यवस्थे करितां सन १८६७ चा २५ वा आक्ट आहे. त्याच्या धोरणानें रेसिडेंट साहेबांनीं नवीन बारा कलमाची एक कलम करून पहिले तारखेच्या रेसिडेन्सी आर्डर मध्यें छापून प्रसिद्ध केली आहे. ती जाहिरनामा नंबर ११ तारीख २७ एप्रिल सन १८७७ ची आहे. तींत छापखानेवाल्यानीं सदर्हू आक्ट व हे नियम आपले कारखान्यांत प्रसिद्ध जागीं ठेवावे. नवीन पुस्तकाच्या १ प्रति डिपुटी कमिशनरास द्याव्या. व पुस्तकांचे रेजिस्ट्रार विद्या खात्याचे डायरेक्टर यांस केलें आहे ह्मणून वगैरे मजकूर आहे. त्याचें सविस्तर भाषांतर पुढें देऊ.

---

यवतमाळ जिल्ह्याच्या जेलचा च्यार्ज मि. चामरेट यांचे गैरहजरींत मि. इलियट साहेब असिस्टंट कमिशनर यांजकडे दिला आहे.

---

क्या. साहेब एथील स्मालकाज जडज तीन महिन्यांचे रजेवर गेले तितक्या मुदतींत क्या. थामसन साहेब थर्ड क्लास असिस्टंट कमिशनर यांस आफिशियेटींग सेकंड क्लास मिळाला आहे.

---

मि. डाबस साहेब पश्चिम वऱ्हाडचे असिस्टंट इंजिनियर यांस रजा मिळाल्याप्रमाणें ते विलायतेस गेले.

---

कपाशीच्या खात्याचे व त्या संबंधी हिशेब ठेवण्याचे तपासणीस मि. डनलप साहेब असिस्टंट कमिशनर यांनीं गेल्या महिन्याच्या १४ वे तारखेपर्यंतचा हिशेब रे. आ. मध्यें प्रसिद्ध केला आहे त्यावरून समजतें कीं या सालांत सदर्हू तारखेपर्यंत इकडे उत्पन्न झालेल्या कापसाचे गठ्ठे मुंबईस २१९७१५ रवाना झाले व १५० वायव्य प्रांताकडे रवाना झाले. व नागपुर प्रांतांतून मुंबईस २९१८६ व वायव्य प्रांताकडे २०९२, बंगाल्याकडे १७ व खानदेशांत ११८८ गठ्ठे रवाना झाले. एका गठ्ठ्यांत ४०० रत्तल कापुस असतो.

---

एथील राजेश्वर सभेचे अध्यक्षाची जागा रा. रा. गंगाराम बापुजी एथून गेल्यापासून रिकामी होती तिजवर रा. रा. कृष्णराव हरि कोल्हटकर यांची नेमणूक झाली.

---

रा. रा. वामनराव बाळाजी डे. ए. इ. वाशमास परत गेले. व रा. रा. बळवत नरसिंह इलिचपुरचे डे. इ. इ. एक दिवस एथें आले होते तेही परत गेले.

---

मागाहून आलेली नोटिस.

मुरारजी हरिदास भाटे दुकान मुंबई यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची आडत असल्यामुळें आह्मी शेगाव यथील दुकानाहून माल पाठवीत गेलों त्या मालाचे हिशेबात तुमच्या कडेस आमचे २७७८—।।। रुपये निघत आहे हे रुपये नोटिस पावल्या दिवसापासून आठ दिवसांत पाठवून द्यावे रुपये न पाठविल्यास शिरस्ते प्रमाणे आह्मी नोटिशीचे खर्चासुद्धां फिर्याद करूं. कळावे. तारीख ११ माहे मे सन १८७७ इसवी.

(सही) जानकीदास खेमचंद
दुकान शेगाव द. खु.

---

## वर्तमानसार

मद्रास इलाख्यांतील एका अरणी गांवच्या जहागिरदारानें आपले गांवचे व आसपासचे म्हातारे व अशक्त लोक यांस दुष्काळानिमित्त दररोज अन्न देण्याचें सुरू केलें त्यास आपले मगदूरप्रमाणें तो दरमहा १०० रुपये खर्चूं लागला तितक्यानें भागे ना म्हणून गावचानेंही महिना १०० रुपये देऊं लागले. पुढें पुढें सात शें मनुष्यें जेऊं लागलीं तेव्हां जहागिरदारानें सरकारास मदत मागितली ती सरकारानें देण्याचें कबूल करून दरमहा २०० रुपये देण्याचें सांगशन केलें. अशीं उदाहरणें गावोगाव घडलीं पाहिजेत.

खाणींतील कोळस शेतास खताचे ऐवजीं उपयोगी पडतात असें अलीकडे अनुभवावरून समजण्यांत आलें आहे.

दुष्काळ चे चौकशीकरितां व बंदोबस्ताकरितां मुंबई व मद्रास इलाख्यांत सर रिचर्ड टेंपल साहेब बारोनेट यांस हिंदुस्थान सरकारानें नेमिले होते तें काम त्यांनीं फारच उत्तम केलें, फार बारकाव्यानें माहिती मिळविली, शारीरश्रम अतिशय केले, वेळोवेळ मिनिटें फारच उपयोगाचीं व महत्वाचीं लिहिलीं आणि सगळ्यांत मुख्य गोष्ट बावगा खर्च कमी करून रिलिफ संबंधीं कामें बेतावर आणून सरकारचा मोठा फायदा केला. याबद्दल हिंदुस्थान सरकारानें आपले ग्याझेटांत त्यांची अतिशय तारिफ केली आहे. व असेंही स्पष्ट म्हटलें आहे कीं ईश्वर कृपेनें यांस दीर्घायुष्य व आरोग्य असो म्हणजे ते अशीच अनेक कामें करून सरकारास उत्तम सहाय्य करतील.

धारचे पवार साहेबांनीं गेल्या आठवड्यांत आपले राजधानींत राणी साहेब चक्रवर्तिनी झाल्या याबद्दल मोठा जलशा केला.

गेले महिन्याचे २७ वे तारखेस अलाहाबादेस एका बाईला एके वेळीं तीन मुली व एक मुलगा अशीं ४ अपत्यें झालीं व तीं सर्व कांहीं वेळ जिवंत होतीं.

मुंबई शहरांत दुष्काळग्रस्त लोक हजारों जमले व त्यांच्या संसर्गानें तेथील हवा बिघडूं लागली म्हणून सरकारानें ठराव केला कीं ज्या ज्या जिल्ह्यांतील लोक विपत्तिमुळें आले आहेत त्यांस सरकारी खर्चानें त्या त्या ठिकाणीं पाठवून कामावर लावून द्यावे.

सालापुराकडे व पंढरपुराकडे पाऊस पुष्कळ पडला असें समजण्यांत आलें आहे.

औंध आणि रोहिलखंड रेलवेचें बनारस स्टेशनापासून श्री काशी क्षेत्रांत राजघाटापर्यंत ३ मैल ट्रामवेचा रस्ता करण्याचा ठराव झाला आहे. बनारसचें स्टेशन लष्करी छावणींत असून हमेशा ग्रहणाचें वगैरे संधीस रात्रीं यात्रेकरू लोक छावणींतून जातात त्यांपासून आफिसर लोकांस त्रास होतो व अपरात्रीं छावणींतून रहदारी उपयोगी नाहीं म्हणून ट्रामवे करण्याचा विचार झाला.

जयपूरचे महाराजांनीं आपले राजधानींत सर्व लोकांचे उपयोगाकरितां १० लक्ष रुपये भांडवल देऊन एक ब्यांक स्थापन केली आहे.

सर रिचर्ड टेंपल साहेब बारोनेट मुंबईचे गवरनर महाबळेश्वरास जाऊन आपले पत्नीस घेऊन आले. व त्या गेले सोमवारीं विलायतेस गेल्या.

चमत्कार. विश्वनाथ भटजी यांच्या लिहिल्यावरून कळतें कीं, त्यांच्य अंगावर १४ वर्षे कोड होतें सबब त्यांनीं १२ वर्षे काशीवास केला. शेवटीं अक्कलकोटास गेले "आतां अम्ही फिर्याद ऐकत नाहीं, देगलुरास शिरस्तेदार आहे तिकडे जा" असें स्वामीनां सांगतांच ते तिकडे गेले. शिरस्तेदाराचें नाव एकनाथ, बापाचें नाव अनंत, वय अल्प असून अण्णा बारशीकर या नावें प्रसिद्ध आहेत. उभयतांचीं परस्पर प्रश्नोत्तरें होऊन त्यांनीं भटजीत सर्वांगास गोमय लावून गंगेंत स्नान करण्यास सांगितलें, त्यांच्या जिव्हेस आपली करांगुली लावली व तीन दिवस उपोषण करून गंगेचें स्नान करून जावें असें त्यांस सांगितलें. तसें करताच भटजीचें कोड जाऊन शक्ति येऊन जसें १४ वर्षांच्या पूर्वीं भटजीचें अंग होतें तसें झालें.

सिव्हिल आणि मिलिटरी ग्याझेटचा सरहद्दावरचा बातमीदार त्या पत्रास असें लिहितो कीं, पंध्रा वर्षांचा मुलापासून तों तहत पन्नास वर्षांच्या वृद्ध मनुष्यापर्यंत काबुलांत सर्वांस हत्यारबंद ठेवलें आहे. आणि प्रत्येकापाशीं काडतुसें दिलीं आहेत.

इं. प्र.

प्रसिद्ध लोकप्रिय शेट मुरारजी गोकुळदास हे राजकोट वगैरेकडे गेले होते. तिकडे त्यांचा तेथील राजानें मोठा सन्मान करून त्यांस २०००० रुपयांचा पोशाक दिला हें ऐकून संतोष वाटतो.

न्या. सिं.

गेल्या जानेवारी महिन्या पर्यंत टर्कीच्या लढाई बद्दलच्या खर्चाकरितां मुसलमान लोकांत स्वतांच्या खुशीनें एकंदर रुपये ३६१०४०० जमले.

निजाम सरकारचे दिवाण नवाब सरसालरजंग यांनीं आपल्या प्रांतांत दुष्काळांत मनुष्यांचा कांहीं तरी बचाव व्हावा म्हणून लोकोपयोगी कामें सुरू केलीं आहेत. त्यांत मजूर व अंमलदार मिळून एकंदर ४३००० लोक कामास लागले असे समजतें.

दी. बं.

आलीकडेस हिंदुस्थानांतून विलायतेस पुष्कळ चहा जाऊं लागला आहे त्यामुळें चिनी चहाचा विलायतेंत खप कमी होऊं लागला आहे. व कांहीं दिवसांनीं चीन देशाचा, चहाचे संबंधानें विलायतेशीं बहुतेक व्यापार मोडण्याचा संभव आहे. हल्लां असें समजतें कीं, दरसाल सुमारें ३०००००० पौंड चहा या देशांतून विलायतेस जातो.

बंगाल्यांत एका डोंगरावर एक चमत्कारिक झाड सांपडलें आहे. हें फार उंच होत नसून जमिनी बरोबरच असतें. या रोप्याच्या खांद्या तोडल्यावर त्यांतून स्वच्छ पिण्याजोगें पाणी वाहूं लागतें.

इराणांत सोन्याची खाण सापडली आहे, यामुळें तेथील राजास बरेंच उत्पन्न होईल सबब त्यानें आपल्या राज्यांतील सर्व लोकास दोन वर्षांचे कराची सूट दिली. व ज्या पुरुषानें त्या खाणीचा शोध लाविला त्यास पुष्कळ पदव्या देऊन मोठे कामगिरीची नोकरी दिली असें समजतें.

ने. ओ.

## विवाहविज्ञान.

[ मागील अंकावरून पुढें चालू. ]

वधुवरांच्या परस्पर लक्षणां पैकीं कित्येक मागल्या लेखांत सांगितलीं. त्यांत प्रकृतीची भिन्नता हे एक मुख्य धरलें पाहिजे. वधुवरांची प्रकृति जितकी भिन्न असेल तितकी त्यांची एकमेकांविषयां आवड जास्त असते. विद्युत शक्तीच्या धन आणि ऋण गुणाचा असा स्नेह आहे हें सर्वांस ठाऊक आहे.

भिन्न गोत्रें आणि भिन्न जातींच्या लोकांचा संबंध उत्तम फलदायक होतो, यांत तिळमात्र संशय नाहीं. अशा भिन्नजातींच्या संयोगापासून उत्पन्न होणारी प्रजा सर्वगुणांनीं वर्चस्वास पावते– बल, शौर्य, तेज. बुद्धि, पराक्रम, यांहीं करून ती उत्कर्षास पावते. याचीं उदाहरणें अनेक देतां येतील. भिन्नजाति आणि भिन्न प्रकृति यांच्या संयोगाची उदाहरणें थोडीं नाहींत. मोंगल आणि रशियन व पर्शियन, यांच्या मिश्रसंबंधानें उत्तम प्रजा झाली आहे. गोरे युरोपियन व काळे हिंदु यांची प्रजा हिंदुस्थानांत ज्याना इंडो ब्रिटन्स म्हणतात ती पहा. सौंदर्य, तेज, चंचलपणा, आणि शारिरबल यासंबंधानें पाहिली तर मूळ दोन्ही जातींपेक्षां श्रेष्ठ आहे. अमेरिकेंतील मेलटो सौंदर्याविषयीं व शारीर बलाविषयीं प्रसिद्ध आहेत. कांहीं परंपरागत होणारे रोग, जसे पादाग्ररोग, गंडमाळा. क्षय, वेड, अपस्मार, इ०, निर्मूळ करण्याचा उत्तम उपाय भिन्नजातींच्या लोकांचा विवाह संबंध होणें या खेरीज दुसरा नाहीं. असें विद्वान व अनुभवी वैद्यांचें मत आहे.

जवळच्या संबंधी स्त्रीपुरुषांच्या विवाहाविषयीं स्वभावतःच जे विलक्षण विचार मनांत उद्भवतात त्यांवरून सृष्टिनियमाची आवडती योजना भिन्नजातीच्या व्यक्ति संबंधांत आहे, असें उघड होतें, इंग्लंडांत या गोष्टीचा अनुभव प्रसिद्ध आहे. तेथील बडे लोक ( लार्डस ) पुष्कळ वर्षेंपर्यंत इतरांशीं शरीरसंबंध करीत नसत. त्या कारणानें त्यांची प्रजा फार हीनबल. व हीनबुद्धि होऊं लागली. तेव्हां असा दुःखकारक परिणाम तेथील सुज्ञांच्या लक्ष्यांत येतांच त्यांहीं बडे लोकांचे डोळे उघडले व भिन्नगोत्रांशीं विवाहसंबंध करण्याचा प्रघात घातला तेव्हांपासून बडे लोकांची प्रजा सुधारत जाऊन ते सांप्रत सर्व राज्यकारभार आपल्या हातांत ठेवण्याचे योग्यतेप्रत पावले आहेत. ह्या उपदेशाकडे महाराणीनें देखील दुर्लक्ष केलें नाहीं. त्याही आपल्या कन्या आतां राजकुलांतच कोंडून ठेवीत नाहींत.

मनूचें मत याविषयालाच अनुसरून आहे. मनुस्मृति आ० ३० "मातेच्या सपिंडांतील म्हणजे मातामह मातामहादि वंशांतील नव्हे, आणि मातृगोत्रांतील नव्हे, व सपिंडांतील म्हणजे पितृव्यादि संततिपासून झालेली नाहीं, ती, व पित्याचे गोत्रांतील नाहीं, अशी कन्या ब्राह्मण, क्षत्रिय, आणि वैश्य या तीन वर्णांला * * * * प्रशस्त आहे.

अशा हितकारक नियमाचा भंग व दुर्दशा आमच्या लोकांनीं करून टाकिली आहे. फळें ही त्यांसच भोगावी लागतात. तीं कशीं कडू झालीं आहेत हे पुढें सांगण्यांत येईल. जातिभेदामुळें ज्या वेगळ्या जाती होऊन राहिल्या आहेत तीं विस्तीर्ण कुळेंच बनून राहिलीं आहेत. जातिभेदाच्या उत्पत्तीपासून निरनिराळ्या जाती संबंधाशिवाय गोत्रें क्वचित राहिली असतील; मग जाती पलीकडे जावबत नाहीं म्हणून वरील नियमांचा सहजावृत्त्या भंग होतो. ब्राह्मण एक जाति असतां परदेशस्थाचा संबंध नाहीं तर नाहीं, पण देशस्थ कोंकणस्थांला. आणि कोंकणस्थ कऱ्हाड्यावर नाकें मुरडतात.

यांस इलाज नाहीं काय? हे जातिभेद इंद्रिय वेड नरूपी देवीला बळी दिल्याशिवाय तो संतुष्ट होत नाहींत; व पश्चिम खंडस्थ लोकरांवर जशी तिची कृपादृष्टी आहे तशी भरतखंडस्थ लोकरावर तो करित नाहीं हें खास समजावें.

सु. प.

## जाहिरात.

## विविधज्ञानविस्तार.

### मासिकपुस्तक.

[कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां. ]

शास्त्रीयविषय, आरोग्यविषय, भाषा सुधारणा, मनोरंजन, पुस्तकपरीक्षा, सुंदर ग्रंथांचीं भाषांतरें, इतिहास, विख्यात पुरुषांचीं चरित्रें, कविता इत्यादि विषयांचा समावेश करणारें या प्रकारचें, सर्व महाराष्ट्र देशामध्यें हें एकच पुस्तक आहे.

किंमत.

| | रु. आ. |
|---|---|
| वर्षाची आगाऊ ............ | ३—० |
| मागाहून. ........ | ४—८ |
| सहामाही आगाऊ. | २—० |
| किरकोळ अंकास | ०—६ |
| टपाहांशील वर्षाचे. | ०—६ |

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं मुंबईत काळकादेवीच्या रस्त्यावर देवीसमोरील विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत व्यवस्थापक यांच्या नांवें वर्षाची आगाऊ वर्गणी ( रु. ३ आ. ६ ) सुद्धां पत्र पाठविल्यास पुस्तक चालू होईल

व्यवस्थापक, विविधज्ञानविस्तार.

☞ मराठ्यांच्या इतिहासाला साधनभूत असा आमचे लोकांनीं लिहिलेला मराठे व मुसलमान यांच्या राज्याविषयीं जुन्या बखरी छापून प्रसिद्ध करण्याचा आजपर्यंत कोणी यत्न केला नव्हता. त्या आमचे पुस्तकांतून प्रसिद्ध व्हावयास आरंभ झाला आहे; तसेच नागपुकर भोंसले यांचा निराळा इतिहास कोणी लिहिला नाहीं तोही या पुस्तकांत येत आहे. हें पाहून राजेरजवाडे विशेषतः संस्थानिक व वऱ्हाडप्रांतस्थ लोक याकडे लक्ष देतील अशी उमेद आहे.

हे पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प.

REGISTERED NO. 6,1877.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ अकाला, रविवार ता० २० माइ मे सन १८७७ इ० अंक २०

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी याबी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा

राजश्री सदाशिव हेमराज मारवाडी साहू दुकान पिंपरी तालुके चिखली जिल्हे बुलढाणे यांस रावतमल वल्लद रामभजन मारवाडी साहू दुकान अटाळी तालुके खामगाव जिल्हे अकोलें याजकडून नोटिशीचा जबाब देण्यांत येतो कीं, तुह्मी ता. ६ माहे मे सन १८७७ इ.चे वऱ्हाडसमाचारांतून नोटिस दिली ती सर्व खोटी आहे कारण तुमचे आई बापानीं अगर तुह्मी आह्माजवळ धरवर किंवा ठेव ह्मणून एका दमडीची चीज ठेविली नाहीं. तुह्मी लिहिल्यापैकीं कांहीं जिनसा माझे एथें गहाण ठेवून रुपये नेले आहेत ते असेः—

७० वनचराईबद्दल तुमचे घरावर जप्ती आली होती तेव्हां तुमचे बहिणीनें सत्तर रुपये नेले व त्याला तारण ५ तोळे सोन्याची हसळी एक आणून गहाण ठेविली.

१८ तुमच्या बहिणीनें रोख नेऊन चांदीचा साठा वजन तोळे २४चा गहाण ठेविला.

११५ रुपये तुमची आई व महादू गायकवाड यांनीं नेले यांत ५६॥ तोळे चांदी व चार तोळे पांच मासे सोनें इतका ऐवज गहाण ठेविला

१ तोड्याचा जोड १ तोळे २६
१ कडे ४ तोळे ३०॥ चांदीचे
१ बाळ्या सोन्याच्या १।. तोळे २
१ तोड्याचा जोड १ तोळा १॥ सोन्याचा
१ रामनामी ११ मासे सोन्याची

— —
५

— —
२०३

एकूण २०३ रुपये तुह्माकडे असून वर लिहिलेल्या जिनसा आह्मापाशीं तुमच्या गहाण आहेत व या शिवाय तुमचे बापाचें दाहावें केलें त्यास खर्च आह्मी आपले जवळून २२९ रुपये लाविला एकूण ४३२ रुपये तुह्माकडे घेणें आहे व त्यास दर शेकडा २ रुपयेप्रमाणें व्याज चालू आहे. करितां वरील जिनसा घेऊन जावें व आमचे रुपये आदा करावे याप्रमाणें तुह्मी न केल्यास रीती प्रमाणें फिर्याद करून रकम भरून घेऊं.

आतां या शिवाय कांहीं वायफळ जिनसा व रुपये नोटिसींत घालून तुह्मी रकम फुगविली पण याचा विच्यार तुह्मीच करावा कीं इतके रोख रुपये तुमचे जवळ होते तर मग वारंवार जप्ती येऊन इतर माल जप्त करून कसा नेत असत? बरें असो. असें तुफान घेतल्यानें तुह्मास १११८ रुपयाचा ऐवज मिळेल व आमची रकम बुडेल असा बिलकूल भरवसा ठेवूं नये कारण आमचे एथें सर्व हिशेब तपशीलवार व वेळचे वेळेस मांडलेला आहे कळावें तारीख १६ मे सन १८७७ इसवी.

( सही ) रावतमल रामजन मारवाडी
वस्ती मौजे अटाळी
दस्तुर खुद्द

नोटिस.

रा. चिधाजी वल्लद जानजी ठाकरे कुणबी रहाणार मौजे निमकर्दे तालुके बाळापुर जिल्हे अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, सुमार १६ वर्षां पूर्वीं माझे बापानें देण्या घेण्याची व सराफीची दुकान निमकर्दे येथें घातली त्यांत सर्व पुंजी माझी असून फक्त देखरेख ठेवण्याकरितां तुह्मास सदर दुकानांत तकशिमदार केलें. त्याचा हिशेब दरसाल दिपवाळीचे दिपवाळीस माझ्या बापाच्या देखतां होत असे. पुढें माझा बाप मरण पावला त्यास सुमार १० वर्षें झालीं. तेव्हां मी फार अज्ञान असल्या कारणानें माझे हातून हिशेबाटिशेबाचें काम दरसाल झालें नाहीं. तरी देणें घेणें सुरळीत चालू आहे. अलिकडे मला सदर्हू दुकानचा माझा बाप गुजरल्या पासूनचा हिशेब पहाण्याची इच्छा झाल्यावरून मी तुह्मास एक दोन वेळा ह्मटलें पण त्याप्रमाणें तुह्मी कांहीं एक दाखवीत नाहीं त्यावरून आह्मास मोठा संशय येतो व त्यावरूनच तुमची बेमानी लक्षांत येते तर तसें न करितां ही नोटिस पावल्या पासून पंध्रा दिवसांत सदरी दुकानचा सर्व हिशेब आह्मास समजावून द्यावे ह्मणजे आमचा तुमच्यावर पूर्ण भरवसा आहे आमचा हेतू तुह्मास काढून दुसऱ्यास नेमण्याचा मुळींच नाहीं करितां हिशेब देण्यास आवकाश करूं नये अगर मुदतीचे आंत तुह्मी हिशेब न दाखविला तर कोर्ट खुलें होतांच तुह्मा विषयीं तजवीज करावी लागेल हें खूप समजावें कळावें. तारीख १३ मे सन १८७७ इसवी.

( सही ) नारायणसा वल्लद रामचंद्रसा
रंगारी दस्तुर खुद्द.

नोटिस—रघुनाथदास रामप्रताप साहू दुकान अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं, वादी भगवानदास अंबादास रहाणार अकोलें यांणीं प्रयागजी भिमजीवर अकोलें स्माल काज कोर्टांत हुकुमनामे मिळविले व हुकुमनामे मिळविण्याचे पूर्वीं त्याचा माल जप्त केला होता त्याजबद्दल तुह्मी सरकारांत जमानत देऊन माल सोडविला. ते रुपये तुमचेकडून येणें आहेत आणि सदर्हू हुकूमनामे आह्मी खरीदी घेतले आहेत करितां तुह्मास कळवितों कीं, सदर्हू हुकुमनाम्याचे रुपये आह्मास देऊन पावती घ्यावी. दुसरें कोणास देऊं नये. जर कदाचित तुह्मी दुसऱ्यास द्याल किंवा दुसऱ्याचा उजूर दाखवाल तर तो ऐकला जाणार नाहीं. हें आपणास कळावें. आतां आह्मास रुपये देऊन पावती घ्याल तर उत्तम आहे. नाहींपेक्षां खर्चासुद्धां रुपये कोर्ट खुलें होतांच घेण्याची तजवीज केली जाईल. या प्रमाणें पूर्वीं रजिस्टर पत्र आपणास दिलेंच आहे तेंहीं पोंचलें असेलच. तारीख १२ माहे मे सन १८७७ इसवी.

( सही ) नोरावरमल गंगाधर. साहू
दुकान अकोलें द. खु.

नोटिस.

सदू वल्लद सुदामा सुतार जवजाळ वस्ती कसबे नांदुरें तालुके मलकापुर यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं, तुह्मी माझे लग्नाचे भ्रतार असून मला आठ वर्षांपासून टाकून दिल्यामुळें मी आपले आई बापाचे घरीं रहात असून अन्नवस्त्राची माझी कांहींच सोय करीत नाहीं व मजला नेतही नाहीं. तुह्मी लग्नाची दुसरी बायको करून तिजबरोबर संसार करिता त्यास ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत येऊन माझे अन्नवस्त्राबद्दल माझे आईबापास खर्च चुकवून देऊन मजला घेऊन जावें. याप्रमाणें न केल्यास मी पाटाचा नवरा वाटेल तो करीन. मग तुमचा मजवर लग्नाचा हक्क संबंध रहाणार नाहीं. कळावें. या नोटिशीचा एक अंक छापखान्यामार्फत तुह्मास रजिस्टर करून पाठविला आहे. कळावें तारीख १४ मे सन १८७७ इसवी.

( सही ) तुळशी मर्द सदू जवजाळ
राहुडपिंपरी ता. मलकापुर
निशाणी हातची बांगडी.

नोटिस.

रामजी वल्लद दानजी माळी मौजे बाभुळगांव यास सोनाजी वल्लद अकाजी डोंगरे, बेडाजी वल्लद मानजी किरकाळ्या, व उकर्ड्या वल्लद परशराम व हरी वल्लद राघोजी जवळेकर व निंबाजी वल्लद सोनाजी माळी मगळ्या वस्ती बाभुळगांव तालुके अकोले यास नोटिस देण्यात येतें कीं, तुह्मी तारीख २८ माहे एप्रिल सन १८७७ इसवीची नोटिस दिली; परंतु त्याप्रमाणें कांहीं मनकूर न होऊन सर्वे नंबर ४७ आकार रुपये १९ ०१४ ०३ चा मौजे सिसे एथील शेतांतील अक्षयचे आह्मी भागीनदार असून त्याप्रमाणें शेत घेतल्यापासून नांगटीं वगैरे आह्मी काढून आजपावेतों सर्व खिस्तगारी करीत येऊन माल्ही घेत आलों. आणि हल्लीं तुह्मी आह्मांस मना केलें नाहीं. व मना करण्याचाही हक्क नाहीं. व मजूरीनें आह्मी करितों असें नाहीं. व नोटिशींत लिहिल्या प्रमाणें आह्मी सहा वर्षें काळानें चालण्या करितां कधीं ही करार केला नाहीं. जसें आह्मी जमीनीचे भागीन आहो. व करार आहेत त्याप्रमाणें वागूं व शेतांतील उत्पन्नही घेऊं अशी बनावट नोटिस दिल्यानें आमचा हक्क कमी होणार नाहीं. मात्र या नोटिशीचा खर्च तुह्मी आठ दिवसांचे आंत द्यावा नाहींपेक्षां फिर्याद करून खर्चासुद्धां घेतला जाईल कळावें. तारीख १० माहे मे सन १८७७ इ०

(सह्या) सोनाजी वल्लद अकाजी डोंगरे
बेडाजी वल्लद मानजी किरकाळ्या
उकर्ड्या वल्लद परशराम
हरी वल्लद राघोजी जवळेकर

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

बि. वि. मौजे निंबे तालुके बाळापुर जिल्हे अकोलें एथील कित्येक ग्रामस्थ संभावित मनुष्यांनीं तारीख ४ माहे मे सन मजकूर रोजीं शाळेंत सभा करून त्यांनीं शाळेकरितां बक्षिसें दिलीं तीं सविस्तर आपले पत्रीं लिहिल्यास विस्तार होईल सबब थोडक्यांत सांगतों.

घड्याळाकरितां १५ रुपये जमा झाले त्यांत रा. कडतोबा देशमुख यांनीं २ रुपये दिले व बाकी उत्तमराव वगैरे १३ मंडळीनीं एक रुपया दिला. तसेंच गावांत एक वर्तमानपत्र येत असावें याकरितां पैसा जमविला त्यांत रा. हेमराज कस्तुरचंद नारायणदास वगैरे मारवाडी आणि शाळा मास्तर यांनीं एकेक रुपया दिला व एकानें आठ आणे दिले आणि वऱ्हाडसमाचार पत्र घेऊं लागले. तसेंच शाळेंत ज्या मुलांनीं चांगला अभ्यास केला व ज्यांस पुस्तकांची जरूर आहे त्याकरितां रा. दवलतराव, रामापा वाणी वगैरेनीं रुपये दिले

या लहानशा गावास ही मोठी भूषणाची गोष्ट समजून आपलेकडे पाठविली आहे तर प्रसिद्ध केल्यास लोकांस संतोष होऊन इतर ठिकाणच्यांसही उत्तेजन येईल, कळावें तारीख ५ मे सन १८७७ इसवी.

एक बातमीदार क्ष

निंबेकर

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. या पत्रास आपल्या येत्या अंकीं जागा द्याल अशी आशा आहे.

आह्मी या गावीं सुमारें आठ दिवस मुक्कामास होतों. तितक्या वेळांत-दररोज एक दोन वेळ आग लागली नाहीं असा एकही दिवस गेला नाहीं. परंतु एके दिवशीं ह्मणजे ता० ६ माहे मजकूर रोजीं रात्रींत आठ वेळ आग लागली. ह्या सर्व आगी आह्मी प्रत्यक्ष जाऊन पाहिल्या व त्याच दिवशीं एक दोन घरांतून चिरगुटाचे बोळेही काढले. दर दिवसचा एक दोन वेळ आग लागण्याचा क्रम सुरूच होता. वर सांगितलेल्या आगीच्या वेळेस एथील तहशिलदार मि० सादत मीरखां व नायब तहशिलदार मि० शितळशिंग ह्या उभयतांनीं पुष्कळ मेहनत आग बुजविण्याचे कामाकडे घेतल्याचें दिसून आलें, आतां खालीं लिहिलेला मजकूर खरा असेल तर त्यास आमची विनंती आहे कीं त्यांनीं स्वतां किंवा पोलिसामार्फत या गोष्टीचा शोध व बंदोबस्त केल्यास लोकांस विशेष फायदा होईल.

तारीख ६ मिनहूरोबीं एका जागची आग विझल्यावर एकेठिकाणीं बसलों असतां तेथें दहा पांच मंडळी गोळा झाली. त्यावेळीं एक दोघे बोलूं लागले कीं एथें कोणी एक फकीर आहे. तो दररोज 'लेदे घोडा जीनें तोडेस'· असें ह्मणून फेरी करित असतो. त्यास येथें येऊन सुमारें दोन महिने होत आले. एथील सर्व लोक व हुतकरून गरीब असल्यामुळें त्या फकिरास घोडा घेऊन अगर जवळचा कोण देतो? तरी त्यास चार घोडे मिळाले आहेत असें वर लिहिलेल्या मंडळीकडून ऐकिलें. तो ह्मणतो कीं दर महल्यांत एक दोन घोडे मिळाले पाहिजेत त्यांत जो कोणी वर्गणी देणार नाहीं त्याचें नांव मला सांगा ह्मणजे मी त्याचें घर जाळून टाकतों. कोणी ह्मणतात त्याचे जवळ आग्यावेताळ आहे त्याच्या योगानें तो घरें जाळतो अशा भीतीस्तव हल्लीं या गावांत वर्गणी करण्याचें काम लोकांनीं मोठ्या झपाट्यानें चालविलें आहे. जो गरीब आहे ह्मणजे ज्यास एक दिवसास खाण्यास सुद्धां पैसा मिळत नाहीं अशा लोकांकडून चार आणे सहा आणे घेण्याचें सुरू आहे. व ते लोक न द्यावे तर घर जळेल अशा धाकानें भराभर पैसे देऊं लागले आहेत. आमच्या वऱ्हाडी लोकांची आणि मेंढराची रीत एकच आहे असें ह्मटल्यास हरकत नाहीं. त्यांस असें समजत नाहीं कीं जरकरतां त्या फकिराजवळ वेताळाचा खेळ असता व त्याचे योगानें तो घरें जाळीत असता तर चिरगुटाचे बोळे घरांतून कसें निघते! ह्याचा विचार न करतां एकदम पैसे देण्यास तयार झाले हें मोठें आश्चर्य समजलें पाहिजे. अजून लोक सांगूं लागले कीं या एक दीड महिन्यांत आगीचा क्रम सुरू होऊन तितक्या वेळांत सुमारें शें पन्नास घरांचा नाश मुळापासून झाला. सर्व गाव जळून भस्म झाला असता परंतु तहशिलदारांची मेहेनत जास्त आहे करितां तितक्याचाच नाश झाला. शिवाय कित्येक घरे विझविल्यामुळें अर्धींच जळालेलीं आहेत. पत्रविस्तारास्तव पुरें करतों. कळावें लोभ करावा हे विनंती.

एक

फिरस्ता.

---

# वऱ्हाडसमाचार

मिति अधिक ज्येष्ठ शुद्ध ८ शके १७९९

## सोलापुरास हौद बाटण्याची गडबड.

सुमार २० वर्षें झालीं असतील खिस्ती लोकांनीं रस्त्यावरील सार्वजनिक हौदांतून पाणी नेण्याची नगरास प्रथम सुरुवात केली. तेव्हांचा प्रसंग काय विचारावा! पांच पांच हजार हिंदू लोक रस्त्यांत जमून खिस्ती लोकांवर गर्दी झाली. पण शाबास त्या खिस्तीण सारजाबाईची व खिस्ती मंडळीची. त्यांनीं सर्व प्रकारचा त्रास सहन करून व मारही खाऊन रोज नवा हौद या प्रमाणें नगरांतील बहुतेक हौद आपले वहिवाटींत आणिले. पुढें मारहाण करणाऱ्या हिंदू लोकांस शिक्षा झाल्या व सरकारचाही ठराव झाला कीं सार्वजनिक हौदावर सर्व जातीच्या लोकांस पाणी भरण्याचा सारखा हक्क आहे. कोणाचे खासगी हौदावर मात्र खिस्ती लोकांस जाण्याचा हक्क नाहीं. त्या धोरणानें पुढें सातारा, पुणें, इंदापुर वगैरे ठिकाणीं खिस्ती लोकांनीं तो आपणास मिळालेला हक्क अमलांत आणण्याची तजवीज केली व त्या वेळीं त्या त्या ठिकाणींही पुष्कळ गडबड झाली पण शेवटीं सरकारच्या ठरावावर सर्वांनीं लक्ष्य देऊन आपल्या मनोवृत्ती स्वाधीन करून घेतल्या. व खिस्ती लोक सार्वजनिक हौदावरून पाणी भरू लागले. ही गोष्ट त्या प्रसंगीं सोलापुरासही घडून आली किंवा नाहीं समजत नाहीं. हल्लीं तेथें खिस्ती लोकांनीं सार्वजनिक हौदावर पाणी भरलें या संबंधानें फार मोठी गडबड झाली आहे. व तेथील वर्तमानपत्रांत कालमच्या कालम येत आहेत. एके दिवशीं या गोष्टीचा विच्यार करण्याकरितां म्युनिसिप्यालिटीची स्पेशियल सभा भरली होती व तींत कलेक्टर साहेब आणि रा. रा. गणेश बाबाजी माटे यांचा मोठे निकराचा संवाद झाला. कलेक्टर सा. ह्मणाले कीं सर्व जातीच्या लोकांप्रमाणें खिस्ती लोकांसही सार्वजनिक हौदावर पाणी भरण्याची मनाई नसावी. माटे ह्मणाले कीं दहा पांच खिस्ती लोकांकरितां पन्नास साठ हजार हिंदू लोकांची गैरसोय करावी हें योग्य नाहीं. खिस्ती लोकांकरितां आह्मी सर्व हिंदू लोक वर्गणी करून त्यांचे भजनालयाचे अवारांत त्यांस नवीन हौद करून देतों. कलेक्टर साहेब ह्मणाले असें करण्याची कांहीं जरूर नाहीं. पुढें माटे ह्मणाले कीं मुसलमान लोक जेथें पाणी भरतात तेथें खिस्ती लोकांस पाणी भरण्याचा हुकूम देऊन ब्राह्मण लोकांचे हौदावर त्यांनीं येऊं नये असें करावें. कलेक्टर साहेबांनीं या गोष्टीचो निषेध केला. मग माटे ह्मणाले कीं महार मांग चांभार वगैरे खिस्ती झाल्यानें त्यांचें धर्मांतर मात्र होतें पण देहांतर किंवा बीजांतर होत नाहीं ह्मणून त्यांचा स्पर्श आमचे धर्मास विरुद्ध आहे. या गोष्टीचा कलेक्टर साहेबांस फार राग आला व ते ह्मणाले कीं एकंदर चार वेळां तुह्मी खिस्ती लोक महार मांग आहेत असें ह्मणाला, चिंता नाहीं आह्मी महार मांग आहों; परंतु तुमच्या या कृत्यावरून तुह्मी राज्याविरुद्ध बंडावा माजविण्याचे पुढारी आहा असें दिसतें. तेव्हां कठीण प्रसंग समजून कित्येक लोक मध्यस्थ होऊन त्यांनीं साहेबांची विनवणी करून कोप शांत केला. शेवटीं माटे ह्मणाले कीं लोकांकरितां मी हें बोललों त्याचा राग नसावा. मला पाण्याची व एथील वस्तीचीही जरूर नाहीं; पाहिजे तर कमिटीचे कामाचा राजीनामा देतों व सोलापुर सोडून जातों.

असा प्रकार सभेंत झाल्यामुळें शेवटीं ठराव कांहींच न होतां नगर, पुणें, सातारा या ठिकाणीं वहिवाट कशी आहे तिचा दाखला आणवून नंतर ठराव करावा असें ठरलें.

हें प्रकरण इतकें विकोपास गेलें याबद्दल आह्मास फार वाईट वाटतें. व पुढें काय होईल याचा नेम नाहीं असें दुष्ट स्वप्नाचे वगैरे दाखल्यानीं कल्पतरूंत भाकित लिहिलें आहे तसा कांहीं प्रकार न व्हावा असें आह्मी इच्छितों. या पाणी प्रकरणांत सरकारचा इरादा समजून नगर, पुणें, वगैरे ठिकाणचे लोक आज बहुत वर्षें स्वस्थ बसलेले असतां व ती गोष्ट सोलापूरकरांस ठाऊक नसावी असें नसतां तेथें अशी गडबड व्हावी हें चांगलें नाहीं. कारण जातीचा उंच नीचपणा सरकार मानीत नाहीं. व सरकार खिस्तीधर्मी आहे तेव्हां ते खिस्ती लोकांस कित्येक हिंदू लोक मानूं इच्छितील. त्याप्रमाणें नीच कधीं मानणार नाहींत व त्यांनीं असें मानावें ह्मणून समजूत धरणें हें शहाणपणाचें काम नाहीं. नगरास आह्मी प्रत्यक्ष पाहिलें कीं कित्येक दिवस लोकांनीं कित्येक हौद बाटले ह्मणून टाकून दिले होते व खारें पाणी पिऊन कित्येक राहिले होते पण आतां सर्व हौदांचें पाणी सर्व हिंदु लोक खिस्ती लोकांसहित भरतात. नगर एथें पूर्वीपासून मुसलमानलोकांस ब्राह्मणां बरोबर एका हौदांतून पाणी घेण्याचा हक्क होता तर खिस्ती लोकांसच तो कां नसावा? " न नीचो यवनात्परः" असें हिंदु लोकांचें शास्त्र असतां ते गुंडाळून ठेवून जर मुसलमानास ते आपले हौदांतून पाणी भरूं देतात तर खिस्ती लोकांसही त्यांनीं भरूं द्यावें हा न्याय आहे असें सरकारानें ठरविलें व त्या प्रमाणें वहिवाट सुरूं झाली.

आह्मी ह्मणतो कीं आपण आपले स्वतांचे प्रयत्नानें धर्मविरुद्ध कृत्य होण्याजोगें कांहीं करीत नसतां राजाज्ञेनें किंवा सृष्टि व्यवहाराचे ओघानें तसें कांहीं घडूं लागेल तर त्यांत बाट कसला? ती ईश्वराची इच्छा आहे असें स्पष्ट समजलें पाहिजे. व कलीचा प्रादुर्भाव या सदरा खालीं त्या विषयींचें समाधान करून घेण्यास पूर्वजांनीं जागा करून ठेविली आहेच, तिला अनुसरून स्वस्थ बसावें हा दूर दृष्टीचा मार्ग होय.

सोलापुरची एक चमत्कारीक गोष्ट समजण्यांत आली कीं, तेथें खिस्ती लोकांस दुरून पाणी घालावें याकरितां कमिटीकडे सालीना २०० रुपयांचे खर्चानें दोन मनुष्यें ठेविलीं आहेत असें कल्पतरु कर्ते ह्मणतात ही गोष्ट खरी आहे काय? व हा ठराव पास झाला तेव्हां सरकारानें किंवा कोणी खिस्ती मेंबरानीं त्या विषयीं कांहीं आक्षेप घेतला नाहीं कीं काय तें समजत नाहीं.

आप आपले धर्माचा अभिमान सर्वांस असावा हें योग्य आहे व त्याप्रमाणें आमचे बंधू कल्पतरु कर्ते यांस आहे ही संतोषाची गोष्ट आहे पण त्यांनीं या पाणी प्रकरणांतील मागील वहिवाटी व कालदेश वर्तमान याजवर नजर देऊन आपले लेख जरा सौम्य लिहावे व कोणाची फारशी निर्भर्त्सना करूं नये असें आह्मांस वाटतें, पण त्याप्रमाणें करणें किंवा न करणें ही त्यांच्या मर्जीची गोष्ट आहे.

---

## देशाच्या दुरवस्थेस भिक्षुक कारण आहेत काय?

भिक्षुक ब्राह्मणांचा वर्ग हल्लीं आळशी व निरुद्योगी बहुत दृष्टीस पडतो. व क्षेत्रांतून तर यांची संख्या फारच, ह्मणून देशाच्या निकृष्ट अवस्थेस हेच मुख्य कारण आहेत असें कित्येकांस वाटतें. तसेंच अकोल्यासारख्या लहानशा गावांतूनही बहुशा नित्य सकाळीं पांथस्थ ब्राह्मणांचे थवेच्या थवे किती दृष्टीस पडतात व निदान एकेक पैसा त्यांस दक्षिणा देण्यासही पुष्कळ भरण्यामुळें सामान्य प्रतीचे गृहस्थ लोकांस किती कठीण पडतें व त्यामुळें किती ब्राह्मणांस विन्मुख जावें लागते, हें पाहिलें ह्मणजे बहुत लोक ह्मणतात कीं भिक्षुक लोक देशांत दरिद्र वाढविण्यास कारण आहेत. आणि त्यावेळीं खरोखर कोणासही वाटेल कीं, ही गोष्ट अन्यथा नसावी. दहा वीस रुपये महिना मिळविणारा गरीब कारकून दररोज निदान तीन चार आणे भिक्षुकास कोठून देईल ? व तसे प्रत्येकाचे तितके पैसे गेले तर त्यांस भिक्षुकांनींच दरिद्री केलें नाहीं काय ? व अशा परंपरेनें देश दरिद्री होत नाहीं. काय? अस्तु. याच्या उलट हेंही खरें

आहे कीं, २९ वर्षांपूर्वी जितकीं मुलें वेदाभ्यास करीत होतीं व जितक्या वेदाच्या शाळा होत्या त्याच्या पंचविसांश आतां नाहींत. व हा भरणा सर्वच देशावरावर भीक मागण्यास निघाला असें नाहीं. यापुढें भिक्षुकीवर चरितार्थ होणार नाहीं असें पाहून बहुतेकांनीं आपलीं मुलें मराठी व इंग्लिश शिकावयास पाठविलीं. व मागच्यापेक्षां बरेच ब्राह्मण लोक आतां व्यापार, उदीम, दुकान, शेती, व इतर धंदे यांत आढळतात. ही त्यांजमध्यें सुधारणाच समजावयाची. व ही केवळ अवश्यकतेनैच त्यांस प्राप्त झाली आहे. ह्मणून त्याच न्यायानें देशावरावर भिक्षुकीस गेल्यानें कांहीं मिळत नाहीं व वृथा शीण होऊन उपासमारा होतो अशी स्थिति जर त्यांची होऊं लागली तर आपणच पाहूं कीं एकही पांथस्थ भिक्षुक आपले दारीं आलेला आपणास आढळणार नाहीं. ते हिंडतात याचें कारण त्यांस दक्षिणा देणारे अजून कित्येक आहेत व त्यांजवर त्यांचा निर्वाह होतो. कोणी शास्त्री, पंडित, वैदीक ह्मणून त्यांस दक्षिणा देतात, कोणी यज्ञोपवीताचा अधिकारी ब्राह्मण मग तो अक्षरशत्रू व गलेलठ्ठ कां असेना, त्यास दक्षिणा देतात. एक आमच्या सलगीचा पांथस्थ भिक्षुक आह्मांस भेटला त्यास संध्याही पुर्ती येत नव्हती व साक्षर पाहून धर्म करण्याचा लोकांचा प्रघात ह्मणून आह्मी त्यास विचारलें कीं तूं असा शेकडों कोस हिंडून आपला निर्वाह कसा करितोस तो? ह्मणाला १५।२० रुपये महिन्यास कांहीं खोट नाहीं. दररोज सकाळीं शहराचे मोठें गाव असल्यास शेपन्नास घरें फिरून सात आठ आणे दक्षिणा व कोणा एका कडे जेवण मिळतें. असे २।३ दिवस फिरून तो गाव सोडतों. वाटेंत खेडें लागलें तरिही कुणब्यागणीत पावशेर अच्छेर दाणें, पांड्याकडे भोजन व पाटील किंवा देशमुख याकडे आठ चार आणे दक्षिणा, तिला सबब पोराची मुंज, पोरीचें लग्न, महायात्रा वगैरे कांहीं तरी सांगावी ह्मणजे झालें. याप्रमाणें आठ महिने फिरून २०० रुपयांची गाठोडी गावीं रोख घेऊन जातों व ४ महिने घरीं कुटुंबांत राहून पुन्हा दुसरे पर्यटणास निघतो असें त्यानें सांगितलें. या गोष्टीचें आह्मांस परम आश्चर्य वाटलें. अविद्वानाचिही ईश्वर अशा प्रकारें रक्षण करितो. अस्तु.

नाशकास एका सभेंत दोन आठवड्या पूर्वीं हिंदुस्थानास नीचावस्था येण्याचीं कारणें व तीं दूर होण्याचा उपाय या विषयाचें विवेचन चाललें होतें त्यांतील थोडा संवाद आह्मी येथें घेतों.

प्रथमतः रा. ब. विष्णुपंत भिडे आपले नेहमीचे रीतीप्रमाणें ह्मणाले कीं, या दुरवस्थेस भिक्षुक कारण आहेत कां तर ते केवळ दुसऱ्याच्या द्रव्यावर निर्वाह करून निरुद्योगी रहातात. व त्यामुळें देशांत आळस वाढून सर्व देश भिकेस लागला; ब्राह्मणांनीं अभिमान सोडून वाटेल तो उद्योग करून निर्वाह करावा. इत्यादि.

यावर वे० शा. सं. सदाशिव शास्त्री लेले यांनीं अशी पृच्छा केली कीं, आह्मी भिक्षुकांनीं वाटेल तो उद्योग करावा; परंतु तो उद्योग करणारे जे जे लोक आहेत त्यांचा त्यांचा निर्वाह तरी चांगले प्रकारें चालतो आहे काय? आह्मी शाला व किनखाप विणण्याचा विच्यार करितों पण तीं विणणाऱ्यांस तरी बरकत आहे काय? अथवा त्यांचा चरितार्थ तरी चांगल्या प्रकारें चालतो काय?

यावर प्रत्युत्तर न होतां रा. सा. काशिनाथ बाळकृष्ण मराठे तळेगावचे मुनसफ( अकोला हायस्कू० चे माजि० फ० अ० मास्तर )हे उभे राहून भिक्षुकांच्या मतास टेका देऊन ह्मणाले कीं, यज्ञोपवितांचे अधिकारी तेवढे ब्राह्मण नव्हेत. भगवद्गीतेंतील "गुणकर्म विभागशः" या प्रमाणें जो जो जस जसे आचरण करील तस तसा तो ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य इत्यादि वर्णांत जाईल. ज्यास ज्ञान आहे तो ब्राह्मण मग तो अटक नदीच्या पलीकडे युरोपांत व अमेरिकेंत असला तरी त्यास आह्मी ब्राह्मण ह्मणू. दया, शांती, सत्य हीं ठेवून वाटेल तो उद्योग करण्यास ब्राह्मणास बिलकूल हरकत नाहीं.

यावर हायस्कूलचे मास्तर परांजपे यांनीं सांगितलें कीं गीतावचनाचा अर्थ केला तो युक्त नाहीं. केवळ दांडगाईचा आहे.

शेवटीं रा. बा. गोपाळरावजी देशमुख यांनीं सांगितलें कीं हिंदुस्थानास दरिद्र येण्यास भिक्षुक कारण आहेत हें ह्मणणें अयुक्त व अश्लाघ्य आहे, आपले देशाला दरिद्र येण्याला मूळ कारण विलायतची यांत्रिकशक्ती होय. तेव्हां ती यांत्रिक विद्या आपल्या देशांत येऊन पुष्कळ ठिकाणीं चालू झाल्याशिवाय देशाचें नुकसान कधीं भरून येणार नाहीं. केवळ सभांतून मोठमोठीं भाषणें केल्यानें अथवा भिक्षुकांनीं वाटेल तो धंदा करावा असें ह्मणण्यानें देशस्थिति कधीं सुधारावयाची नाहीं. हजारों ब्राह्मण अनेक उद्योग करण्यास सिद्ध आहेत, परंतु त्यांस अमक्या एका उद्योगास लावून देणारा कोणी नियंता भेटत नाहीं. तेव्हां त्यांनीं तरी आपली भिक्षुकी सोडून अभरवशाचे धंदे काय ह्मणून करावे? इत्यादि प्रकारचें मोठें समर्पक व सुश्राव्य भाषण देशमुखांनीं केलें व त्यांस बहुतांनीं माना डोलविल्या.

यावरून केवळ ब्राह्मणांनीं देश दरिद्री केला हें ह्मणणें सयुक्तिक नाहीं याविषयीं आमचे वाचकांची खात्री होईल.

## वऱ्हाड

आमचे नवीन आलेले कमिशनर मि० जोन्स साहेब हे लवकरच सिमल्यास हिंदुस्थान सरकारचे भेटीस जाणार व तिकडे २।३ महिने त्यांस लागणार असें वर्तमान आहे. नागपुर प्रांताच्या संबंधानें ल्यांड रिविन्यूबद्दल एक कायद्याचा मसूदा चालू आहे त्याचे निर्णयास आमचे कमिशनर साहेबांचे भेटीची हिंदुस्थान सरकारास जरूर आहे असें ह्मणतात; कारण हे त्या प्रांताला चीफ कमिशनरचे मुख्य सेक्रेटरी होते. दुसरें, तुरुंगाच्या विशेष सुधारणेच्या विच्याराकरितां कमिटीचें एक प्रकरण आहे. व त्या कमिटीचे हे अध्यक्ष होते व यानीं त्याजबद्दल रिपोर्ट केला आहे त्या संबंधांतही कदाचित यांच्या समक्षतेची जरूर असेल. कसेंही असो. आमचे कमिशनर साहेब नुकतेच आले व इपाल्यानें इकडील कामें सुरू झालीं न झालीं इतक्यांत त्यांची वऱ्हाडांतून २।३ महिने गैरहजिरी होणार, ती न होती तर बरें झालें असतें. असो. त्यांचें काम मेजर बेल साहेब ज्युडिशियल कमि. हेच पहातील असें वाटतें.

अडगावचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर रा. रा पुरुषोत्तमराव नारायण भट यांस मलकापुरास व मलकापुरचे रा. रा. बापुजी रंगनाथ यास अडगावास नेमण्याचा ठराव झाला असें समजतें.

पांच चार वर्षे वऱ्हाडांत फोटोग्राफाचे ह्मणजे तसबिरी काढण्याचें काम करीत फिरत असलेले रा. रा. रघुनाथ बाबाजी नवरंगे पुण्यास गेले. व तेथें गेले आठवड्यांत त्यांचा पुर्नविवाह झाला. विधवा स्त्री रामचंद्र रघुनाथ रिसवडकर यांची कन्या वेणुबाई नावाची २९ वर्षांचे वयाची आहे तिच्याशीं हा विवाह झाला. रिसवड हा गाव वाशीम जिल्ह्यांत आहे तेव्हां तेथील ही विधवा बाई यांस अनुसरली कीं काय तें कळत नाहीं. किंवा मागें मलकापुरास ही एक बाई यांच्यावर प्रीति करणारी गावांत सज्ज झाली होती तीच ही असल्यास न कळे. कोणीही असो. नवरंगे यांनीं पुनर्विवाह केला हें बरें केलें.

हिंदुस्थान सरकाराकडे सिमल्यास स्कूल बुक कमिटीचें काम चालू आहे त्यांत अभिप्राय देण्याकरितां एथील डायरेक्टर रा. ब. नारायण भाई दांडेकर यांस सरकारानें तार करून बोलाविलें आहे व त्याप्रमाणें ते आज तिकडे जाणार आहेत. मागें राव सा. श्रीराम भिकाजी जटार हे डायरेक्टरचें इन्‌चार्ज काम पहातील.

आमचे एथील बारिस्टर रा. रा. लक्ष्मीपति नायुडू महायात्रे करितां श्रीक्षेत्र काशी एथें गेले आहेत.

उमरावतीचे हायस्कुलावरील हेड मास्तरची जागा हल्लीं रिकामी झाली तिजवर कोणाची नेमणूक होईल याकडे सर्वांचें लक्ष्य लागून राहिलें आहे; परंतु आह्मांस असें वाटतें कीं, रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम ए यांशिवाय दुसरे कोणाचाच त्या जागेवर विशेष हक्क पोंचत नाहीं ह्मणून लोकांस संशयांत रहाण्याचें कांहीं कारण नाहीं. व रा. ब. डायरेक्टर साहेबही लोकास फार दिवस संशयांत ठेवणार नाहींत. महाजनी सारखा उत्तम व सर्व प्रकारें योग्य असा गृहस्थ वऱ्हाडांत या जागेकरितां निवडण्यास आज आहे ही गोष्ट मोठी संतोषाची व त्या शाळेच्या भाग्योदयाची होय असें आह्मी समजतों.

या आठवड्यांत ३।४ दिवस महामारीचा उपद्रव झाला होता. माणसें १९ मेलीं कालपासून शम आहे.

महामारीचा उपद्रव पेठेंत आहे व आठवडेबाजारही [illegible] भरत असतो. ह्मणून तूर्त अको[illegible] भरणार.

रा. रा. घों[illegible] उर्दू अखबाराच्या ए[illegible] दिलें. हें पत्र त्यांच्या हा[illegible] बर्षे चांगलें चुरचुरीत चाललें [illegible] आह्मी त्यांची तारीफ करितों.

सांगलीकर नाटकवाल्यानीं काल प्रमीला स्वयंवर व ध्रुवाख्यान फार उत्तम केलें चतुर श्रोते जनानीं १०१९ वेळां अप्लाज (स्तुतीप्रद टाळी) केली.

## वर्तमानसार

लढाईसंबंधीं—रशियन फौजेचा आर्मेनियामध्यें प्रवेश झाला, तसेंच रशियन फौज एका ठिकाणीं डान्यूब नदी उतरून तुर्कस्थानांत शिरली रेनि एथें नदी उतरत असतां रशियन फौजेचा तुर्की फौजेनें पराभव केला या गोष्टीबद्दल दोहोंकडच्या दोन खबरा वेगवेगळ्या आहेत. व हरएक तुर्कस्थानमार्फत व रशियामार्फत येते तार त्यांत कांहींना कांहीं फरक असतोच. तुर्कस्थानानें काबुलच्या अमिराकडे आपला एक स्पेशियल वकील मुद्दाम पाठविला आहे तो थोड्या दिवसांत तिकडे जाईल. त्या अमिरास रशियाविरूद्ध तयार करावें असा तुर्कस्थानाचा बेत आहे. पण तसें होईल किंवा नाहीं याविषयीं कांहीं नेम सांगवत नाहीं—

रशियन लोक डायडिन पर्यंत गेले. हें शहर बेयाझिटपासून २० कोसांवर आहे. तेथील लोक [illegible] आदर करीत आहेत असें वर्तमान [illegible] तो सर्व प्रान्त हस्तगत झाल्यावर सदर्हू दोन्ही गावीं ग्यारिसन ठेवून रशियन फौजा इर्जरोमकडे जातील. एशियांतील तुर्कस्थानावर गेलेली रशियाची सर्व फौज अजून कार्स एथेंच आहे. व त्यांना अन्नसामुग्री मिळण्याचें बंद झाल्यामुळें ती पुढें चाल करीत नाहीं असें रुटरचे तारेवरून कळतें. काळ्या समुद्राजवळील बाटोम एथें रशियन फौजेचा पराभव झाला. तुर्की लोकांची खबर आहे कीं, ४००० रशियन ११वे तारखेस ठार मेले. रशियाकडील खबर आहे कीं पराभव झाला पण नुकसान फार थोडें झालें. टर्कीचें नुकसान फार झालें. त्या भागास रशियन फौज ५०००० व टर्कांची ३०००० आहे.

सर रिचर्ड टेंपल साहेब मुंबईचे गवरनर कराचीकडे गेले आहेत.

भावनगरचे तरुण राजास पुढील वर्षाचे एप्रिल महिन्यांत राज्याची मुखत्यारी द्यावी असा पोलिटिकल एजंटानीं रिपोर्ट केला व त्यावर गवरनर साहेबांनीं आपला अनुकूळ अभिप्रायही दिला आहे.

## सिंक्लेअमेमोरियल फंड.

रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण बापट
डे. ए. इन्स्पेक्टर उमरावती २०

| | |
|---|---|
| ,, लक्ष्मण गोविंद हे. मा. वाशीम | १० |
| ,, गोविंद विश्वनाथ हे. मा. उमरावती | ७८ |
| ,, विठ्ठल आत्माराम हे. मा. सिरपुर | ५ |
| ,, गोविंद कृष्ण हे. मा. मोर्शी | ५ |
| ,, नारायण प्रभाकर देऊळगावराजा | ८ |
| ,, सिताराम गोपाळ अ. मा. उमरावती | ४ |
| ,, त्रिंबक कोंडो हे. मा. उमरावती | ३ |
| ,, रामचंद्र बाळकृष्ण हे. मा. नांदगाव | ३ |
| ,, भीमराव केशव हे. मा. वलगाव | ३ |
| ,, वामन अण्णाजी हे. मा. शिराळें | ३ |
| ,, गंगाधर बल्लाळ हे. मा. जरूड | ३ |
| ,, महादेव वासुदेव हे. मा. हिवरखेड | ३ |
| ,, नारायण विष्णु हे. मा. पुसला | ३ |
| ,, महादेव नारायण हे. मा. वरूड | ३ |
| ,, गणेश भास्कर हे. मा. नेर | ३ |
| ,, बळवंत श्रीपत अ. मा. वाशीम | ३ |
| ,, गणेश गोविंद अ. मा. सिरपुर | ३ |
| ,, केशव रामराव हे. मा. मंगरूळपीर | ३ |
| मि. गुलाम मोहीमोद्दीन हिं. मा. नांदगाव | ३ |
| ,, अमरोद्दीन हिं. मा. मंगरूळपीर | ३ |
| ,, अबदुल रहिमान हिं. मा. मोर्शी | २८ |
| ,, अबदुल शकूर हिं. मा. तळेगाव | २८ |
| रा. रा. श्रीनिवास कृष्ण भातकुली | २८ |
| ,, गंगाधर रावजी अ. मा. उमरावती | २८ |
| ,, रघुनाथ गणेश हे. मा. साऊर | २८ |
| ,, आत्माराम लक्ष्मण अंजनगाव | २८ |
| ,, विश्वनाथ दामोदर टाकरखेड | २ |
| ,, हरी गोविंद हे. मा. यावली | २ |
| ,, लक्ष्मण धोंडदेव हे. मा. तळेगाव | २ |
| ,, रामचंद्र सिताराम हे. मा. थुगाव | २ |
| ,, गोविंद रामचंद्र अ. मा. मोर्शी | २ |
| ,, गोपाळ रामराव हे. मा. सेंदुरजन | २ |
| ,, अनंतराव विठ्ठल हे. मा. सिरखेड | २ |
| ,, नारायण रामचंद्र हे. मा. बिलोरा | २ |
| ,, तानबा अवचित हे मा. लोणी | २ |
| ,, लक्ष्मण बाळकृष्ण हे. मा. आमनेर | २ |
| ,, कृष्णाजी हरी हे. मा. [illegible]जुरें | २ |
| ,, बापुजी विनायक हे. मा. काटपुर | २ |
| ,, दिनकर नारायण अ. मा. वाशीम | २ |
| ,, श्रीधर बाळकृष्ण हे. मा. किन्ही | २ |
| ,, नागो सखाराम हे. मा. राजुरा | २ |
| ,, गणेश दाजी हेड मा. शेलू | २ |
| ,, वासुदेव विठ्ठल हेड मास्तर गिरोली | २ |
| ,, बळभीम बाबाजी हेडमास्तर धामनी | २ |
| ,, अहंमद अली हे. मा. तळेगाव | २ |
| ,, वासुदेव हरी हे. मा. रेवसें | १८ |
| ,, महादेव देवीदास हे. मा. मनभा | १८ |
| ,, वासुदेव गणेश हे. मा. रिथपुर | १८ |
| ,, केशव जानराव हे. मा. बनोडा | १८ |
| ,, मारुती गणोबा हे. मा. मंगरूळी | १८ |
| ,, बळवंत विश्वासराव हे. मा. खेड | १८ |
| ,, यादव महादेव हे. मा. आंबाडा | १८ |
| मि. महमद हयात हिं. मा. वरूड | १८ |
| ,, शेख दाऊद हिं. मा. शेंदुरजन | १८ |
| रा. रा. पैकाजी व्यंकाजी उमरावती | १ |
| ,, लक्ष्मण रामचंद्र अ. मा. वलगाव | १ |
| ,, यादव आत्माराम अ. मा. सिगळें | १ |
| ,, बाजीराव व्यंकटेश अ. मा. वलगाव | १ |
| ,, केशव रामचंद्र अ. मा. जरूड | १ |
| ,, परशराम रामचंद्र अ. मा. हिवरखेड | १ |
| ,, भाऊ आपाजी अ. मा. पुसलें | १ |
| ,, भगवंत शामराव अ. मा. वरूड | १ |
| ,, लक्ष्मण आनंदराव अ. मा. नेर | १ |
| ,, मारुती विठ्ठल अ. मा. रिधपुर | १ |
| ,, ओंकार लक्ष्मण अ. मा. हिवरखेड | १ |
| ,, भिकाजी बाळाजी अ. मा. खेड | १ |
| ,, भास्कर दत्ताजी हे. मा. बिलोरा | १ |
| ,, रावजी मेघःशाम अ. मा. मोर्शी | १ |
| ,, राजाराम नारायण अ. मा. वाशीम | १ |
| ,, सोनबा सदबा अ. मा. सिरपुर | १ |
| ,, राजाराम लक्ष्मण हे. मा. वाशीमपेठ | १ |
| ,, गणेश व्यंकटेश अ. मा. राजुरा | १ |
| ,, जयराम बापुजी हे. मा. वनोज | १ |
| ,, गोपाळ महादेव हे. मा. तऱ्हाळें | १ |
| ,, हरी दाजी हे. मा. कंझारें | १ |
| ,, चिमणाजी कोंडजी अ. मा. मगंरूळ | १ |
| ,, बळवंत सावळयाराम अ. मा. मगंरूळ | १ |
| ,, शंकर रामचंद्र हे. मा. कोंडोली | १ |
| ,, अण्णाजी अमृत हे. मा. मानोरा | १ |
| ,, रामचंद्र गोविंद हे. मा. कवठळ | १ |
| ,, ए. अ. मा. म. शा. मंगरूळ | १ |
| मि. शेख दादू हिं. शा. मगंरुळ पीर | १ |
| रा. वासुदेव रघुनाथ हे. मा. मोटेगाव | ८१२ |
| ,, महादेव नारायण हे. मा. पार्डी | ८८ |
| | १९७-४ |
| मागील बेरीज | १२२०-८ |
| एकंदर बेरीज | १४१७-१२ |

## वऱ्हाडांतील छापखान्या संबंधीं नियम.

[illegible] लिहिलेले नियम सन १८६७ चा आक्ट नंबर २५ यांतील उद्देश शेवटास नेण्याकरितां कलम २० प्रमाणें करून सर्व लोकांचे माहितीकरितां प्रसिद्ध केले आहेत. सन १८६७ चा आक्ट नंबर २५ ह्मणजे (छापखाने व वर्तमानपत्रें या बद्दल व ब्रिटिश इंडियांत छापलेल्या बुकांच्या काप्या जपून ठेवण्याकरितां व तीं बुकें नोंदण्याकरितां आहे.)

१. खालीं लिहिलेले नियम व सन १८६७ चा आक्ट नंबर २५ यांतील कायद्याच्या शर्ती होईल तेथपर्यंत अमलांत आणण्याकरितां प्रत्येक मनुष्य ज्याच्या जवळ छापखाना आहे त्याणें आपल्या जवळ सदहू आक्टाची व या नियमाची प्रत आपल्या छापखान्यांत किंवा आफिसांत प्रसिद्ध ठिकाणीं जी भाषा चांगली समजत असेल त्या भाषेंत टांगून ठेवावी.

२. जिल्ह्याचे डेपोटी कमिशनर व त्यांच्या हाताखालील लोक ज्यांना माजिस्त्रेटचा अधिकार आहे व ज्यांचे हद्दींत छापखाने आहेत त्यांना वरील नियम अमलांत आले कीं नाहीं हें पहाण्याकरितां वेळोवेळीं छापखाने व त्यांचें आफीस पहाण्याचा अधिकार आहे.

३. छापणारे व छापून प्रसिद्ध करणारे यांनां कायद्याप्रमाणें ज्या गोष्टी करण्याची जरूरी आहे त्या वर्जिल्या असतां त्याचा लवकर पत्ता लागावा ह्मणून त्या जिल्ह्याचे डेपोटी कमिशनर यांनां जो कोणी मनुष्य अमुक गोष्ट वर्जिली आहे अशी बातमी देईल त्यास लहानसें बक्षिस देण्याचा अधिकार आहे व तें बक्षिस छापणारा व छापून प्रसिद्ध करणारा यास दंड करून द्यावें.

४. जिल्हा माजिस्त्रेटाचे कचेरींत आणि आठराव्या कलमांत सांगितलेले कामगार यांच्या आफिसांत जिल्ह्याचे भाषेंत कायद्याची प्रत व हे नियम टांगून ठेविले जातील आणि कारकून अथवा क्लार्क प्रत्येक आफिसांत असेल त्याच्याकडे कायद्याप्रमाणें आफीस संबंधीं या आक्टाप्रमाणें ज्या गोष्टी करण्याची जरूरी आहे त्या केल्या किंवा नाहीं हें पहाण्याचें काम त्यांचकडे सोपून दिलें जाईल.

७. जिल्ह्याचा डेपोटी कमिशनर ज्याचे हद्दींत छापखाना आहे तो या आक्टाचे नववें कलमांत सांगितलेला कामगार समजला जाईल. व त्या कलमांत सांगितल्याप्रमाणें जें बूक छापलें जाईल त्याच्या तीन प्रती सदर कामगाराच्या आफिसांत द्याव्या व त्या बुकांचे किंमतीचें बिल दाखल करावें आणि १८व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें एक हकिगतवार व खरा आहे अशाबद्दल सही करून तक्ता दाखल करावा.

८. या आक्टाचें ११वे कलमांत सांगितलेल्या अधिकाऱ्याकडे पाठविण्याकरितां दोन प्रती हैदराबादचे रेसिडेंट मार्फत पाठविल्या जातील व तिसरी प्रत वऱ्हाडचे बुकडेपोचे क्युरेटर यांचे आफिसांत ठेवण्याकरितां या प्रांताचे शाळाखात्याचे डायरेक्टर यांचे मार्फत पाठविली जाईल.

९ वऱ्हाडचे शाळाखात्याचे डायरेक्टर यांना या अक्टाचें कलम १८ प्रमाणें रजिस्ट्रार नेमिलें आहे. आणि या कलमांत सांगितल्याप्रमाणें बुकाची यादी रजिस्टर व त्या संबंधी दुसरी माहिती त्यानें ठेवावी. आणि कलम २० यांत सांगितल्याप्रमाणें बुकें नोंदलीं असतील त्याचा तक्ता रेसिडेन्सी आ.मध्यें छापून प्रसिद्ध करावा आणि त्याच्या दोन नकला रेसिडेन्टाचे मार्फत स्टेट सेक्रेटरी आणि हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी होम डिपार्टमेंट याचेकडे पाठविण्याकरितां पाठवाव्या. ज्या जिल्ह्याचे डेपोटी कमिशनर मार्फत बुकें आलीं असतील त्यांचे कडे तिमाही उत्पन्न झाल्याचा पैसा पाठवावा. व तो पैसा डेपोटी कमिशनर यांचेकडे खजिन्यांत जमा करण्याकरितां पाठवून द्यावा.

१०. या आक्टा अन्वयें जमाखर्च डेपोटी कमिशनर ठेवतील हे हिशोब डेपोटी आर्कोंटेंटच्या मार्फत प्रतिवर्षीं रेसिडेंटाकडे पाठविले जातील.

११. आठव्या नियमांत सांगितलेलीं बुकें आल्या नंतर डेपोटी कमिशनर या आक्टाचें कलम ३ प्रमाणें सर्व गोष्टी बरोबर झाल्या किंवा नाहीं हें पाहतील. याच प्रमाणें शाळाखात्याचे डायरेक्टर व बुक डेपोचे क्युरेटर यांचे आफिसांत रीत ठेवावी.

१२. सन १८६७ चा आक्ट नंबर २५ व वरील नियम या बरहुकूम जी माहिती देणें जरूर आहे ती प्रत्येक छापणारानें जिल्ह्याचे डेपोटी कमिशनर साहेबांस दिली पाहिजे. आणि त्यानें प्रत्येक वर्षीं टायपावर किंवा शिळेवर छापलेल्या किंवा प्रसिद्ध केलेल्या बुकाची यादी डेपोटी कमिशनर साहेब यांजकडे पाठवावी. बूक या शब्दाची व्याख्या कायद्यांत दिली आहे त्याप्रमाणें समजावी. या नियमांत व वरील आक्टांत सांगितल्या प्रमाणें कोणचा ही हुकूम न तोंडण्याबद्दल त्यास द्या बरून ताकीद दिली आहे.

## नोटिसा.

सिता गारसी जात मराठीण रहाणार पेठ उमरावती इला खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, सन १८७६ इसवी सालांत तुह्मी आमशीं करार केला कीं मला आपण २० रुपये महिना बिनखर्चीं देत जावे व एक वर्षाचे अगाऊ रुपये द्यावे ह्मणजे माझे दागिने उमरावती एथें गहाण आहेत ते सुटून येतात व तेथून आल्या बरोबर तुमचे एथें ठरावाप्रमाणें तुमची ताबेदारी करून तुमचेही कर्जातून मुक्त होईन आणि असें घडून आल्यास जे मी तुमचे पासून रोख नगदी २४० रुपये घेतले ते मी पांच रुपये शेंकड्याप्रमाणें ऐन व व्याज एकदम भरून देईन असा करार करून रुपये घेऊन उमरावतीस गेलें दिवसापासून परत आली नाहींस आणि मी दोन-चार वेळ तुजकडे मनुष्य पाठविला असतां आज येतें उद्या येतें असें आजपर्यंत चाळविलें व अमतां अखेरीस आपली इमानदारी उघाडकीस आणली व मजलाच उलट २०७ रुपयाची नोटिस दिली परंतु असे बेमानीनें माझे रुपये तुला पचणार नाहींत हें खूपसमजावे आपण ज्या इराद्यानें नोटिस दिली तो इरादा एकीकडे ठेवून ही नोटिस पावल्या दिवसापासून १५ दिवसांचे आंत आमचे ऐन व व्याज सुद्धां रुपये देऊन आमची रसीद घ्यावी असें न केल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिसीचे खर्चासमेत भरून घेतले जातील. कळावें तारीख ११ मे सन १८७७ इसवी.

(सही) रामजी वल्लद यौगाजी सोनार वस्ती मूर्तिजापुर

दस्तुर खुद्द

नोटिस.

रा० रामलाल मुलींधर मारवाडी रहाणार माटरगाव बुद्रूख तालुके खामगाव यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी मला माटरगाव एथील जागा ६१ हात लांब व ५१ हात रुंद किंमत ३०० रुपयांस फरोक्त करून त्याजला अजमास एक महिना झाला असून अद्यापपावेतों खरेदीखताप्रमाणें जागा ताब्यांत दिली नाहीं यास्तव या नोटिसीनें कळविलें जातें कीं नोटिस पावल्या पासून आठ दिवसांत जागा खरेदीखताप्रमाणें द्यावी आणि पावती घ्यावी याप्रमाणें न केल्यास नुकसानीसह तुह्मावर फिर्याद केली जाईल कळावें तारीख १५ माहे मे सन १८७७ इसवी.

(सही) व्यंकटराव माधवराव देशमुख वस्ती मौजे माटरगाव बुा

दस्तुर खुद्द

हे पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ११ — अकोला, रविवार ता० २७ माहे मे सन १८७७ इ० — अंक २१

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहांशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

## विविधज्ञानविस्तार.

**मासिकपुस्तक.**

[कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.]

शास्त्रीयविषय, आरोग्यविषय, भाषासुधारणा, मनोरंजन, पुस्तकपरीक्षा, सुंदर ग्रंथांचीं भाषांतरें, इतिहास, विख्यात पुरुषांचीं चरित्रें, कविता इत्यादि विषयांचा समावेश करणारें या प्रकारचें, सर्व महाराष्ट्र देशामध्यें हें एकच पुस्तक आहे.

किंमत.

| | रु. आ. |
|---|---|
| वर्षाची आगाऊ ........... | ३—० |
| मागाहून. ........ | ४—८ |
| सहामाही आगाऊ. | २—० |
| किरकोळ अंकास | ०—६ |
| टपालहांशील वर्षाचे. | ०—६ |

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं मुंबईंत काळकादेवीच्या रस्त्यावर देवीसमोरील विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत व्यवस्थापक यांच्या नांवें वर्षाची अगाऊ वर्गणी ( रु. ३ आ. ६ ) सुद्धां पत्र पाठविल्यास पुस्तक चालू होईल.

व्यवस्थापक, विविधज्ञानविस्तार.

मराठ्यांच्या इतिहासाला साधनीभूत अशा आमचे लोकांनीं लिहिलेल्या मराठे व मुसलमान यांच्या राज्याविषयीं जुन्या बखरी छापून प्रसिद्ध करण्याचा आजपर्यंत कोणी यत्न केला नव्हता, त्या आमचे पुस्तकांतून प्रसिद्ध व्हावयास आरंभ झाला आहे; तसेंच नागपुरकर भोसले यांचा निराळा इतिहास अद्याप कोणी लिहिला नाहीं तोही या पुस्तकांत येत आहे. हें पाहून राजेरजवाडे, विशेषतः संस्थानिक व वऱ्हाडप्रांतस्थ लोक याकडे लक्ष देतील अशी उमेद आहे.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपले अमोल्य पत्रीं फार दिवसानीं लिहिण्याचा प्रसंग आला आहे तर आपण मेहेरबानगी करून जागा द्याल अशी पूर्ण आशा बाळगून सेवेशी दोन ओळी लिहिल्या आहेत.

काल अस्तमानीं ह्मणजे सुमारें २ घंटे दिवस होता मी शेगावाहून बाळापुरास बाजार करून आलों तो बाळापुरच्या पेठेंत व वेशी बाहेर बराच समाज उभा असोन मोठे मोठे ठिकाणीं पान सुपारी हार तुरे वगैरेचा बराच थाट होत होता हें पाहून मला फारच आश्चर्य वाटलें कीं बरेच वर्षांत अशा प्रकारें थाटाचा समाज कधीं पहाण्यांत आला नाहीं. हें सर्व पहात पहात घरापर्यंत येऊन पोहोचलों तेव्हां असें समजलें कीं एथील टाऊन पोलिसचे चीफ कानस्टेबल मि० मीर फजल अली यांची बदली शेगाव एथें होऊन ते तिकडे जाणार सबब सर्वत्र समाज जमला असून साहू सावकार यांच्या एथें चीफ साहेब यांचें आगत स्वागत होत आहे व बाहेरही मैदानांत यांकरितां लोक जमले आहेत असें समजलें. नंतर मी ही माझे बाजारी सामान घरीं ठेऊन समाजांत शरिक झालों तों चीफ साहेबही पुण्यमय होऊन मोठ्या थाटानें १००।२०० लोकांसह येत होते. पुढें मैदानांत वेशी बाहेरही अर्धा तास पर्यंत बराच थाट होऊन सर्व जातीच्या मंडळींनीं फारच फार दुःख चीफ साहेब यांच्या जाण्यापासून होत आहे असें प्रदर्शित केलें व कितीएकांचे नेत्रावाटे तर खरोखरच अश्रुधारा चालल्या होत्या. सदरील चीफ सा. यांच्या जाण्यामुळें रयतेस एवढें दुःख होण्याचें काय कारण असावें याबद्दल मी तारिफ केल्यानें काय उपयोग? याचा वाचकच विचार करतील.

सुमारें दीड दोन वर्षें झालीं ची. सा. यांची एथें सरकारानें नेमणूक केली तितक्या अवकाशांत यांची लोकप्रियता हुशारी व काम करण्याची शैली तारिफ करण्यासारखी दिसून आली. सरकारी काम उत्तम प्रकारें करून रयतेस सुखी ठेवणे हें धोरणबाज मनुष्याखेरीज होणें नाहीं. सदहू ची. सा. जातीनें मुसलमान असून त्याणी हिंदुशीं कधीं भेद दाखविला नाहीं. व यामुळेंच सर्व आबालवृद्धास त्यांच्या गेल्यामुळें दुःख झाल्यावाचून राहिलें नाहीं. तसा असल्यास एखादाच कोणी द्वेषी असेल तो असो. महाराज मी तरी एथेंच राहाणार असोन बरेच सरकारी कामगार एथें येऊन गेले व सरकारी कामेंही त्यांनीं उत्तम केलीं असे असतील परंतु रयतेस सुखी ठेवून सरकारी कामही उत्तम प्रकारें करणें हे चातुर्य यांच्या ठायींच मी विशेष पाहिलें. यांस मराठी लिहितां वाचतां येत असोन शिवाय यांची स्वभाषाही यांस उत्तम प्रकारें येत आहे. व यांच्या हुशारीमुळेंच पोलिस इन्स्पेक्टर यांच्या शिफारसीवरून यांची बदली झाली आहे तर हा मजकुर आपले पत्रांत छापून प्रसिद्ध व्हावा. कळावें हे विनंती.

एक
'बातमीदार'

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. खालील चार ओळी मी आपले अल्प बुद्धीनें लिहिल्या आहेत. त्यांत कांहीं कमजास्त असल्यास मेहेरबानीनें दुरुस्त करून येत्या अंकीं छापून प्रसिद्ध कराव्या.

वणी जिल्हा तालुके यवतमाळ यांतील मौजे नांझे हा गांव तीस साला इजाऱ्यांनीं असून लोक वस्ती बरीच विस्तीर्ण आहे माड्या, खपरेलू व गवती अशीं घरें फार उत्कृष्ट असून ती गावास शोभा देताहेत. लोकांच्या संग्रहास गाई व बैल दहा पांच मोठ्या गांवापेक्षां ज्यास्त आहेत. गावांत विहीर एकच असल्या कारणानें साऱ्या गांवाचा भरणा एकीवर पडतो हल्लीं उष्णकाळांत असलेली विहीर अटते. त्याजमुळें लोकांस फार अडचण पडते. गांवाच्या दक्षिणेस गांव सोडून एक बावराबर तलाव आहे. त्या तलावास बारमाही पाणी असतें. त्या योगानें जनावरास फार सोय आहे दुष्काळामुळें इकडेस हजारों लोक आले आहेत. त्या लोकांस पाटील यांनीं तलाव खोदण्याच्या कामीं लावून जगविणें लाविलें आहे. पाटील मोठे नामांकित आहेत त्यांची श्रद्धा धर्मावर फार आहे. एथें एक गांवठी शाळा आहे. त्या शाळेची स्थिति आज पाहूं गेले असतां सरकारी तीस रुपयांचे इतकी आहे. कारण हल्लींचे काम करणार जे मास्तर आहेत ते हुशार असून मनमिळाऊ आहेत ते मुलांच्या आई बापास उपदेश करून विद्येची अभिरुची त्या लोकांस लावितात. कळावें ता. ११।५।७७ इसवी.

एक
'मुलांचा कनवाळु,

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. मी खालीं सही करणार लाचार होऊन आपले मार्फत मजकूर छापविण्याकरितां या पत्रानें कळविलें आहे तर जनाब रेसिडेंट साहेब बहादुर मुलुक अमानी हैदराबाद यांचे खिजमतीस प्रसिद्ध करतील ही आशा आहे त्याबद्दल खालीं लिहिल्याप्रमाणें:—

जनाब रेसिडेंट साहेब बहादुर मुलुक अमानी हैदराबाद यांचे हुजूर अर्ज—मोठीच अपसोसाची गोष्ट आहे कीं माझी मुलगी ६ वर्षांची हे देवढी समोर खेळत असतां बुलदे इलिचपुर एथील खाजे बदरोद्दीन दरोगा कमेटीकडील, न्याहाल सिंग चीफ, महमद अजीम चीफ कान्स्टेबल, रामसिंग चपराशी आणि पापा कसबन खामगावकर हे इसम तहशिलदार साहेब तालुके इलिचपुर यांचे गाडींत बसून अविच्यारानें रस्त्यानें गाडी पळवीत चालले. त्या योगानें गाडी खालीं चेंदून तिचा खून झाला. याबद्दल सरासरी बरेच दिवस झाले आजवर मी अधिकारी लोकांजवळ अर्ज्या देऊन थकले परंतु चौकशीच होत नाहीं याचें कारण समजत नाहीं. पोलिस सुपरइन्टेन्डेन्ट साहेब बहादूर जिल्हे इलिचपुर यांचे कडेस अर्ज दिला होता पण अर्जाला कोर्टफीचें टिकिट लाविलें नव्हतें ह्मणून अर्जावर हुकूम देऊन अर्ज फेकून दिला. यावरून मोठी अपसोसाची गोष्ट आहे कीं, प्रत्यक्ष गुन्हा झाला असून त्याबद्दल चौकशी करीत नाहींत. असें झाल्यास फार अन्याय आहे. इकडे इंग्रजी अम्मल असून भोलाई नाहीं. परंतु एकंदरीवरून मजला तर असें वाटतें कीं, सरदार लोक जेव्हां चौकशी करीत नाहींत तेव्हां हे खचीत आहे कीं घोंटाळा आहे. गुन्हा होतांच पोलिसानीं चौकशी केली पाहिजे. तसें आजवर कोणाकडून घडून आलें नाहीं. हल्लीं मी फार लाचार होऊन वर्तमानपत्रकर्ते यांचे मार्फत हुजुरास हकीकत कळविण्याकरितां जाहिरात दिली आहे. तिकडून हुजूर ध्यानीं येऊन माझी दाद लागेल ही आशा आहे. दुसरें, ही चौकशी खुद्द खावंदानीं किंवा जुडे. क सा. बहादुर, अथवा मेंजी सा., फिटझरलड सा. यांणीं केल्यास बरोबर चौकशीस अर्ज पोहोंचेल आणि याबद्दल उघडपणें ध्यानीं येईलच. कळावें ता २१।५।७७ इसवी.

( सही ) छोटीबाई मर्द राजुभाई
लखारीण वस्ती इलिचपुर

---

मुक्काम रिसवड प्रांत वऱ्हाड तारीख १२ एप्रिल सन १८७७ इसवी.

रा. रा. ज्ञानोदय कर्ते यांस:—

वि. वि. मी आज बरेच महिने या गावांत आहे हें गाव जरी मुख्य रस्त्याच्या अगदीं एकीकडे आहे तथापि मोठ्या महत्वाचें आहे. एक हिंदु धर्माच्या संबधानें, व दुसरें, एथें चांगली पेठ आहे या नात्यानें; ह्मणून याविषयीं थोडीशी माहिती देतों.

या गावाचें मुळचें नाव 'ऋषिवट, ह्मणजे ऋषींच्या वास्तव्याचें ठिकाण. एथें देवीचा एक तलाव आहे. ह्या देवीचें संस्कृत भाषेत एक पुराण आहे. एथें एक हेमाडपंती देऊळ आहे त्यांत पाण्याचा कांहीं चमत्कार आहे ह्मणजे शिवाच्या पिंडीखालीं पुष्कळ पाणी आहे. परंतु असें पाणीं असणें हें कांहीं सृष्टि नियमाच्या विरुद्ध नाहीं. रानांत कित्येक ठिकाणीं देवळाचे दगड पडलेले आहेत. चार वर्षांपूर्वीं

एक भस्माचे व एक शंखाचें अशीं २ पेवें एका मुसलमानाच्या घराचा पाया खणतांना सापडलीं तीं गावकऱ्यांनीं बुजून टाकविलीं. एथें दोन चार चांगल्या विहिरी आहेत त्यांस कुंडें ह्मणतात त्यांपैकीं एकीचें नाव "द्रौपदी कुंड" असें आहे. या सर्वांवरून आपल्या लक्षांत आलेंच असेल कीं ही जागा पूर्वी ऋषींची असावी.

एथून दहा कोसांवर मेहेकर तालुक्यांत लोणार या नावाचें मोठें थोरलें तळें आहे त्यांत निरनिराळ्या प्रकारचे क्षार उत्पन्न होतात. पुष्कळ युरोपियन शास्त्रज्ञ हें तळें पहाण्यासाठीं मुद्दाम येत असतात. सुमारें २० कोसांच्या अंतरावर औंढ्या नागनाथ ह्मणून एक "ज्योतिर्लिंग" आहे. तसेंच माहूरहि या गावापासून ३०।३५ कोस येईल. जमीन चांगली सुपीक असून पाणीहि विपुल आहे. यावरून या ठिकाणीं ऋषींची वस्ती असणें कांहीं असंभाव्य नाहीं. जरी आतां एथें पांच पन्नास शेट सावकार जमले आहेत आणि जरी हा गांव परगण्याचा असून पेंठेचाहि आहे. तथापि पाहिली मजा येणार आहे काय? ज्या वेळेस एथें ऋषि रहात असतील त्या वेळेस हें स्थळ किती रमणीय दिसत असेल बरें? लिंगाइत व जैन धर्माचे शिंपी या गांवीं पुष्कळ आहेत. मारवाड्यांची तर चांगली दाट वस्ती आहे.

एथें कापूस व धान्य ह्यांचें चांगलेंच पीक होत असतें. जरी धारण अगदी महाग झाली आहे, तरी १४।१५ शेर गहूं, २० शेर ज्वारी, १० शेर चांगले तांदूळ असे भाव आहेत. दूध रुपयास १८ शेर मिळतें. लमाणांचे तांडे अक्षयीं एथून माल घेऊन जातात. हा सर्व माल खामगावास जातो.

एथून १२ कोसांवर तालुक्याची जागा आहे, व तीच जिल्ह्याची मुख्य जागा आहे. तिचें नाव वाशीम. तेथें बालाजीचें एक मोठें प्रचंड देऊळ आहे, तें कांहींसें पर्वतीच्या सारखें व कांहींसें ओंकारेश्वराच्या सारखें आहे. अन्नसत्रांत नित्य २५ ब्राह्मण होतात. या देवालयास २०।२५ हजारांचें उत्पन्न आहे, आणि बालाजीच्या मूर्तीवर २०।२५ हजारांचे दागिने आहेत. हें देऊळ नागपुरकरांचे दिवाण भवानी काळू यानीं शके १७०० त श्रावण शुद्ध १३ रोजीं बांधलें, असा एक दगडी स्तंभावर लेख आहे. त्यांत शक मात्र चांगला समजतो, बाकीचीं अक्षरें पुसट दिसतात. जवळच एक उत्तम फरसबंदी केलेलें तळें आहे. त्याची लांबी रुंदी सुमारें १७५ हात आहे. एथें एक लायब्ररी ह्म० पुस्तकालय आहे. तेंही चांगल्या स्थितींत आहे असें दिसतें.

आपला सेवक
गो० ना० का०

वऱ्हाडसमाचार

मिति अधिक ज्येष्ठ शुद्ध १५ शके १७९९

## तुर्कस्थानची माहिती.

तुर्कस्थानचें राज्य तीन खंडांत आहे त्याची मोजदाद अशी:—

| | चौरस मैल | लोकसंख्या |
|---|---|---|
| युरोपांत | १,३८,२६४ | ८३१५००० |
| आशियांत | ६,६०,८७० | १६०५०००० |
| आफ्रिकेंत | ९,४३,७४० | ३८००००० |
| | १७४२८७४ | २८१६५००० |

युरोपांतील तुर्कस्थानांत सालवोनियन जातीचे पुष्कळ लोक आहेत. बलगेरियन सर्वियन हे त्यांतीलच आहेत. बलगेरियन हे तुरियन जातीचे अलताई पर्वताकडून ९ व्या शतकांत आलेले लोक आहेत. त्यांनां थिओडोर राणीनें ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. बलगेरियांत हल्लीं जे मुसलमान आहेत त्यांची व या ख्रिस्तियन लोकांची मूळची एकच जात होय. तुर्कस्थानचें राज्य मुसलमानी झाल्यावर हे लोक मुसलमान झाले.

व्यापार संबंधानें पाहिलें तर युरोपांतील तुर्कस्थानांत दर वर्षास बाहेरून १८ कोटि ५० लक्ष रुपयांचा माल येतो. व १० कोटी रुपयांचा माल बाहेर जातो. इटली, ग्रेटब्रिटन, आस्त्रिया, ग्रीस, आणि रशिया या पांच देशांसी तुर्कस्थानाचे व्यापाराचें दळण वळण आहे. व कानस्टांटिनोपल एथेंही मोठा व्यापार चालतो. तुर्कस्थानांतून धान्य पुष्कळ बाहेरप्रांतीं जातें. सन १८७४ सालीं तुर्कस्थानाहून ग्रेटब्रिटनकडे एकंदर २३०५३७५० रुपयांचें धान्य गेलें. तसेंच बकऱ्याचे केस व अफू हे जिन्नसही कोट्यावधि रुपयांचे बाहेर मुलखीं जातात. सर्कीं सुद्धां कापूस मागें तुर्कस्थानांतून पुष्कळ बाहेर जात असे पण तो आतां अगदीं बंद झाला. ग्रेट ब्रिटन देशांतून तुर्कस्थानांत कापसाचीं व लोकरीचीं वस्त्रें व लोखंडी सामान पुष्कळ येतें. सन १८७५ सालीं कापसाचीं वस्त्रें ४६४६३४३० रुपयांचीं, लोकरीचीं वस्त्रें २९४४०६० रुपयांचीं. व लोखंडी सामान २१०१७८० रुपयांचें आलें.

तुर्कस्थानचे सन १८७४ सालचें उत्पन्न २२,५५,२३,००० रुपये होतें. व खर्च २२,८४,९६,००० रुपये झाला होता. याप्रमाणें वर्षास जमेहून खर्च अधिक होतो त्यामुळें राष्ट्रास कर्ज आहे. २० वर्षांतील कर्जाची बेरीज वाढत वाढत सन १८७६ सालीं १,८४,९८,१७,८३० रुपये झालेली आहे.

तुर्कस्थानांत सन १८७१ सालीं फौजाविषयीं कायदा झाला आहे त्याच्या आधारें तीन प्रकारची त्यांची फौज आहे एक लढायीस तयार अशी फौज, दुसरी रिझर्व फौज. व तिसरी बैठी फौज. पहिल्या प्रकारची लढाईची जी फौज आहे तिच्यांतील लोकांनीं ४ वर्षांनंतर आपले घरीं जाऊन पाहिजे तो उद्योग धंदा करावा व लग्नें करण्यासही त्यांस मोकळीक आहे. पण असा नियम आहे कीं, त्यांच्या चाकरीचें कारण पडलें तर हुकूम पोचल्याबरोबर एक मिनिटाचा अवकाश न करितां त्यांनीं आणखी दोन वर्षेंपावेतों पुन्हा फौजेंत येऊन दाखल व्हावें. याप्रमाणें त्यांचीं ६ वर्षें भरल्यावर मग त्यांस रिझर्वमध्यें दाखल करितात. मग पहिले प्रतीच्या रिझर्वांत ३ वर्षें व दुसरे प्रतीचे रिझर्वांत ३ वर्षें त्यांस ठेवतात. या दोहों प्रतींतील शिपाई लोक लढाई करण्यास व पाहिजे तो धंदा करण्यास वगैरे मोकळे आहेत तरी दरसाल एक महिना त्यांस कवाईत ह्मणजे शस्त्राभ्यास करावा लागतो. व त्या महिन्याचा त्यांना पगार देतात. या रिझर्वांतील लोकांनीं कारण पडल्यास हुकूम होईल तेव्हांपासून १५ दिवसांत फौजेंत येऊन दाखल व्हावे असा कायदा आहे. रिझर्वांत लोक १९२००० असतात. या प्रमाणें ६ वर्षें रिझर्वांत राहिल्यावर ह्मणजे पहिल्यासुद्धां १२ वर्षें झाल्यावर ते लोक बैठ्या फौजेंत दाखल होतात त्यांची संख्या ३ लक्ष आहे. बैठ्या फौजेची मुदत ८ वर्षांची आहे. व फक्त लढाई सुरू होईल तेव्हांच तिनें नोकरीस यावें असा कायदा आहे.

बैठी खेरीज करून तुर्कस्थानची जी चालू फौज आहे तिची संख्या गुदस्त सालची येणेंप्रमाणें आहे. पायदळ पलटणी ३६, घोडेस्वार पलटणी २४, तोफखान्याच्या १०, इंजिनियरच्या २. व तैनाती पलटणी ८ मिळून ८० पलटणींत १७०५७६ लोक लढाईचे, व ४५९३६० शांततेचे आहेत. या शिवाय समुद्रांत लढाऊ लोखंडी जाहाजें २० व आगबोटी ७० आहेत. शिवाय जुनी तिरकाटी तारवेंही कित्येक आहेत पण तीं प्रस्तुत उपयोगांत नाहींत.

तुर्कस्थानचे राज्याचा मूळ संस्थापक सुलतान अटोमन हा होय. तो सन १२९९ त गादीवर बसला. तेव्हांपासून आजपर्यंत ३७ पुरुष झाले. या राज्यांत सुलतान मरण पावल्यावर वडील चुलता अगर चुलतभाऊ नसल्यास वडील पुत्रानें गादीवर बसावें असा नियम आहे मग तो पुत्र स्त्रीपासून झालेला असो अगर दासी पुत्र असो. ही संतती बादशाही जनानखान्या पैकीं मात्र असली ह्मणजे झालें. बादशाहाच्या मुलीस प्रिन्सेस ह्मणतात परंतु त्यांच्या संततीला ती पदवी पुढें चालत नाहीं तसेंच जे पुत्र गादीवर बसत नाहींत त्यांनीं अविवाहित रहावें किंवा आपले पदवीचा परित्याग करावा.

शेकडों वर्षें तुर्कस्थानांत सुलतानानें लग्न करावें अशी चाल नाहीं तरी जनानखान्यांत स्त्रियांचा भरणा बराच असतो. त्या स्त्रिया मुलखा बाहेरून कांहीं विकत आणितात व कांहीं खुशीनें येत असतात. बहुधा सिरकासिया एथील या स्त्रिया आहेत. त्यांतून सुमार सात स्त्रिया सुलतानानें निवडावयाच्या त्यांस कादीन ह्मणतात व बाकीच्यांस उदालिक ह्मणतात. त्यांवर देखरेख ठेवणारी वृद्ध स्त्री असते तिला हजनादार कैन असें ह्मणतात. तिच्या हाता खालीं खोजे असतात त्यांच्या मुख्याला कैजल अगासी ह्मणतात त्याची पदवी मुख्य वजीराचे बरोबरीची आहे.

या देशचे कायदे कुराणाचे आधारावर रचलेले आहेत. सुलतानाची इच्छा प्रबल, पण ती धर्म पुस्तकांतील सत्यापरती असूं नये इतकें त्यांत वर्म आहे. शिवाय पैगंबराचीं भाषणें व मतें तसेंच त्याचें अग्रजाचे ठराव व फैसल यावरून मुलटेकर ह्मणून पुस्तक रचिलें आहे तेंही आधारभूत मानिलें आहे. शिवाय सुलतान सुलेमान यानें हाती शरीफ ग्रंथावरून कानूननामा ह्मणून ग्रंथ केला आहे तो मानितात.

राज्यांत कायदे करणारे किंवा हुकुमत फर्माविणारे सुलतानाचे आज्ञेवरून दोन मुख्य आहेत एक सादरा आय अथवा मुख्य वजीर आणि दुसरा शेख उल इसलाम अथवा धर्माध्यक्ष. यांच्या हाताखालीं पुष्कळ हुद्देदार आहेत. कुराणाचा तरजुमा सांगणारे यास मुफती ह्मणतात. सुलतान यांच्या सल्ला घेतल्या शिवाय कांहीं करीत नाहीं. लढाई सुरू करावयाची तरी देखील अलमे व मुफती यांची सल्ला पाहिजे. तो आपला ठराव देतो त्यास फतवा ह्मणतात. बंड होऊन सुलतानास राज्यभ्रष्ट करावयाचें असलें तरी देखील बंडाव्याचे पुढाऱ्यानें सदरील प्रमाणें वागावें लागतें. अलमामध्यें मोठमोठे न्यायाधीश, कल्पक पुरुष, शास्त्री, प्रोफेसर असे असतात त्यांची सभा भरावयाची असली ह्मणजे मुफती कडून त्यास पाचारण जातें. मुख्य वजीर हा राजाचा केवळ प्रतिनिधी होय. त्याचे हाताखालीं ८ दिवाण अथवा प्रधान आहेत. त्यांचे हुद्दे:— १ लढाई संबंधी प्रधान, २ हिशेबी खात्याचा प्रधान, ३ जलमार्गाकडील प्रधान, ४ व्यापारसंबंधी प्रधान, ५ सार्वजनिक कामासंबंधी प्रधान, ६ पोलिसीकडील प्रधान, ७ न्यायखात्याकडील प्रधान, आणि ८ विद्याखात्याकडील प्रधान. आलीकडे प्रधान लोकांच्या बदल्या फार होऊं लागल्या. सरासरी ४ महिनेही एका जागीं एक टिकत नाहीं. मुख्य वजीर सन १८७४ पासून १८७६ पर्यंत ११ झाले असें कळतें!

## लग्नाविषयीं

मुंबईस डाक्टर सखराम अर्जुन यांणीं विवाहविज्ञान यावर दोन ठिकाणीं दोनदा व्याख्यान दिलें व त्यांत पुष्कळ चांगली माहिती सांगितली. याबद्दल तेथील वर्तमानपत्रांतून त्यांची तारीफ लिहून आली होती. व या व्याख्यानाचें हाशील या महिन्यांतील पहिल्या दोन अंकांत आमचे पत्रींही छापून प्रसिद्ध झालें आहे तें वाचकांनीं पाहिलेंच असेल.

त्यांतील कांहीं गोष्टी आमचे वाचकांस केवळ नव्यासारख्याच वाटतील. डाक्टर साहेब ह्मणतात कीं. स्त्री पुरुषें वर्णानें दोन्ही सारखीं नसावीं. ह्मणजे नवरा वर्णानें गोरा असेल तर बायको काळी किंवा नवरा काळा असेल तर बायको गोरी असावी. हें मत आमचे लोकांस जरा विलक्षण वाटेल, मुलीचे बापास आपल्याला जावई गोरा गोमटा पहाण्याची मोठी आवड असते व त्या प्रमाणें कोणाच्या मुलाला मुली सांगून आल्या कीं त्यांत गौरवर्ण हें लक्षण मुख्यत्वें

बडोदा रेलवेचा पालनपुराकडील फाटा शियावर स्टेशनापर्यंत बांधण्याची लवकरच सुरुवात होईल असें कळतें.

अमेरिका खंडांत पेरू प्रांतांत रुप्याच्या खाणींतून आजवर १०० कोटि रुपयांचें रुपें निघाल्याचें कळतें.

सर रिचर्ड टेंपल साहेब मुंबईचे गवरनर या आठवड्यांत काठेवाडांत जाणार आहेत.

रोम्यानियानें टर्की बरोबर लढाई करावयाची व आपलें स्वातंत्र्य रक्षण करावयाचें असा निर्धार करून जाहिरनामा प्रसिद्ध केला.

मुंबईत एक जमनाबाई नावाच्या मुसलमान स्त्रीवर हायकोर्टाकडून ६०० रुपये वसूल करण्याचें वारंट एक बेलिफ घेऊन गेला असतां त्याला ५० रुपये लांच देण्याचा बाईनें इलाज केला ती गोष्ट त्यानें ऐकली नाहीं तेव्हां ४ असामी मुसलमान व बाई आणि बाईची आई इतक्यांनीं मिळून बेलिफाचे हातांतील वारंट घेऊन फाडून टाकलें व बेलिफ यास चांगला ठोक दिला. त्यावरून त्या सर्व इसमास वारंटानें पकडलें आहे व माजिस्त्रेटा पुढें त्यांवर मुकदमा चालला आहे.

इंदापुराहून पत्र आलें आहे त्यावरून समजतें कीं तेथील पीडित लोकांस मदत करण्याकरितां राव साहेब मंडलिक व शेट मुरारजी यांनीं २९०० रुपये पाठविले व पनवेलीचे सावकार गुळवे यांनीं ८०० रुपये दिले. पनवेलीस हल्लीं असलेले मामलेदार रा० रा० अंताजी पंत हे मागें इंदापुरास होते व त्यांना इंदापुरच्या लोकांची कळकळ वाटून हा सहाय मिळविण्याचा प्रयत्न त्यांनीं केला असें दिसतें ही गोष्ट त्यांस मोठी भूषणास्पद होय.

विंचवावर उत्तम औषध— जमखंडीचे कारभारी रा. रा. नारायण भिकाजी जोगळेकर यांनीं पुण्याच्या एका पत्रांत प्रसिद्ध केलें आहे कीं क्लोरोफार्म नावाचें इंग्रजी औषध विंचवाचे विषावर फार प्रशस्त आहे. दंश झाल्या जागीं तें लावल्यापासून ३ मिनिटांत विष उतरून मनुष्य हसत घरीं जातो. औषधाचे बाटलीचा वारंवार बूच निघाल्याच्या योगानें त्याचें सत्व कमी झालें तर विंचू उतरण्यास ७।८ मिनिटें लागतात. जोगळेकर यांनीं पुण्याहून कँप आणि को यांचे दुकानांतून २० रुपयांची क्लोरोफार्मची बाटली नेली होती तींतून ४ महिन्यांत सुमार ५०० मनुष्यांस औषध देऊन त्यांनीं गुण आणिला. क्लोरोफार्म हें हुंगलें असतां विष आहे सबब त्या विषयीं जपून दंश झाल्या ठिकाणीं असराप्रमाणें तें लावावें म्हणजे झालें.

मि. वामन बापूजी काणे व मि. गोविंद गणेश गोडबोले यांस सातारा जिल्ह्यांत वकिली करण्याच्या सनदा मिळाल्या.

खिलातचे खानास त्याचे मुलानें ठार मारल्याविषयीं कराची एथें बातमी उठली आहे असें कराची एथील तारीख १७ चे तारेवरून कळतें. ने. ओ.

प्रसिद्ध दामोदर त्रिंबक नेने— बडोद्याचे मल्हारराव गायकवाड ज्या राजश्रीच्या प्रतापानें गादीपासून पतच्युत झाले ते पूर्ण प्रतापी गृहस्थ स्वर्गवासी झाले अशी काहीं दिवसापूर्वी मुंबईत फंडी पिकली होती या गोष्टीकडे सर टी. माधवरावांचें लक्ष जाऊन त्यांनीं असा हुकूम केला कीं, दामोदरपंत जिवंत आहे अशी खात्री होईपर्यंत त्याला सर लुईस पेली यांजकडून मल्हाररावांची चौकशी करण्याच्या कामीं सहाय केल्याबद्दल बडोदें संस्थानांतून जें पेनशन मिळालें आहे तें बंद ठेवावें आता दामोदरपंत बडोदें सरकारची आपण जिवंत आहों अशी खात्री करण्या करितां हजर झाला तर त्यास लोक धोंड्यांचा वर्षाव करून जिवें मारतील.

रशियन लोकांचें आरमार अमेरिकेंतून कशा करतां येत आहेत हें अजून समजलें नाहीं.

कुर्डिस्थानच्या संस्थानिकांनीं वीस हजार लोकांची तुर्कस्थानास मदत देण्याचें अभिवचन दिलें आहे.

लाहोरापासून फराजपुरपर्यंत जो आगगाडीचा रस्ता व्हावयाचा आहे त्याची पाहणी संपली. प्रत्येक मैलास ८०,००० रुपये खर्च लागेल असा अदमास आहे.

लंडनच्या एका वर्तमानपत्रांत असें लिहिलें आहे कीं, युवराज आणि त्यांची पत्नी हीं उभयतां खर्चाच्या टंचाईमुळें येथून गेलीं आहेत. त्यांच्या खर्चांत आणि उत्पन्नांत अगदींच मेळ नाहीं. त्यांनीं काटकसरीनें खर्च करावा असें पार्लमेंटाचें मत आहे; परंतु ते कांहींच ऐकत नाहींत. याजकरितां त्यांच्या मातोश्रीनीं त्यांत आपली नेमणूक वाढवून घेण्याविषयीं पार्लमेंट सभेस अर्ज करण्याचा सल्ला दिला असतां तसें करणें युवराजांस आवडत नाहीं.

इंदूर एथील लोकांचा कित्ता घेण्यासारखा उद्योग.— मुंबई व मद्रास या ठिकाणीं दुष्काळ पडून हजारों लोक अन्नावाचून उपाशी मरत आहेत, या गोष्टीचा इंदूरच्या लोकांना कळवळा येऊन त्यांनीं दुष्काळपीडित लोकांच्या दुःखनिवारणार्थ वर्गणी जमा करण्याचें काम मोठ्या झपाट्यानें चालविलें आहे. या सत्कृत्याकरतां नुकतीच एक सभा भरली होती आणि अध्यक्षस्थानीं शिवाजीराव पहिले राजपुत्र ह्यांची योजना झालेली होती. एकंदर पांच हजार रुपये वर्गणी जमा झाली आहे. या सभेकडून पुण्याच्या सार्वजनिक सभेकडे ६०० रुपयांची हुंडी पाठविण्यांत आली आहे. आणि इंदूरच्या सभेची अशी इच्छा आहे कीं, जात किंवा धर्म यांकडे न पहातां खरोखर ज्यांस मदत पाहिजे आहे त्यांचाच संभाळ करण्याकरितां या द्रव्याचा व्यय व्हावा दुष्काळपीडित लोकांची ज्याप्रमाणें इंदूरकर रहिवाशांनीं दाद घेतली त्याप्रमाणेंच इतर संस्थानांतील लोकांनीं व संस्थानिकांनीं हें सत्कृत्य करण्याचें मनावर घेतलें तर त्यांचे देशबांधव या अनिर्वाच्य दुःखांतून थोडी तरी सुटका पावतील. इलाख्याच्या मुंबई शहरांत अजून या दुष्काळाच्या संबंधानें लोकांच्या अंतःकरणांत चरका बसल्याचें उदाहरण दिसून आलें नाहीं. मुंबई सारख्या पुढारी शहरानें आपल्या देशबांधवांचे दुःख निवारण करण्याचा आतां देखील विचार करूं नये हें फारच आश्चर्यकारक आहे. इं. प्र.

# नोटिसा

काशी मर्द लक्ष्मण तेली रहाणार अकोला इला लक्ष्मण वलद भिवाजी तेली राहणार लोणी तालुके बाळापुर याजकडून नोटिसीचें उत्तर देण्यांत येतें तें:—

तूं उर्दू अखबारांतून मला नोटिस दिलीस कीं मी १२ वर्षे तुला वागवीत नाहीं व तूं आपला भाऊ यादव वलद उतराजी तेली याजकडून ६०० रुपये पोटखर्चास घेतले ते मी द्यावे व तुला वागवावें नाहींपेक्षां त्याच नोटिसीवरून तूं माझी फारखत समजून गंधर्वाचा घरठाव करणार असा तुझा मतलब आहे त्यावरून तुला कळवितों कीं असले खोटे व तुफानाचे फंद चालणार नाहींत. तूं आपले भावाकडून एक कवडीही पोटास घेऊन खाल्ली नाहींस व त्याचें तुझें बिलकूल सुत नव्हतें. आतां त्याचे नादानें तूं मला बुडवून त्याचें घर भरण्याकरितां ६०० रुपये मागतेस पण सदहू गोष्ट बातल असल्यामुळें एक पैसाही तुला मिळणार नाहीं.

दुसरें, मी १०।१५ वेळां तुझे आईकडे तुला घेऊन जाण्याविषयीं आलों असतां तूं आली नाहींस व मी तुझ्या आईच्या घरीं येऊन राहिलों असतां नांदली नाहींस व जमरीतीप्रमाणें संसार केला नाहींस. पुढें तुझी आई मेल्यावर सुमार दोन महिन्या मागें मी सवतें घर घेऊन अकोल्यास राहिलों व तुला तेथें आणली असतां तूं एक दिवसही चांगले वागून मला सुख दिलें नाहींस व पळून गेलीस, तुझें म्हणण्यावरून तुझे बहिणीचे शेजारी येऊन राहिलों तेथेंही फंदच करून खराबा केलास आणि आतां अशा नोटिसा देतेस याची तुला शरम वाटत नाहीं ही अजब गोष्ट आहे ! ही अक्कल तुझी बायको माणसाची नव्हे. असो अजून तुला कळवितों कीं मी फारखत कधीं देणार नाहीं आणि ही नोटिस पोंचतांच तूं भावाचे घरांतून निघून माझेकडे नांदावयास यावें. कोणाचे नांदी लागू नये. इतक्यावर न येशील व गंधर्व करशील तर तुला व तुझे मदत करणारे लोकांना व गंधर्व करणाराला सरकारांतून सजा हाऊन जेलांत जावें लागेल हें खुप समजावें व काय करणें असेल तें करावें. कळावें तारीख २० माहे मे सन १८७७ इसवी.

( सही ) लक्ष्मण वलद भिवाजी तेली
याचे हातची रेघ

## नोटिस.

धवकल वलद बाबाजी गावंडे रहाणार वस्ती मौजे दहीगाव तालुके अकोलें यासी रावजी वलद हरसिंगजी वाघमारे वस्ती मौजे कानसनी तालुके अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, माझी मुलगी यशोदी ही तुमची लग्नाची बायको असून आज १२ वर्षे झालीं तेव्हांपासून तिजला तुह्मी नीट रीतीनें वागवीत नाहीं. मध्यंतरीं सात आठ वेळां तिजला तुह्मी वागवावें ह्मणून मी स्वतः तुह्मापाशीं आणून घातलें तेव्हां तुमचे गावचे पाटलानें व तेथील सर्व लोकांनीं तिची वागणूक करण्याविषयीं तुह्मास बहुत प्रकारें सांगितलें असतां तुह्मी तसें वर्तत नाहीं आणि हल्लीं ती माझे घरीं रहात असून तिचे पाठीमागें तिचा विच्यार न घेतां दुसरी लग्नाची बायको केली. पण पहिल्या बायकोची घडी फाडून दिली नाहीं हें फार गैर केलें. ह्मणून तुह्मास या नोटिशीनें असें कळविण्यांत येतें कीं, ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत आमचे एथून सदहू यशोदीस तुह्मी घेऊन जाऊन चांगल्या रीतीनें वागवावें व चांगल्या रीतीनें वागवाल अशाबद्दल आह्मास लेख करून द्यावा किंवा कोणी भरवशाचा मनुष्य जामीन द्यावा. तसें तुह्माकडून न झाल्यास नोटिशीची मुदत संपतांच सरकारमार्फत तजवीज करून तुमचा लग्नाचा हक्क रद्द केला जाईल व दुसरा गंधर्व करण्याची तजवीज केली जाईल. कोर्ट खर्चासुद्धां व या नोटिसीचे खर्चासह तसेंच ती माजपाशीं १० वर्षे रहात आहे. त्याचा दरमहा खाण्या पिण्याचा खर्च ५ रुपये प्रमाणें ६०० रुपयांचा दावा करून भरून घेण्यांत येईल. ही नोटिस लिहून दिली सही. तारीख २० मे १८७६ इ०

( सही ) रावजी वलद हरसिंगजी
निशाणी खुद हातची.

## नोटिस.

रा. रा. लखाजी वलद हरजी पाटील रहाणार मौजे सावरगाव तालुके अकोट जिल्हा अकोलें यास गणपतराव नारायण वकील वहिवाटदार रावजी वलद महादाजी रहाणार मौजे सावरगाव तालुके अकोट जिल्हा अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आह्मी तुह्मास पांच वर्षांच्या कबुलायतीनें सर्वे नंबर ३६ चें शेत वाहून उपभोग घेण्या करितां दिलें असून त्या वेळेस तुमची व आमची कबुलायत अशी होती कीं दरसाल १३५ रुपये तुह्मी आह्मास देत जावें व शेताच्या सान्याबद्दल सरकारी रुपये ४३ आह्मी सरकारात देत जावें याप्रमाणें असून आज तीन वर्षे झालीं तुह्मी शेत वाहून सरकारचा वायदा देत गेला या शिवाय कराराप्रमाणें हक्क आह्मास कांहीं पोंचला नाहीं ह्मणून हल्लीं आमचे मन तुमच्या वहिवाटींत शेत ठेवावें असें नाहीं तर ही नोटिस पावल्या पासून तुह्मी शेतात नांगरूं नये व वखरूं नये व आह्मी ही त्याजप्रमाणें करूं नये जबरदस्तीनें तुह्मी वाहू लागला तर आह्मी कोर्ट खुले झालेवर नुकसानीचा शिरस्ते प्रमाणें दावा करूं व नोटिशीचा खर्च व नुकसानीचा खर्च व हक्काचे नुकसानीचा खर्च भरून घेतला जाईल हें खुप समजावें कळावें तारीख २१ माहे मे सन १८७७ इसवी.

( सही ) गणपतराव नारायण वकील
वहिवाटदार रावजी वलद
महादाजी रहाणार मौजे
मजकूर याच्या हातची
निशाणी खुद.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छा. प्र. केलें.